म. ग्रं. सं. ठाणें
ग्र. क्र. ... ४७६
९५३०

# प्रेषित

उर्फ

# निष्कलंक अवतार यांचे चरित्र

लेखक व प्रकाशक

मौ. गुलाम यासीनखान

( पेन्शनर आबकारी दारोगा आकोला )

मुद्रक:- रा. रा. भालचंद्र पंढरीनाथ खेळकर

मुद्रणालय:- 'वतनदार' छापखाना आकोला.

—o—

हिजरी सन १३४९

इसवी सन १९३०

सर्व प्रकारचें हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

किंमत १० आणे.

# DEDICATED.

TO

Mr. S. M. Rahman B. A. L L. B.,
M. R. A. S. F. R. S. A. ( London )
M. L. C., High Court Pleader Akola
As An Humble Tribute
to
His High Attainments and scholarship.

Author

## समर्पण

श्रेष्ठ प्रेषित उर्फ निष्कलंक अवतार या नांवाचें पुस्तक विद्वान, जनाब एस, एम, रहमान. बी. ए. एल एल. बी. एम. आर. ए. एस. एफ. आर, एस. ए. (लंदन), एम, एल. सी., हॉयकोर्ट वकील, आकोला,

यांना त्यांचें संपादित गुणाबद्दल नम्र असा हा नजराणा अर्पण केला आहे.

ग्रंथकर्ता.

नि. रा. रा. डी. व्ही. जोशी बी. ए. बी. एस. सी एल एल. बी.
वकील आकोला.

रा. रा. गणेश प्रल्हाद मुन्शी पेन्शनर हेडमास्तर ए. व्ही. स्कूल आकोला

रा. रा. शंकरराव बाबा देशमुख आकोला.

मिस्टर विद्वान सैयद मुबिनुर रहमान बी. ए. एल एल, बी. हायकोर्ट
वकील व एम. एल. सी. आकोला.

मौलाना महंमद अली साहेब हेडमास्तर ए. यू. स्कूल आकोला.

मिस्टर काजी करिमोद्दीन एम, ए. एल एल, बी. सबजज्ज आकोला.

मिस्टर सैयद आहमद साहेब डिप्युटी सुपरइनटेन्डन्ट आकोला.

खान बहादूर मिर्झा रहमानबेग खतीब, बेंच माजिस्टेट व एम. एल. सी.
आकोला.

मिस्टर हकीम जमालोद्दीन साहेब आकोला.

मिस्टर गुलाम मोहियोद्दीन सूफी साहेब असिस्टंट स्कूल इन्स्पेक्टर
उमरावती.

या सद्गृहस्थांनीं ह्या ग्रंथा संबंधीं अनेक उपयुक्त सूचना वेळोवेळीं केल्या बद्दल ग्रंथकर्ता त्यांचा फार आभारी आहे.

हे खालील सूत्र (मुद्रा) संस्कृत भाषेत असून मोडी लिपींत लिहिलेले आहे तरी डावीकडून वाचल्यास "ओम् नमः परमात्माने हरी ओम्" असें बनते. तसेंच अरबी भाषा व लिपींत उजवीकडून वाचलें असतां:- "महंमद अल्ला लाइला इल्लला अल्ला महंमद" असें बनते. याचा इंग्रजी भाषेत अर्थ केल्यासः—

आकृती नंबर १ ओम् नमः परमात्मानें हरी ओम् ह्मणजे महंमद अल्ला लाईल्ला इल्लळा अल्ला महंमद




(I bear witness) Mahommed, there is no object of adoration besides God Who is One, having no associate (and I bear witness that) Mahommed (is his Apostle) हे वरील सूत्र सर्व भाषेत समनार्थक असून सर्व धर्मांच्या ऐकते व साम्यते संबंधीं सुद्धां अरबी भाषेचा एक मोठा विलक्षण आश्चर्यकारक दैविक चमत्कारा पैकींच एक दैविक चमत्कार (Miracle) आहे.

पहा बुक पान २७ अथर्वण अल्लोपनिषदचे पहिलें वाक्य शिवाय खालील सूत्रें आकृति नंबर २ ते ८ पर्यंतचा खुलासा येणेंप्रमाणें:- पहा ह्या बुकाचे पान ३ व ४, १३, ३६ व ५८ तील उताऱ्यांतील सूत्राचा गुढार्थ:- ××× " ८ १० अहो देवानो संभलग्रामामध्यें हा कश्यप उत्पन्न होईल. तो विष्णुयशा नांवानें प्रसिद्ध होऊन विष्णुकीर्ति ह्मणून त्याची प्रिय पत्नी असेल "


आकृती नंबर २     संभलग्राम ह्मणजे अरबस्तान



आकृती नंबर ३     कश्यप ह्मणजे पैगंबर



आकृती नंबर ४ विष्णु यशा ह्मणजे रसूल अल्ला



आकृती नंबर ५ विष्णु किर्ती ह्मणजे आयशा रदीअल्ला अन हा




आकृती नंबर ६ ओम् ह्मणजे महंमद




आकृती नंबर ७ विष्णुदास ह्मणजे अब्दुल्ला



आकृती नंबर ८ संभलग्राम ह्मणजे अरबस्तान



या पेक्षां जास्त अशी उपयुक्त माहिती प्राप्त करण्याची ज्यांना आवड आहे, त्यांनीं आमचे श्रेष्ठ प्रेषित उर्फ निष्कलंक अवतार या नांवांचें पुस्तक वाचलें असतां त्यांत पूर्ण खुलासा सांपडेल. तरी सदरहू पस्तक आकोला येथें वतनदार छापखान्यांत दहा आणे किंमतीला मिळूं शकते.

आपला

आकोला. } गुलाम यासीनखान

ता. ५।९।३० } पेन्शनर आबकारी दरोगा

# प्रस्तावना.

सृष्टी निर्माण झाल्यापासून आज पावेतों व पुढें सुद्धां निर्गुण निराकार अशा एकच ईश्वराची उपासना होत आहे किंवा होत राहील. हा सिद्धांत सांगणें ह्मणजे कांहीं नवीन गोष्ट सांगणें आहे असें नाहीं. तथापि मध्यंतरी सृष्टीतील लोकांना त्याचा विसर पडून एखाद्या वस्तूस त्या एकाच ईश्वराशीं जोडीदार करूं लागतात ह्मणून जगाला खऱ्या मार्गावर आणण्यास, तसेंच ईश्वरा बरोबर कोणास सामील करूं नये. ही खरी वाट दाखविण्यासाठीं, ईश्वराला वाटतें तेव्हां तो ईश्वर, मनुष्य मात्रांतच एक अति उच्च आणि श्रेष्ठ अशी एखादी व्यक्ति, जिला प्रेषित, किंवा पैगंबर अथवा अवतार असें ह्मणतात, तो निर्माण करीत असतो,

जेव्हां जेव्हां असे प्रेषित किंवा पैगंबर अथवा अवतार निर्माण होतात. त्या सर्वच ईश्वराच्या निवडक व्यक्ती असतात. सृष्टीतील लोकांना सुबोधाचा उपदेश करणें, व त्यांना खरा आणि सत्य मार्ग दाखविणें, हें त्यांच्या कर्तव्यांतील आद्य कर्तव्य असतें. जो प्रेषित, पैगंबर किंवा अवतार निर्माण होतो, त्याच्यावर किंवा त्याच्या साठीं निर्माण झालेल्या ग्रंथावर, तसेंच त्याच्या सदुपदेशावर जगांतील सर्वच लोक विश्वास ठेवित नाहींत ह्मणूनच ईश्वराला दुसरा प्रेषित, पैगंबर अथवा अवतार निर्माण करावा लागतो. पूर्वी निर्माण झालेल्या प्रेषिता करितां जो श्रद्धा ग्रंथ निर्माण होतो त्यांत पुढें येणाऱ्या प्रेषित किंवा पैगंबर अथवा अवताराचा उल्लेख असतो असे आज पावेतों जितके कांहीं प्रेषित किंवा पैगंबर अथवा अवतार सृष्टींत

होऊन गेले व त्यांच्या करितां जे जे ग्रंथ निर्माण झाले, त्यांवरून स्पष्ट दिसून येईल.

तसेच कली युगाच्या शेवटच्या काळीं कल्की अवतार निर्माण व्हाव-याचा आहे, असे भारत खंडांतील हिंदु लोकांचीं शास्त्रें व पुराणें उल्लेखितात त्या प्रमाणें जगांत जितके कांहीं धर्म आहेत व ज्या भाषेंत त्यांचे ग्रंथ निर्माण झालेले आहेत त्या सर्व ग्रंथांत ह्याच अवताराच्या निर्माण होण्याचें भविष्य रुपीं वर्णन कोणत्या ना कोणत्या रुपानें उल्लेखिलें आहे, असें दिसेल.

हा अवतार निर्माण होऊन आज १३४८ वर्षें होऊन गेलीं आणि त्याचे निर्माण होण्या संबंधानें जे भविष्य भगवान श्रीकृष्ण व दुसऱ्या अवता-रांनीं निवेदन केलें, तें भविष्य कसें तंतोतंत परिपूर्ण झालें, हें या लहानशा पुस्तकांत सिद्ध करून दिलें आहे.

तो अवतार कोण ? असा जर कोणी प्रश्न केला तर त्याचें उत्तर असें आहे कीं ज्या प्रमाणें कोणी इसम आपली ठेव कोठें पुरुन ठेवून कांहीं दिवसांनीं तो विसरून जातो मग ती ठेव प्राप्त करण्यासाठीं पुन्हा पुन्हां त्याला प्रयत्न करावा लागतो, त्याच प्रमाणें बहुतेक सर्व श्रेष्ट व प्रचलित धर्म ग्रंथांत व विशेषे करून हिंदु धर्मांत ज्यास कल्की अवतार म्हटलें आहे तो व श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद, हे लक्षण साम्यावरून एकच आहेत हें सिद्ध करून दिल्यास व तें पटल्यास मोठें वैषम्य नाहींसे होईल कारण भाषेच्या रुढी प्रमाणें त्या अवतारास प्रत्येक धर्मात निरनिराळी नांवे दिली आहेत.

हा कल्की अवतार ज्याला श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद हे निर्माण होऊन १३४८ वर्षे होऊन गेली, व ते शास्त्राधारें कसें सिद्ध झालें, हें सुद्धां समजेल नाही पण अझून तो अवतार निर्माण होणार आहे. अशा भ्रमांत कित्येक लोक आहेत आणि हा त्यांचा भ्रम कसा खोटा ठरतो हें सुद्धां सिद्ध केलें आहे.

या प्रेषित किंवा पैगंबर अथवा अवताराच्या जन्माच्या आधीच जगातील कित्येक अवतारांनी व ज्ञानी पुरुषांनी वेळोंवेळीं कशा आठवणी करून दिल्या व त्या कशा खऱ्या ठरल्या आणि हिंदुस्थानांतील अवतार, ऋर्षी आणि ज्ञानी पुरुषांनीं आपल्या पवित्र व उत्कृष्ट अशा वेद, गीता, कलंकी पुराण, विष्णू पुराण, भविष्य पुराण, महाभारत, वनपर्व, शांतीपर्व, अथर्वण अल्लोपनिषद् आणि अल्सूक्त इत्यादि निरनिराळ्या सन्माननीय ग्रथांत, शास्त्रांत आणि पुराणांत त्या नमूद करून दिल्या होत्या, हें त्यांचे मोठे स्तुत्य कर्तव्य आहे ह्मणून या लहानशा पुस्तकाचे नांव " श्रेष्ठ प्रेषिताची ~~आवश्यक~~ उर्फ निष्कलंक अवतार " असेंच ठेविलें आहे. Apostle " प्रेषित " Prophet पैगंबर आणि Incarnatio[n] मानवी अवतार The act of taking a human body and the nature of man जसे The incarnation of the son of God, The incarnation of Justi~~c~~ce धर्मावतार; मुर्ती.

हिंदुस्थानांत हिंदू धर्मांत प्रेषित किंवा पैगंबर.यालाच अवतार असे मानतात पण इस्लामी धर्मांत प्रेषित किंवा पैगंबराला अवतार असे ह्मणता

येत नाहीं कारण अवतार या शब्दाचे स्पष्टीकरण केल्यास असें समजते कीं, अवतार ह्मणजे ईश्वराचा अंश ह्याला स्पष्ट शब्दांत ह्मणावयाचे ह्मणजे ईश्वरानें मनुष्य देहांत रुप घेणें असें होते पण ईश्वर हा निराकार आहे ह्मणून तो जन्म घेत नाहीं तरीं पण ईश्वर मनुष्य मात्रातच कांहीं श्रेष्ठ अशा व्यक्त्या निर्माण करितो, व त्यांना प्रेषित अथवा पैगंबर असें ह्मणतात याचा वर उलगडा केलाच आहे. यास्तव इत:पर या पुस्तकांत ज्या ज्या ठिकाणीं अवतार हा शब्द उपयोगांत आला आहे त्याचा अर्थ प्रेषित किंवा पैगंबर असा समजावा.

हें लहानसें पुस्तक महत्प्रयासानें बऱ्याच ग्रंथाचें व पुस्तकांचें अवलोकन करुन लिहीलें आहे शिवाय हें पुस्तक तयार करण्यांत बऱ्याच सद्-गृहस्थांची मदत घ्यावी लागली त्याबद्दल त्यांचे आभार मानतो तसेंच विशेषे करून ह्या पुस्तकाला तयार करण्यांत मौलाना सैयद मुबीनुर रहमान साहेब बी. ए. एल्. एल. बी. हायकोर्ट वकील आणि एम्. एल्. सी. राहणार आकोला यांनीं वेळोवेळीं ज्या उपयुक्त सूचना व माहिती दिली त्याबद्दल त्यांचे आभार मानतो.

**उद्देश**—हिंदुस्थानांत मुसलमानांना येऊन आज सरासरी एक हजार वर्षें होऊन गेलीं तरी ह्या देशांत हिंदू आणि मुसलमान यांचे आपसांत परस्परांचे काय संबंध आहेत हे समजण्याचे किंचितहि प्रयत्न केले जात नाहींत ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. कोणास आपल्या धार्मिक बाबतींत इजा न पोहोंचेल असा शक्य तितका प्रयत्न केला आहे.

शिवाय, हें लहानसें पुस्तक, भांडण किंवा वादविवाद करून एकमे-कावर चढा ओढ करण्यासाठीं लिहिलें नाहीं तथापि सर्व समाजांत एकी वाढवून व मित्रत्व कायम ठऊन त्यांत परस्पर सहानुभुति वाढविण्याचें कामी सदर पुस्तक मोठ महत्वाचें होईल, आणि इस्लामी धर्मा संबंधानें जो गैर समज झालेला आहे तो खरोखर दूर झाल्या वांचून रहावयाचा नाहीं असें माझें मत आहे.

वाचकांना नम्रता पूर्वक विनती आहे कीं, हें पुस्तक त्यांनी मोठ्या उदार आणि शांत मनानें वाचून त्या संबंधी मनन करून व त्या पासून बोध घेण्या सारखें कांहीं असल्यास ते ग्राह्य करावे. माझी मातृ भाषा मराठी नसून मी हें पुस्तक मराठी भाषेंत लिहिण्याचा हा पहिला प्रयत्न केला आहे. त्यांत भाषे संबंधी कदाचित चुका राहणें शक्य आहे, तरी सूज्ञ वाचकांनीं क्षमा करून या पुस्तकास पाठबळ देऊन मला आपला ऋणी करतील अशी आशा आहे. जर कोणी या पुस्तकांत आणखी कांहीं ज्यास्त उपयुक्त माहिती दिली तर तिचा सुद्धां विचार करून दुसऱ्या आवृत्तींत सामील करीन.

त्या माननीय अति श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांच्या चरणांत मी आपल्या श्रद्धेचीं फुलें अर्पण करून ईश्वराजवळ प्रार्थना करितों कीं, " हे अत्यंत दयाळू परमेश्वरा, तूं आपल्या दयेनें मला क्षमाकर व तसें माझ्या मातापितरांस व माझ्या आप्तांना व सर्व भाविक स्त्री पुरुषांस तूं क्षमा कर; कारण तुझें नांव करुणा सागर आहे. "

नम्र सेवक.

**गुलाम यासीनखांन.**

# अनुक्रमणिका



| | | | |
|---|---|---|---|
| अध्याय पहिला | | श्रेष्ठ प्रेषिताबद्दल हिंदु धर्मातील भविष्यें | १ ते ११ |
| अध्याय दुसरा | प्रकरण पहिलें | वेद आणि पुराणें | ११ ते १८ |
| ,, | प्रकरण दुसरें | उपनिषदें | १८ ते २३ |
| अध्याय तिसरा | प्रकरण पहिलें | लोकस्थिती आणि श्रेष्ठ प्रेषिताचें बालपण | २४ ते ४१ |
| ,, | प्रकरण दुसरें | श्रेष्ठ पैगंबराचें मक्केतील तेरा वर्षें | ४१ ते ४७ |
| ,, | प्रकरण तिसरें | हिजरत (प्रयाण) आणि धर्म प्रसार | ४७ ते ५३ |
| ,, | प्रकरण चवथें | श्रेष्ठ पैगंबराचें लग्नासंबंधी | ५३ ते ६१ |
| ,, | प्रकरण पांचवें | श्रेष्ठ प्रेषिताचें सद्गुण | ६१ ते ६४ |
| अध्याय चवथा | प्रकरण पहिलें | बायबल आणि इंजिलांतील भविष्यें | ६४ ते ७३ |
| ,, | प्रकरण दुसरें | ईराण देशांतील पारशी (अग्नी पूजक) लोकांचे धर्म ग्रंथांत त्या निर्माण होणाऱ्या श्रेष्ठ पैगंबराचें संक्षिप्त वर्णन. | ७४ ते ७६ |
| ,, | ,, | | |
| अध्याय पांचवा | ,, | सन्माननीय श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद साहेब (परमेश्वर त्यांस धन्यवाद व शांती देवो) यांनीं पुनर्जिवन केलेला-इस्लामी धर्म आणि त्यांतील औदार्य | ७७ |
| ,, | | | |
| ,, | ,, | दास-गुलामगिरी | ८५ |
| ,, | | स्त्रियांचे महत्व | ८८ |
| अध्याय सहावा | | दोष निवारक संग्रह-इस्लामी धर्माचा विस्तार | ९६ ते ११७ |

# अध्याय पहिला.

## श्रेष्ठ प्रेषिताबद्दल हिंदू धर्मांतील भविष्यें.

चांगलें शिक्षण प्राप्त केल्यानंतर प्रत्येक धर्मांतील गुह्य काय आहे याची चवकशी करण्याचा बऱ्याच ज्ञानी पुरुषांना पुरातन काळा पासून नाद आहे असें दिसतें.

जे निःपक्षपाती व सूज्ञ असे विद्वान आपल्या धर्माचे, तसेंच पर-धर्मीयांचे ग्रंथ वाचतात व पुढें त्यांतील गुह्य समजल्यावर त्यांचें जास्त ज्ञान संपादन करूं लागतात ते परधर्मी ग्रंथातील खरें इंगित समजल्यावर पुढें सहजच त्या धर्मास अनुकुल होतात. पण त्यांत कांहीं असें सुद्धां लोक आढळतात कीं त्या धर्मांतील खरें इंगित समजल्यावर त्या पासून कांहीं बोध घेऊन आपले कल्याण करून घ्यावें असें जरी त्यांना वाटत असले तरी पण ते आपल्या पुरातन सामाजिक रूढीच्या बंधनांत बांधले गेल्यामुळें " लकीरचा फकीर " या म्हणी प्रमाणेंच बनून राहतात, असें दिसतें त्याची कारणें:— (१) एकतर त्याचे मनांत जो दुसऱ्या धर्माबद्दल पुर्वी पासून वसत असलेला मत्सर पक्षपात आणि दुराग्रह असतो तो एकदम नाहींसा होत नाही.

(२) दुसरें असें कीं, जरी त्यांची मने या वरील ग्रहापासून शुद्ध झालीं तरी बाळपणा पासूनच्या सामाजिक बंधनांत जखडून गेल्यामुळें, व तसेंच संकोच आणि लज्जे मुळें. तो धर्म स्विकारण्या ते धजत नाहींत.

(३) तिसरें असें कीं, परंपरेनें किंवा पूर्वापार चालत आलेली वाडवडिलांचे मतांचा व बालपणा पासूनच ज्या रुढींचा व श्रद्धेचा ठसा त्यांच्या मनावर उमटलेला असतो तो मोठ्या मुष्कीलीने दूर होतो. ह्मणून ह्या वरून असें सिद्ध होते कीं, एकतर त्यांची मनें त्यांच्या स्वाधीन नसतात किंवा त्यांच्यांत सत्यनिष्ठा शक्ती मुळींच नसते, असें ह्मटलें तरी चालेल.

जगांतील सर्व धर्मांच्या श्रद्धा ग्रंथामध्यें शेवटीं येणाऱ्या कलि युगाचें वर्णन असून त्या युगांत लोक अज्ञानांच्या अंधःकाराच्या अशा खोल महासागरांत बुडून रानटी दशेला पोहोंचून अनायासे धर्महिन, नीतिहीन होऊन ईश्वराची स्तुती सोडून वाटेल त्या वस्तूंची पूजा करूं लागून निंद्य व क्रूर अशीं कर्में करूं लागतील व अशा समयीं एक अवतार निर्माण होऊन त्याच्या शिक्षण आणि शुद्ध राहणी मुळें ते युग पूर्ववत सत्य युगा सारखें होऊन लोकांची परिस्थिती सुधरून सत्य युगांतील लोकाप्रमाणें ते शुद्ध वर्तन करूं लागतील ह्या अवताराला प्रत्येक देशाच्या निरनिराळ्या भाषेंतील निरनिराळ्या ग्रंथात वेगवेगळालीं नांवें दिली आहेत असें भविष्य रुपीं वर्णन सांपडतें ह्मणून या अवताराचा निरनिराळ्या ग्रंथात भविष्य रुपी जो उल्लेख सांपडतो त्याचें थोडक्यांत एका मागून एक अशा प्रत्येक धर्मांतील भविष्याचें वर्णन खालीं सादर केलें आहे. करितां प्रथमतः हिंदुस्थानातील हिंदु लोकांच्या श्रद्धा ग्रंथात त्या अवताराचे जें भविष्य रुपी वर्णन आहे त्याचा विचार करूं:—

भारत खंडांतील हिंदु लोकांचे विश्वासनिय, सन्मानिय, पवित्र आणि

उत्कृष्ट असे बरेंच ग्रंथ, शास्त्रें, पुराणें व तसेंच कांहीं पत्रें व उपनिषदें आहेत जसें:—वेद, गिता, कलंकी पुराण, विष्णु पुराण, भविष्य पुराण, महाभारत, अथर्वण—अल्लोप—निषद् आणि अल्लसुक्त वगैरे या पैकीं हिंदु लोकांचें जें विश्वासनीय कल्की पुराण ह्मणून आहे. त्यांत वर्णन केलेल्या व निर्माण होणाऱ्या कलंकी अवताराच्या भविष्याचा प्रथमतः विचार करूं:—त्यांत भगवान श्रीकृष्णानीं जो भविष्य रूपीं उल्लेख केला आहे त्याचा तपशील येणें प्रमाणें:—( पुराणांत इस्लामची भविष्यवाणी ) हिंदु शास्त्राच्या मते पृथ्वी सात भागांत विभक्त आहे. प्रत्येक भागाला द्वीप ह्मणतात. पहिला भाग जंबु द्वीप ह्मणजे हिंदुस्थान होय. दुसऱ्या भागांत शामद्वीप इराण, खुरासान इत्यादि प्रदेशांत अंतर्गत होतो. तिसरा भाग शल्मळ किंवा शंबलद्वीप, या मध्यें अरबस्थान, किनआन प्रभुति देश अंतर्भूत होतात कल्की पुराणाच्या मतें ह्या शंभल भागामध्यें कल्कीचा जन्म होईल असें आहे

( १ ) शेवटच्या काळीं एक अवतार निर्माण होईल. त्याचा जन्म शंम्बल द्विपांत ( संभल ग्राममध्यें ) होईल. संस्कृत भाषेच्या ग्रंथांत शम्बल द्वीपाचा अर्थ अरब असा केला आहे, व संस्कृत भाषेचा सुप्रसिद्ध इंग्रज प्रोफेसर व विद्वान मि. म्याक्स म्युलर यांनीं सुद्धा शाम्बल द्वीपाचा अर्थ असाच केला आहे. कल्की पुराणांत लिहिलें आहे कीं, “ या अवताराच्या आईचें नांव सुमति ” असें असेल; सुमतीचा अर्थ पतिव्रता असा आहे आणि श्रेष्ट पैगंबर हजरत महंमद यांच्या आईचे नांव हजरत “ आमिना ” असें होते व आमिनाचा अर्थ पतिव्रता अमानतदार आणि सुमति असाच

होतो. पुढें कलंकी पुराणांत असे लिहिलें आहे कीं, या अवताराच्या बापाचें नांव विष्णुदास असें असेल. विष्णूचा अर्थ ईश्वर, अल्ला; आणि दास याचा याचा अर्थ बंदा, गुलाम असा आहे. तसें श्रेष्ठ पैगंबराच्या बापाचें नांव हजरत अब्दुल्ला असें होते. त्याचा अर्थ अल्लाचा बंदा किंवा अल्लाचा गुलाम दास असा आहे. ( अब्द् ह्मणजे बंदा; गुलाम, दास आणि अल्ला ह्मणजे ईश्वर विष्णु ) विष्णुदास आणि सुमति हीं दोन्ही नांवें अबदुल्ला आणि आमिना हीं जो अर्थ प्रगट करतात तोच अर्थ प्रगट करतात. कल्की पुराणांत असा सुद्धा उल्लेख आहे की, हा अवतार पर्वताच्या गुहेंत ईश्वराची प्रार्थना करील, व तेथे ईश्वर त्याला ज्ञान पढवील. पुढें त्याच्या कुळांतील लोकांपासून त्याचा छळ होईल, त्या छळामुळें त्रासून निरुपायास्तव त्याला उत्तरेकडील पर्वता पलिकडे जावे लागले ह्या अवताराला एक अति रुपवान लाल रंगाची स्त्री असेल आणि ह्या अवताराला चार बंधू असतील ते त्याच्या धर्माचा सर्व पृथ्वीवर प्रसार करतील. ”

या वरील हकीकती वरून स्पष्टपणें कळतें कीं, पर्वताच्या गुहेंत जी प्रार्थना केली ती मक्के जवळील पर्वतांत “ हिरा ” नावाची गुहा आहे. तेथें केली व तेथेंच या श्रेष्ठ पैगंबरास आपल्या दूता मार्फत ईश्वरानें “ सूरये इकरा ” ( अल्लाचें स्तुति स्तोत्र ) शिकविला होता व कुळांतील लोकांच्या छळामुळें उत्तरेकडील पर्वतात जाणें ह्मणजे श्रेष्ठ पैगंबराच्या कुळांतील कुरेशांच्या उपद्रव व छळामुळें त्रासून निरुपायास्तव श्रेष्ठ पैगंबराला मक्केच्या उत्तरेस असलेल्या पर्वतांत “ गार सुर ” नांवाच्या गुहेंत तीन

दिवस राहून पुढें तेथून मदिनेला जावे लागले ह्मणजे हिजरत करावी लागली मदिना हे शहर मक्केच्या उत्तरेलाच आहे या संबंधीं एका हिंदू कवीनें एक उर्दू भाषेंत कविता-रचली आहे ती येथें सादर केल्यास गैर वाजवी होणार नाहीं. बाबू श्यामसुंदर बासिर जनरलिस्ट कश्मीर यांची कविता:—

दिले जार है दागदारे मदिना । फली फूली है क्या बहारे मदिना ॥ १ ॥
महंमदनें फरमाई है मक्केसे हिजरत । नुमायां है इफ्ते खारे मदिना ॥ २ ॥
चलूं घरके बल मैं जहे फखरो इज्जत । बुलाये अगर ताजदारे मदिना ॥ ३ ॥
बनाऊं अभी सुरमये चष्म उसको । अगर हात आये गुबारे मदिना ॥ ४ ॥
चलो चलके बैठे नहीं श्यामसुंदर । के अर्जे वफा है दयारे मदिना ॥ ५ ॥

ह्या अवताराची अति रुपवान लाल रंगाची स्त्री ह्मटली ह्मणजे ती हजरत " आयेशा " सिद्दीका होय व त्या अवताराचे चार बंधू ह्मटले ह्मणजे ते चार आद्य-खलीफा येणें प्रमाणें होते. ( १ ) हजरत अबू बकर सिद्दीक. ( २ ) हजरत उमर फारूक ( ३ ) हजरत उसमान गनी व ( ४ ) हजरत अली करम अल्ला वजेह या सर्वांनी त्या श्रेष्ठ पैगंबराच्या धर्माचा प्रसार केला हें सर्व खरे आहे.

सरतें शेवटीं श्री कृष्णानां सांगितले आहे कीं, अहो सृष्टींतील जन जेव्हां या अवताराचा जन्म होईल, तेव्हां त्याच्या चरणावर आपले मस्तक ठेवा कारण सुबोध आणि मुक्तीचा मार्ग त्याच्याच जवळ सांपडेल. "

तरी आतां श्री कृष्णाच्या भक्तांचे आद्य कर्तव्य आहे कीं, त्यांनीं आपल्या सर्वोत्कृष्ट भगवंताचे बोलास मान देऊन श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद

यास शरण येऊन मुक्ती आणि मोक्ष प्राप्त करून घेण्यासाठीं, त्या सैयदुल खतमुल व आखरी उजमान मुरसलीनच्या दास्यत्वाची भूषण दायक माळा आपल्या गळ्यांत घालण्याचें अग्रगण्यत्व धारण करावें व या संबंधीं उपेक्षा करता कामा नये कारण हाच एक सुबोध आणि मुक्तीचा मार्ग आहे. कारण ज्या कल्कि अवतारा संबंधीं वर भविष्य रुपी उल्लेख झाला तो तंतोंतंत श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांच्या संबंधानें खरा ठरला. एका हिंदु सद्गृहस्थ ( मिस्टर महादेव प्रसाद सामी सायन्स टिचर जबलपूर ) यांनीं उर्दू भाषेंत कविता रचली, त्या कवितेचा थोडासा भाग वाचकांसाठीं खालीं देतों.

* * *

अब नहीं कुच फिक्र एक आलम जो दुष्मन होगया
दूसरा आलम तो अपना है ये रोषन होगया ॥ १ ॥
या नबी हर हालमें हो लुत्फ हामी आपका
जीनते गर्दन रहे तौके गुलामी आपका ॥ २ ॥
उसको है विर्दे जबान इस्मे गिरामी आपका
वो कोई हो है मगर मद्दाहा सामी आपका ॥ ३ ॥
ये शरफ काफी है मुझको आदो मे खुद्दाम हू
आपके बंदेका ऑका बंदये बेदाम हूं ॥ ४ ॥

मराठी भाषेंत अर्थ.

जरी हें जग शत्रु झालें तरी आतां कांहीं चिंता नाहीं
कारण दुसरें जग तर आपलें आहे, हें कळून चुकलें ॥ १ ॥

अहो, पैगंबर प्रत्येक स्थितींत आपली आम्हांवर कृपा दृष्टी असावी
आपल्या दास्यत्वाची माळा गळ्यांत असणें हेच भूषणात्मक आहे २
त्याला आपलें नांवाचें सदा स्मरणाचा जप आहे
तो कोणी असो पण मी तर आपला स्तुती करणारा स्वामी आहे ३
मी आपला दासानूदास आहे हेंच भूषण मला पुरें
स्वामी, मी आपल्या दासाचा बीन मोलाचा दास आहे. ४

हिंदुस्थानांतील हिंदू ह्मणजे आर्य, यांची प्रथमतः ज्या धर्म ग्रंथांची उत्पत्ती झाली त्याचा थोडासा इतिहास वाचकांसाठीं खालीं देत आहे.

प्रथमतः ते लोक आपलीं यज्ञ यागादि कर्मे व देवांची पूजा करित तेव्हां जे मंत्र किंवा गाणीं ह्मणत, त्या मंत्राचे समूह " वेद " ह्या नांवानें प्रसिद्ध आहेत. हे वेद प्राचीन संस्कृत भाषेंत आहेत.

विद्वान व तपश्चर्या करणाऱ्या आर्यांस ऋषि असें ह्मणत. यज्ञ यागांच्या वेळीं ते ऋषि कवनें ह्मणून आपल्या वाणीनें ईश्वर स्तुति करित, तीं ह्या वेदांत आहेत. त्या कवनांस ' सूक्तें ' असें ह्मणतात. आरंभी हीं सूक्तें लिहिलेलीं नव्हती तीं गुरु मुखांतून कानांनीं ऐकून तोंडपाठ करण्याचा प्रघात होता. प्रथम निरनिराळया ऋषींच्या आश्रमांत निरनिराळीं सूक्तें ह्मणण्याची चाल असे अशी सर्व सूक्तें कालांतरानें एकत्र करण्यांत आलीं. त्यांवरून सर्व सूक्तांच्या समूहास ' संहिता ' ह्मणजे एकीकरण असें नांव मिळालें.

आरंभी सर्व सूक्तांचा मिळून एकच ग्रंथ होता. त्यास ' ऋगवेद संहिता '

असें ह्मणत त्यांत १०५८० ऋचा ह्मणजे पर्वें आहेत कालान्तरानें यज्ञ यागादिकांत त्यांचा उपयोग करितांना, केवळ यज्ञ कृत्यांचा संबंधाचा ह्मणून जेवढा भाग होता तेवढा निराळा करण्यांत आला त्यांस 'यजुर्वेद' असे ह्मणतात ह्या यजुर्वेदांत कित्येक भाग ऋग वेदांतील आहेत; आणि यज्ञाच्या वेळेस विद्वान लोकांना जी विवेचनें व निर्णय होत, त्यांचाहि गद्यरूपानें यजुर्वेदांत समावेश केलेला आहे. तसेंच ऋगवेदांतील कित्येक भाग यज्ञाच्या वेळेस गाण्याच्या सुरांत म्हणत. त्यास 'सामवेद' म्हणतात, हे एकंदर वेदाचे मुख्य तीन भाग आहेत; ह्यांसच **'वेदत्रयी'** असें म्हणतात पुढें दुसरे अनेक विषय उपस्थित झाले, त्या सर्वांचा समावेश 'अथर्व' नांवाच्या वेदांत आहे. ह्या चार भागांची उत्पत्ती वरील क्रमानेंच झालेली आहे.

ह्या चार भागावरच ग्रंथरचना थांबली नाहीं, मोठमोठ्या यज्ञाच्या वेळेस विद्वान लोक एकत्र जमत, तेव्हां अनेक गहन विषयांवर चर्चा होत असे. यज्ञांच्या निरनिराळ्या कृत्यांवर स्वतंत्र अध्यक्ष नेमीत, त्यांत 'ब्रम्हा' म्हणून एक उपाध्यक्ष असे. यज्ञ कृत्या विषयीं वाद उपस्थित झाला असतां, त्याचा निकाल करण्याचें काम या ब्रम्ह्याकडे असे. हे वाद व निकाल पुढें पुष्कळ झाल्यामुळें त्यांचा समावेश निरनिराळ्या ग्रंथांत झाला ह्या ग्रंथास 'ब्रम्हा' या शद्बावरून 'ब्राम्हण' ही संज्ञा मिळाली. पुढें कित्येक गहन विषयांची चर्चा अरण्यांत वगैरे एकान्त स्थलीं जाऊन करणें योग्य वाटल्यामुळें ब्राम्हणांतील कांहीं भागास 'आरण्यकें' असे नांव पडलें परमेश्वर स्वरुप कसें

आहे सृष्टीची उत्पत्ति व घडामोड कोणत्या नियमानीं चालू आहे, त्याचा हेतु काय, इत्यादि गहन प्रश्नांची चर्चा विद्वानांनीं अरण्यांत एकत्र बसून केलेली असल्यामुळें, अरण्यकांतील अशा कित्येक प्रकरणांस 'उपनिषदें' हें नांव मिळालें. हे उपनिषद्-ग्रंथ मोठ्या योग्यतेचे असून, त्यांत सर्व वेदान्ताचें सार भरले आहे. मूळच्या चार संहिता व त्या प्रत्येकीचे ब्राह्मण आरण्यकें व उपनिषदें, ह्या सर्वांस 'श्रुति' किंवा 'वेद' ह्या संज्ञा आहेत.

आर्य लोक हिंदुस्थान देशांत जसजसे पसरत गेले, तसतसे अनेक बाबतींत त्यांचे मतभेद पडून त्यांच्या निरनिराळ्या शाखा बनल्या. ग्रंथ विस्तार मोठा झाल्यामुळें पाल्हाळीक विवेचनें ध्यानांत ठेवण्यास कठीण पडूं लागलीं. तेव्हां सर्व पाल्हाळ गाळून थोडक्यांत पुष्कळ अर्थाचा समावेश करणारीं व ध्यानांत ठेवण्यास सुलभ अशीं वाक्यें रचण्याचा प्रघात पडला ह्या वाक्यांस 'सूत्रें' अशी संज्ञा आहे. ह्या सूत्रांचे मुख्य भाग तीन आहेत.

( १ ) श्रौत सूत्रें ह्मणजे यज्ञ यागांचे नियम; ( २ ) गृह्य सूत्रें ह्मणजे प्रत्येकानें घरीं जे विधी करावयाचे तत्संबंधीं नियम; ( ३ ) धर्म सूत्रें ह्मणजे समाजाचें नियमन करणारे कायदे.

ह्या शिवाय व्याकरण, न्याय, वेदान्त वगैरे दुसऱ्या विषयांवरही पुढें सूत्र ग्रंथ निर्माण झाले. वर जीं धर्म सूत्रें सांगितलीं त्यांवर 'स्मृति' नांवाचे विस्तृत ग्रंथ पुढें लिहिले गेले, ते आर्यांचे कायदे होत. मनु, याज्ञवल्क्य, पाराशर वगैरेंचे स्मृति ग्रंथ बहुमान्य आहेत

श्रुति व स्मृति ह्या शिवाय आर्यांचे मुख्य ग्रंथ ह्मटले ह्मणजे इतिहास व पुराणे हे होत. इतिहासांत 'रामायण' व 'महाभारत', हे दोन ग्रंथ येतात. पुराणे अठरा आहेत. इतिहास व पुराणें ह्यांत आर्यांच्या राजवंशाचा इतिहास दिलेला आहे, श्रुति, व स्मृति, आणि पुराणें ह्यांवर हिंदु समाजाचा पाया रचिलेला आहे. स्मृतींस आधार श्रुतींचा, व पुराणांस आधार दोन्हींचा पुराणांपेक्षां स्मृतींचा अधिकार जास्त व श्रुतींचा सर्वांहून श्रेष्ठ होय

ही सर्व ग्रंथ रचना कोणत्या काळीं व कोणत्या क्रमानें झाली हें आज निश्चयानें ठरवितां येत नाहीं.

वेद ग्रंथ आज जसे उपलब्ध आहेत, तसेंच ते आरंभी रचले गेले असे दिसत नाहीं. शिवाय त्यांची हल्लींची संगति कालक्रमानुसार आहे असें ही नाहीं मधले अनेक भाग गाळलेले असावेत, असा विद्वानांचा तर्क आहे. पौराणिक काल:—वास्तविक पुराणें फार जुनी आहेत, व त्यांच्या उत्पत्ती विषयीं विद्वानांचा पुष्कळ मतभेद आहे ती फार पूर्वी पासून अस्तित्वांत आहेत. त्यांत जगदुत्पत्तीचा व प्रसिद्ध राज पुरुषांचा इतिहास दिलेला आहे. पण इ. स. च्या चवथ्या शतकांत बौध धर्माचा पाडाव करण्याच्या हेतूनें हिंदुधर्मास पुन्हा चलन मिळालें; त्या वेळीं पूर्वीच्या पुराणांत अनेक फेरफार होऊन हिंदु देवतांचें महत्व वाढले हे नवीन रचनेचें काम इ. स २५० च्या सुमारास सुरू होऊन पुढें तीन चारशे वर्षे पर्यंत चालले होते असें दिसतें; ह्मणून या कालास पौराणिक काल असें नांव दिलें आहे.

पौराणिक कालांत संस्कृत विद्येस उत्तेजन मिळून अनेक मोठमोठे ग्रंथ

निर्माण झाले; पैकीं कित्येक काव्य ग्रंथ आहेत. प्रसिद्ध पंचमहाकाव्यें ह्या काळांत निर्माण झालीं. ह्याच वेळीं पुराणांची हल्लीची रचना तयार झाली. तसेंच पूर्वीच्या अनेक ग्रंथावर व सूत्रावर ह्या काळीं मोठमोठीं भाष्यें झालीं. पंचतंत्राकार विष्णु शर्मा कवि व ग्रंथकार ह्या काळांत उदयास आला।

( शालोपयोगी भारतवर्ष )

# अध्याय दुसरा

## वेद, पुराणें आणि उपनिषदें

### प्रकरण पहिले

### वेद आणि पुराणें

**कलंकी पुराण, विष्णु पुराण आणि भविष्य पुराण.**

कल्क ह्मणजे पाप, कल्कि याचा अर्थ पापनिवाशी कल्कि ह्मणजे हरी; ( पापहारी महापुरुष ) " कलिच्या शेवटी जेव्हां सर्व माणसें विष्णूचें नांव सुद्धां विसरतील, तेव्हां हा अवतार पृथ्वी वरील सर्व पाप नाहींसे करील. तेव्हां सद्धर्माची स्थापना होईल. व तेव्हां सत्य युगाचा अविर्भाव होईल. "

(पहा कल्कि पुराण )

कलंकी:—कलीच्या अंतीं संभल ग्राममध्यें राहणाऱ्या विष्णु यशा नामक ब्राह्मणाच्या कुळांत जन्मास येणारा विष्णूचा अवतार ( श्री मन्महाभारत वनपर्व अध्याय १९० ) हा विष्णुचा दाहावा अवतार होय.

( भा. शां अ. ३४० ) श्रावण शु॥ ६ हा कल्कि जयंतीचा दिवस मानतात. कली युगाच्या शेवटीं या दिवशीं कलंकी अवतार होणार असें पुराण ग्रंथ ह्मणतात. या अवतारला निष्कलंक अवतार असें ह्मणतात. कारण कलीयुगांत मानवांची जी अवनति झाली आहे ती या अवतारांत सुधरेल व लोक सत्य युगांतल्या प्रमाणें वर्तन करतील असें पुराण ग्रंथ उल्लेखितात

विष्णु पुराणाच्या चवथ्या अंशांत..........त्याच्या मागून येणाऱ्या परकी शक, यवन, राजाबद्दल मुंड इत्यादि राजाबद्दल आणि त्याच्यामुळें सुरू झालेल्या भयंकर युगाबद्दल, आणि धर्महीन, नितिहीन अशा त्या युगाच्या शेवटीं होणाऱ्या विष्णुच्या कल्कि अवताराबद्दल भविष्य वर्तविले आहे. विष्णु पुराणाचा सहावा अंश अगदींच लहान आहे. त्यांत पुन्हा एकदां कृत, त्रेता, द्वापर व कलि या युगांची आठवण देऊन कली युगांत घडणाऱ्या गोष्टींचे भविष्यें कथन केले आहे त्याला जोडून जगाच्या निरनिराळ्या प्रलयावस्था वर्णन केल्या आहेत.

श्री भविष्य पुराण मध्यपर्व प्रतिसर्ग पर्व भाग दुसरा (मूळ भाषांतर) भाषांतरः—वे शा. सं. रा. विष्णु शास्त्री बापट पुराण प्रकाशक मंडळींनी वाई येथें 'मोदवृत' छापखान्यात प्रसिद्ध केले.

चतुर्थखंड —प्रतिसर्ग पर्व अध्याय २५ पान ५९७ यांतील उताराः— "हें त्याचे वचन ऐकून तो प्रभू तात्काळ भू लोकी कसा उत्पन्न होईल. तें हे मनां, तूं आतां ऐक नम्र झालेल्या त्या देवास विष्णु लोकीच्या महिमा करिता नमो असे वाक्य उच्चारून रम्य वचन बोललें." "८-१० अहो देवांनो संभल ग्रामांमध्यें हा **कश्यप** उत्पन्न होईल. तो विष्णु यशा नांवानें प्रसिद्ध होऊन विष्णु कीर्ति म्हणून त्याची प्रिय पत्नी असेल."

"११ तो कृष्ण लीलामय ग्रंथ मनुष्यास ऐकवील तेव्हां ते नंद कुलोत्पन्न चोहोकडून एके ठिकाणीं जमून त्या विष्णु यशा ब्राह्मणास पकडतील व त्याच्या पत्नी सह दृढ शंखळांनी बांधून त्यास लोखंडाच्या दृढ कारा-

गृहामध्यें टाकतील, कारण ते भयंकर व महाधूर्त नरक गामीच लोक असतील पण तो भगवान पूर्ण नारायण हरी व सर्व लोकांचे कल्याण करणारा महा विष्णु विष्णुकीर्तीच्या ठायीं जन्म घेईल, तो मार्गशिर कृष्ण अष्टमीच्या दिवशीं अंधारानें भरलेल्या रात्रीं देवासह सर्व ब्रह्मांड मंगल रुप करित प्रगट होईल. त्यावेळीं ब्रह्मदेव, विष्णु, गणेश, इंद्रगुह, अग्नी, यम, यक्ष, वरुण, बिभीशण, चित्त, वायु, धृव, विश्वदेवे, रवि, चंद्र, मंगल, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु व केतु येथें प्राप्त होतील व ते देव पद्यानें परमेश्वराची अशी स्तुति करतील. " तुझी अति मोठी व मूर्तिमय अशी जो जन्म शून्य माया तिच्या पूर्व मुखांतून मी प्रथमतः उत्पन्न झालों. व ज्याच्या सामर्थ्यानेच मी देवासह सर्व विश्व व्यापिलें आहे त्या पुरुषोत्तमास नमस्कार असो जन्म शून्य असा जो ईश्वर त्याच्या दक्षिण मुखांतून मी प्रथमतः उत्पन्न झालों. मी सर्वांमध्यें प्रवेश करणारा, महाकल्प करणारा, अधिकारी आहे आपल्या विष्णु या नांवानेच देवासह हें सर्व विश्व मी ज्याच्या सामर्थ्यानें व्यापिले त्या तुला नमस्कार असो " पान ५९९ " मी त्रै लोक्य व्यापिलें आहे. × × × पान ६१२ अध्याय २६ × × × " त्या वेळीं मूर्तिमंत चार वेदांगे व अठरा पुराणे यासह तेथें आनंदानें येतील. " १०-१३ व ते पुराण पुरुषाच्या अंशा पासून झालेल्या कल्की देवाची स्तुती करतील.

श्री मन्महाभारत वनपर्व अध्याय १९० यातील उतारा व कलयुगांतील लोक वृत्ती व कल्कीचा अवतार.

" महा पराक्रमी अशा विष्णु यश नामक ब्राह्मणाच्या रुपानें ब्रा-

णाऱ्या रुपानें ब्राह्मण.चें वास्तव्य असलेल्या शंभल नामक उत्कृष्ट गांवामध्यें कल्कीचा अवतार होईल. त्याच्या मनांत येताच सर्व प्रकारचीं वाहनें, आयुधें, योद्धे, शस्त्रें, आणि कवचें हीं त्याजपाशीं येतील. व तो न्यायानें विजय संपादन करून चक्रवर्ती राजा होईल आणि जिकडे तिकडे घोटाळा माजून गेलेल्या ह्या लोकांत तो लोक क्षयाचा नाश करणारा उदार बुद्धीचा आणि दै दीप्यमान असा तो ब्राह्मण अवतीर्ण होऊन शांतता करील व सर्व घोंटाळ्याचा शेवट लाऊन युगांची परिवृत्ति करील. तो ब्राह्मण ब्राह्मणांचा परिवार बरोबर घेऊन सर्वत्र वास्तव्य करणाऱ्या शुद्र अशा सर्व ही म्लेंछ समुदायाचा उच्छेद करील. "

हिंदु लोकांचे धर्म ग्रंथा पैकीं " गिता " म्हणून एक लहानसा उत्कृष्ट ग्रंथ आहे त्यात सुद्धां पुन्हा श्रीकृष्ण यांनीं महाभारताच्या युद्धांचे समयीं पांडवा पैकीं अर्जुनास उपदेश करूल फर्माविले आहे कीं, " जेव्हां सृष्टींत अधर्म आणि अज्ञान पणा वास करूं लागतो तेव्हां जगाला सत्य मार्गावर आणण्यासाठीं मला कोणत्या ना कोणत्या रुपांत जन्म घ्यावा लागतो. "

हिंदु लोकांचे जे चार सुप्रसिद्ध वेद आहेत त्या पैकीं साम वेदाचे उर्दू भाषेंत बाबू प्यारेलाल. जमीनदार रा. बरोठा यांनीं भाषांतर करून, विद्याभागर छापखाना बरोठा जिल्हा अलिगड येथें इ. स. १८९७ मध्यें प्रकाशित केले. त्यांतील एका उताऱ्याची नकल मराठी भाषेंत सादर करतो.

सामवेद भाग दुसरा, अध्याय पांचवा, पहिल्या खंडावरील कथा पान १२५ हजरत " महंमद ऋषी " श्रेष्ठ पैगंबरासंबंधीं साम वेदांतील भविष्यें मुद्दाम त्याचे नांवाची प्रशंसा पूर्वक वाखाणणी करून वर्णन केले आहे:—

" (१) तो प्रत्येक पवित्र रुढी व रिवाजाचा किंवा शिरस्त्याचा पोशिंदा.

(२) खणकावून बोलणारा

(३) त्याची अति स्तुति केलेली आहे असा इंद्र.

(४) किल्ल्यांचा विध्वंस करणारा, तरुण, शहाणा आणि अति शक्तीमान.

(५) हे त्वां दगड ठेवणारा, वालाच्या गाईंनीं भरलेल्या खळग्यास खणले ते देवासह तुझ्या चरणीं शरण आले. आणि निर्भय होऊन तुझी मदत केली.

(६) त्यांनीं स्तुतीचे भजन करून इंद्राचे गुण गाईलें, जो आपल्या शक्तीनें राज्य करतो व ज्याला हजारो अथवा त्यापेक्षां किती तरी पटीनें ज्यास्त नजराणें येतात.

श्रेष्ठ पैगंबरासंबंधीं त्यांच्या गुणांचा वेदांत वर्णन केल्या प्रमाणें पुढें दिलेल्या संक्षिप्त चरित्रांत हे सद्गुण अनायासे वाचण्यास पुढें सांपडतील.

आता पर्यंत कल्की अवतारा संबंधीं जी कांहीं माहिती उपलब्ध झाली त्यांत त्या अवताराचे काय नांव आहे ? हें अजून समजले नाहीं. कोठें त्याचा जन्म कोणत्या देशांत होईल हे आहे. कोठे त्याच्या आई बापांचा

उल्लेख आहे कोठें त्याच्या पत्नीचा तर कोठें त्याला आपल्या जन्म भूमीचा त्याग व त्याच्या मित्राचे वर्णन कोठें त्यानें केलेल्या कर्तव्यांची सुस्ती व त्याचे गुण कोठें त्याला रुपक नांवें दिली पण त्याचे खरें नांव काय आहे ह्याचा खुलासा अद्याप मिळाला नाहीं पण चार वेदांतील अथर्व वेदाच्या उपनिषदां पैकीं अथर्वण " अल्लोप–निषद् " आणि " अल्लसूक्तां " मध्यें त्याचें स्पष्ट नांव ' महंमद " रसूल अल्ला असें ह्मटले आहे. ह्मणून आतां हीं उपर्युक्त उपनिषदें उघडकीस येऊं लागली व त्यांत त्या सन्माननीय श्रेष्ठ पैगंबराचा स्पष्ट नांवानें उल्लेख असून त्याची स्तुती केलेली आहे व तो हिंदु धर्मातील कलंकी अवतार आणि इसलामी धर्मातील सन्माननीय श्रेष्ठ प्रेषित हजरत महंमद उर्फ निष्कलंक अवतार ही एकच व्यक्ति आहे. वरील उपनिषदांचा उल्लेख पुढें केला आहे.

वेदांच्या उपनिषदां संबंधी संक्षिप्त माहिती.

हिंदूचे मुख्य चार श्रद्धा ग्रंथ आहेत त्यांना वेद असें ह्मणतात त्यांची नावे येणें प्रमाणें:—(१) ऋगवेद, (२) यजुर्वेद, (३) सामवेद, आणि (४) अथर्ववेद. सर्व वेदातील विषयांचे ज्यांत स्पष्टीकरण केलेले आहेत त्यांची प्रत्येक वेदांतील उपनिषदांची संख्या खालीं दर्शविल्या प्रमाणें आहे.

| | | | | उपनिषदांची संख्या |
|---|---|---|---|---|
| (१) | | ऋगवेद, | १० उपनिषदें. | १० |
| (२) | (१) | यजुर्वेद | १९ उपनिषदें. | १९ |
| | (२) | कृष्ण यजुर्वेद | ३२ उपनिषदें. | ३२ |

| | | |
|---|---|---|
| (३) सामवेद | १६ उपनिषदें | १६ |
| (४) अथर्ववेद | ३१ उपनिषदें | ३१ |
| | | १०८ |

यजुर्वेदांतील मुक्तिका नांवाच्या उपनिषदांत सर्व उपनिषदाची यादी दिली आहे पण अथर्व वेदाला जोडून ३१ उपनिषदें दिली आहे पण त्यांत फक्त २९ उपनिषदांची नांवे सांपडतात.. त्यामुळे एकूण संख्या १०८ ऐवजी १०६ होते. तरी ती १०८ संख्या अथर्वण अल्लोपनिषद् आणि अल्लसूक्त सामील केल्यानें पुरी होते.

---

## अध्याय दुसरा

## प्रकरण दुसरे

### उपनिषदें

उपनिषदें:—उपनिषदांची व्याख्या पान १० मध्ये सुद्धां उल्लेख केलेला आहे तरी, उपनिषद्—

Certain mystical writing attached to Brahmanas, the chief aim of which is to ascertain the secret meaning of the Vedas; A kind of secret religious celebrations to which none were admitted except those who had been initiated by certain preparatory ceremonies. 108 Upnishadas are mentioned but some have been added to this number Vide Professor Waman Sheoram Apte, M. A. Poonas' Sanscrit dictionery.

उपनिषदाची व्युत्पति:—उपनिषद् हा शद्ब उप+नि+सद ह्मणजे कोणाच्या जवळ बसणें या धातू पासून निघाला आहे. ह्याचा अर्थ गुढ ज्ञानाचें शिक्षण घेण्यासाठीं छात्रानें अध्यापकाच्या अगदीं निकट बसणें हा होय. ह्मणून एकांत बैठक किंवा गुप्त बैठक असा अर्थ झाला. ह्या गुप्त बैठकीच्या कल्पने वरूनच अशा गुप्त ठिकाणीं शिकलेली गुप्त तत्वें अशी कल्पना वृद्धींगत झाली. भारतीयांच्या परंपरे प्रमाणें उपनिषद् हा शद्ब [ रहस्यम ] ह्या शद्बाशीं समनार्थक आहे व ह्याचा अर्थ गुप्त गोष्ट असा आहे. उपनिषदाच्या ग्रंथातून हि " इतिरहस्यम " व " इति उपनिषद् " हे शद्ब ठिकठिकाणीं उपयोगांत आल्याचे आढळतें. पुष्कळ उपनिषदांतून हीं तत्वें अयोग्य मनुष्याला शिकऊं नयेत ईत्यादि अर्थाची सुचना दिलेली आहे. असें ह्मटलें आहे कीं, " हीं ब्रह्म तत्वें बापानें आपल्या वडील मुलांस किंवा विश्वासु विद्यार्थ्यास शिकवावी; दुसऱ्या कोणास शिकवूं नयेत. " अशा प्रकारची ब्रह्म विद्या प्रतिपादक उपनिषदें किती आहेत याचा नक्की आकडा सांगणें अशक्य आहे. कोणी उपनिषदांची संख्या ५० मानतात. इ. स. १६५६ त उपनिषदांचे उर्दु (फारशी) भाषांतर शाहे जहान बादशाहाचा वडील मुलगा दारा यानें अनेक हिंदु पंडिताकडून करविलें. इ. स. १७७५ मध्यें या उर्दू भाषेंतील उपनिषदांचे लॅटीन मध्यें आंकेतीलड्डुपेरा यानें भाषांतर केलें. हे १८०१ व १८०२ सालीं स्ट्रॉसबर्ग येथें दोन भागांत प्रसिद्ध झालें. नंतर शोपेनहारनें ते भाषांतर वाचलें व नंतर त्याचा प्रसार युरोप मध्यें होऊन मॅक्समुल्लर, डायसन, प्रभूति विद्वद्रिरत्नांनीं उपनि-

षदांचा अभ्यास सुरु केला.

कुराण परिचय नांवाच्या पुस्तकाचा लेखक व प्रकाशक आपल्या पुस्तकांत एके ठिकाणीं वर्णन करितो कीं, प्रत्येक वेदाचे दोन दोन भाग मंत्र आणि ब्राह्मण हे होत. पहिल्या तीन वेदांचेच मंत्र आणि ब्राह्मण ही छापली गेली आहेत परंतु अथर्व वेदाचा ब्राह्मण अंश आणि मंत्रांचा कित्येक अंश अद्यापहि मुद्रित झाला नाहीं, जो भाग मुद्रित झालेला नाहीं तो "अलसूक्त" होय. म्यॅक्स मुल्लर साहेबांनीं अल्लोपनिषद् हे अलसूक्तापासून अभिन्न असल्यामुळे त्याचा उपनिषदाच्या निर्बन्टामध्यें समावेश केला नाहीं, फ्रान्सांतील पंडितांनीं त्याचा लिस्टांत समावेश केला आहे. वाचस्पतीच्या संस्कृत शद्बाच्या कोषांत अल्लसूक्त अथर्व वेदाचें सूक्त ह्मणून लिहिलेले आहे. सर राधाकांत देव बहादूर यांनीं आपल्या संस्कृत शद्बांच्या कोषांमध्यें अल्लसूक्ताला असंकोच भावानें अथर्व वेदांपैकीं ह्मणून उल्लेख केला आहे. ते अकबराच्या वेळीं रचलें गेले ही फक्त कल्पना आहे. अकबराच्या वेळीं हि गुरु नानकाला त्याचा विषय अवगत होता. शेख जिवोन ब्राह्मणाला ( तेव्हां तो मुसलमान झाला नव्हता ) राजा तोडरमल यानें अल्लसूक्त पठन करतांना ऐकून उदेपूरच्या राजाला लिहिले होते कीं, एक व्यक्ति वेदांतून असा मजकूर वाचित आहे कीं, त्यामध्यें विशेष प्रमाणांत "ल" हे अक्षर आलेले आहे."

"अल्लोपनिषद् ५२ उपनिषदांच्या अंतर्गत मोडतें ह्या उपनिषदावरून अगदीं स्पष्ट रितीनें कळून येतें कीं हें तें मुलमानांनीं रचिलेले असणें

शक्य नाहीं.

दिल्लीच्या ( बादशहाचा पुत्र ) दारा शहाच्या देखरेखी खालीं ५२ उपनिषदांपैकीं ५० उपनिषदें भाषांतरित झाली होती. जी दोन उपनिषदें गुप्त राखण्याच्या हेतूनें भाषांतरित करण्यांत आली नाहींत त्या पैकीं एक अल्लोपनिषद् होय. ”

वसुमती विद्यामंदिरा मार्फत सांप्रत वृति व बंगाली भाषांतर यांसह अल्लोपनिषद् प्रकाशित झालें आहे. वृतीच्या आरंभी वृति लेखक पंडित गंगाचरण वेदान्तविद्यासागर भट्टाचार्य यांनीं लिहीले आहे कीं, “ यथास्य ऋषीं रथर्व्वालक्ष्योपनिषद् पश्यान्नुवाच ” अथर्व ऋषीनें लक्ष्मी उपनिषद् पाहून ह्मटलें. बादशहाच्या मुलाकडून जीं उपनिषदें भाषांतरित करण्यांत आली नाहींत त्यां पैकीं हें उपनिषद् एक असेल.

कोणत्याही कामाला सुरवात करण्यापूर्वी वेदाचे जे मंत्र पठण करावें लागतात. त्यांना सूक्त असें ह्मणतात. या संबंधीं अधिक खुलासा पान ७ मध्यें झालच आहे.

“ सांप्रत वसुमति विद्यामंदिरामधून वृति बंगाली भाषांतर यांसह अल्लोपनिषद् प्रकाशित झालें आहे. पंडित श्री गंगाचरण वेदान्त विद्यासागर भट्टाचार्य यांनीं वृति केली आहे त्यानीं ह्या सर्व शद्बांचा जो अर्थ केला आहे, तेंच ह्या बाबतींत योग्य उत्तर आहे कारण त्या शद्बांचे जे अर्थ केले आहेत त्यां वरून तो सर्वच शुद्ध संस्कृत शद्ब आहेत असें ठरतें. जरी आपतत: असें वाटतें कीं, महंमद, रसूल, अकबर, इल्लला, हे अरबी शद्ब

आहेत तरी वास्तविक तसा प्रकार नाहीं; पुदर वृति वाचतांच सदर निबंध लेखकाच्या आपत्तींतील असारता तेव्हांच प्रतित होते. विश्व कोषांत अल्ल व अल्ला शद्व एकत्र लिहिण्यांत आले आहेत त्यावरून असें वाटतें कीं, ते दोन्ही शद्व एकच अर्थ दाखविणारें आहेत.

र: आपटेच्या;

~~लिहिले~~; परंतु आश्चर्याची गोष्ट अशी कीं, वाचस्पतीच्या व राजा राधाकान्त देवाच्या संस्कृत शद्व कोषांत ह्या शद्वांना स्थान मिळाले आहे ते संस्कृत शद्व नसते तर त्यांना केव्हांही त्या ~~दोन्ही~~ कोषांत स्थान मिळतेना. पूर्वोक्त वेदान्त विद्यासागरांनीं अल्ल, अल्ला शद्व संस्कृत नव्हेत ह्मणून ह्मटलेले नाहीं किंवा ते प्रक्षिप्त आहेत असें हि ह्मटलेलें नाहीं.

शेख भवान ल बहुल वचनें वेदांतून वाचित होता. असे राजा तोडरमल यानें त्याच्या त्रेंच अगोदर उदेपूरच्या राजाला कळविलें होते. त्या काळीं अकबराची सभा अनेक शास्त्रज्ञ पंडित लोकांनीं परिपूर्ण होती ह्या ठिकाणी हें सांगणें अप्रस्तुत होणार नाहीं कीं, अकबराच्याहि फार पुर्वीं पासून अथर्वण वेदांत हें सूक्त आणि अल्लोपनिषद् विद्यामान होते. जर हीं सूक्तें व उपनिषद् ही कृत्रिम असती तर दारानें तसें अवश्य मेव जाहीर केलें असतें. कारण तीं कृत्रिम आहेत असें जाहीर करण्याला त्याला योग्य संधीहि होती

तोहि कित्येक पंडित मंडळींनी वेष्टित असें जर ती कृत्रिम आहेत असें अकबर आणि दारा यांच्या पंडित मंडळीला समजते तर दाराच्या, मॅक्स मुल्लरच्या, फ्रान्सच्या राजा राधाकान्त देवाच्या, वाचस्पतीच्या व विद्यामंदीराच्या प्रतिमध्यें हें सूक्त व उपनिषद् ही अथर्वण नव्हेत असें कोणीतरी पंडितानें आज पर्यंत सिद्ध केलें असतें. ही कोणत्याही प्रमाणिक अथर्वण ग्रंथांत नाहीत असें आज पर्यंत ऐकिवांत नाहीं. हे सूक्त विश्व कोषांत आणि अल्लोपनिषद् वसुमति विद्या मंदिराच्या प्रकाशित उपनिषदाच्या श्रेणित व दयानंद सरस्वती याच्या सत्यार्थ प्रकाशांत दर्ज आहे. ही दोन्ही अथर्वण अल्लोपनिषद् आणि अल्ल सूक्त पुढें दिली आहेत.

सत्यार्थ प्रकाशाचा लेखक स्वामी दयानंद सरस्वती यांनीं फक्त हे अथर्वण अल्लोपनिषद् बनावटी व कृत्रिम आहे असे दर्शविण्याचा महा भागिरथ प्रयत्न केला आहे व ते लिहितांत कीं, हें उपनिषद् कल्पना करतां येते कीं, अकबर बादशहाच्या कारकिर्दींत कोणी रचेल असेल, व त्याला अरबी आणि संस्कृत भाषांचें पूर्ण ज्ञान अवगत असेल पण ह्याची शाबिती ते करूं शकले नाहीत.

अथर्वण अल्लोपनिषद् ह्याला अर्वाचीन, अलीकडील, कृत्रिम व बनावटी किंवा अकबर बादशहाच्या वेळीं कोणी रचिले असेल अशी जी कल्पना करतात ती निवळ सर्वस्वी खोटी आणि निराधार आहे. कारण अकबर बादशहाच्या दरबारीं बरेंच विद्वान व पंडित होतें त्या सर्वांमध्यें फैजी हाच एक विद्वान असा होता कीं. ज्याला संस्कृत आणि अरबी भाषांचें पूर्ण ज्ञान

होते. फैजी जरी हा संस्कृत भाषेचा विद्वान होता तरी त्यानें लिहिलेल्या पुस्तकांच्या यादींत अथर्वण अल्लोपनिषद् व अल्लसूक्त त्यानेंच रचिले अशा-बद्दल कोठेंच उल्लेख सांपडत नाहीं. तसेंच त्या वेळच्या निरनिराळया धर्मांच्या इतिहासकारांनीं फैजीनें रचलेल्या सर्व पुस्तकाच्या ज्या ज्या याद्या नमूद केल्या आहेत व इतिहास लिहिले आहेत त्यांत अथर्वण अल्लोपनिषद् आणि अल्लसूक्त हें फैजीनें रचिले असें कोणींच ह्मणत नाहीं.

फैजीनें संस्कृत भाषेंत कोणतेंच पुस्तक रचिले नाहीं त्यानें फक्त अनेक संस्कृत ग्रंथांची फारशी भाषेंत मात्र भाषांतरें केलीं आहेत:- उदाहरणार्थ "अनवारे सहेली" एखाद्या भाषेंत पुस्तक रचणें किंवा तसेंच एखद्या भाषेच्या पुस्तकाचें दुसऱ्या भाषेंत भाषांतर करणें ह्या केवळ दोन निरनिराळया खुब्या आहेत. तेणें करून फैजीनें संस्कृत भाषेंत एकतरी पुस्तक रचलें असतें. तर अथर्वण अल्लोपनिषद् व अल्लसूक्त हें त्यानेंच रचिलें आहे, ही कल्पना खरी तरी ठरली असती, पण अथर्वण अल्लोपनिषद् किंवा दुसरें कोणतेच पुस्तक फैजीनें संस्कृत भाषेंत मुळींच रचिलें नाहीं असे कोणीच सिद्ध करूं शकत नाहींत अशी आह्मास पक्की खात्री आहे.

फैजीनें संस्कृत भाषेंत रचलेले एखादे सुद्धां पुस्तक जर टिकाकार दाखवूं शकत नाहींत तर अथर्वण अल्लोपनिषद् व अल्लसूक्त हें त्यानेंच रचिले अशी कल्पना करणें हें सर्वस्वी खोटें नव्हे काय ?

त्याच प्रमाणें संस्कृत भाषेचा माननीय विद्वान ग्रंथकार म्यॉक्स मुल्लर यानें " एन्शट हिंदुलिटरेचर " नांवाचा ग्रंथ लिहिला आहे. त्या

ग्रंथांत त्यानें दुसऱ्या उपनिषदां बरोबर अथर्वण अल्लोपनिषदाची सुद्धां त्यांत गणणा केली आहे. जर अथर्वण अल्लोपनिषद् हे पुरातन आणि खरें नसते किंवा त्या विद्वानाला तत्संबंधीं थोडासा जरी संशय आला असतां तर त्या संस्कृत भाषेच्या माननीय विद्वानानें आपल्या ग्रंथांत मुळींच त्याचा समावेश केला नसतां.

पंचतंत्रकार विष्णुदत्त शर्मा कवि व ग्रंथकार यांचे हस्त लिखित अथर्वण अल्लोपनिषद् ज्याला अनुभव सिद्ध ( Experts ) लोकांचे ह्मणणें आहे कीं, हे अथर्वण अल्लोपनिषद् आज सतराशें वर्षांचे पुरातन असून ते इ. सनाच्या तिसऱ्या शतका मध्यें लिहिलेले आहे. कारण हा ग्रंथकार पौराणिक कालांत इ. स. २५० वर्षांनंतरच जन्मला आहे असें मागील हकिकती वरून सिद्ध होते. ते उपनिषद् सध्यां पाटना येथें खुदाबक्ष लायब्ररींत आहे. ( See Khudabax Library's Catologne ) ह्मणजे श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद ( त्यांचेवर दरूद होवो ) यांच्या निर्माण होण्याचे आधींच कितीतरी शतकें पूर्वीं हे लिहिलेले आहे.

सत्पथ गामी मुन्शी कन्हयालाल अलखधारी हे आपल्या अलखप्रकाश नांवाच्या पुस्तकांत लिहितात कीं " श्री व्यासजीनीं चार वेद रचिले. व एके काळीं हिंदुस्थानांतून वेदांगें नाहींशी झालेली होतीं. आणि हिंदूंची हजारो राज्ये झाली पण कोणींच इकडे लक्ष पुरविले नाहीं पण हे स्तुत्य कार्य त्या शाहजादा दारा शिकोनें आपल्या रात्रं दिवसाच्या महा=प्रयासानें लाखो रुपये खर्च करून शेंकडो पंडित आणि संन्याश्यांना एकत्र करून

सर्वउपनिषदांचें भाषांतर फारशी भाषेंत करविलें. " हें सूक्त आणि उपनिषद् हीं प्रक्षिप्त नाहींत याची भरपूर कारणे वर दाखविली आहेतच. तरी पण या शिवाय ती कृत्रिम ठरविण्याचा दुसराच कांहीं निराळा उद्देश आहे. असें दिसते.

वर दर्शविल्या प्रमाणें प्रथमतःच ज्या उपनिषदांची इतकी खबरदारी व जोपासना घेतली आहे. व कोणास शिकवितां येत तर नाहींतच पण मनुस्मृती आधारें ती कोणास वाचण्याची आणि ऐकण्याची मुभा नाहीं अशा प्रकारें लपऊन ठेवले जात असें शिवाय दुसऱ्याच्या थोडेसे सुद्धां चुकून नजरेस पडूं देत नसत त्यांत घालमेल करून खुपसलेला ग्रंथ (Interpolation) बनू शकत नाहीं हें सिद्ध होते. तसेच आजकाल हीं ब्रह्मतत्वें विद्या संपादल्यामुळें प्रत्येकास अनायासे पहावयास सांपडतांत व त्यांतील तत्वें उघडकीस येऊं लागलीं ह्मणून अश्या उत्कृष्ट अथर्वण अल्लोप निषदास व अल्लसूक्तास ज्या मध्यें त्या सन्माननीय श्रेष्ठ पैगंबर किंवा ज्यांस निष्कलंक अवतार याचा उल्लेख आहे ह्मणूनच तीं आतां अर्वाचीन, अलीकडील, बनावटी, किंवा कृत्रिम आहेत असे ठरविण्याचें प्रयत्न केलें जात आहेत, हे आश्चर्य नव्हे काय ? कारण अशा उत्कृष्ट अथर्वण अल्लोपनिषद् आणि अल्लसूक्त सारख्या महत्वाच्या उपनिषदांत ज्यांत त्या सन्माननीय श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद रसूल अल्ला ( त्यांचेवर दरूद होवो ) व भाषेच्या रुढी प्रमाणें ज्यांना हिंदुस्थानांत कल्की अवतार असें ह्मणतात त्यांत त्यांच्या नांवाचा स्पष्ट उल्लेख सांपडतो. आतां ही अशी उत्कृष्ट व उपयुक्त अथर्वण अल्लोपनिषद्

आणि अल्लसूक्त उघडकीस आल्यावर मग त्या सन्माननीय श्रेष्ठ पैगंबराच्या शरणी येण्यसाठीं श्री कृष्णांनीं कल्किपुराण, महाभारत आणि उत्कृष्ट अशा गितेंत आज्ञा केल्या प्रमाणें इस्लामी धर्म स्विकारावा लागेल या भितीनें या अथर्वण अल्लोपनिषद् आणि अल्लसूक्त यांना आतां पासूनच कृत्रिम ठरविण्यांत येतें यांत नवल ते काय ? पण सत्य ते सत्य आज ना उद्या उघडकीस आल्या वाचून राहणार नाहीं तसेंच हे गुप्त इंगित व तत्वें समजण्यास प्रत्येक जण दिवसे दिवस उत्सुकतेनें जास्त प्रमाणांत प्रयत्न केल्या वाचून राहणार नाहींत, हे ध्यानांत ठेविले पाहिजे.

ज्या अथर्व वेदीय अल्लोपनिषद् आणि अल्लसूक्तांत त्या सन्माननीय श्रेष्ठ पैगंबराचा उल्लेख आहे ती येथें खालीं सादर केली आहेत.

## अथर्व वेदीय अल्लोपानिषद्

॥ ॐ नमः परमात्मानें ॥ हरिः ॐ ॥

हरी ओम् । वरुणनु दिव्यनु दात्तं इल्लल्ले मित्रा–र्ही ॥ १ ॥
अस्मल्लां इल्लल्ले मित्रा वरुणा दिव्यानि धत्ते ॥ २ ॥
इल्लल्ले वरुणो राजा पुनर्ददुः ॥ ३ ॥
हव यामी मित्रो इल्लां इल्लल्ले इल्ला वरुणो मित्रो तेज कामः ॥ ४ ॥
ऱ्हू होतर मिन्द्रो होतो इन्द्रो रामा हा सु रिन्दः ।
अल्लो ज्येष्ठं श्रेष्ठं परमं पूर्ण ब्राह्मणं अल्लाम ॥ ५ ॥
ऱ्हां अल्लोह रसूल महमद रकं बरस्थ अल्लो अल्लां ।
आदल्ला बुकमेककं अल्ला बुकं निकातकम् ॥ ६ ॥

अल्लो यज्ञेन हुत्वः अल्ला सूर्य चंद्र सर्व नक्षत्राः ।
अल्लो ऋषीनां स विद्या इंद्रिय ।
पूर्व माया परमन्त अन्तरिक्षः ॥ ७ ॥
अल्लो पृथ्वीव्या अन्तरिक्षं
विश्व रुपं दिव्यानि धत्ते ।
इल्लल्ले वरुणो राजा पुनर्ददुः ।
इल्लल्ले कब्बर इल्लां कब्बर इल्लां इल्लेति इल्लल्ले ॥ ८ ॥

हरिः ॐ ॥

अस्य इल्ला इल्लल्ले मित्रा वरुणो राजा पुनर्दद्युः ।
हृय यामि मित्रो इल्लां कब्बर इल्लां
रसूल महंमद रकं बरस्य
अल्ले अल्लो पुनर्दद्युः ॥ ९ ॥

हरि ओम् ॥

अल्ला इल्लल्ला अनादि स्वरुपाय अथर्वनीं शाखांर्ही जनानाम्
पशु सिद्धान् जल चरान् अदृष्टं कुरुकुरु फट ।
असुर संहारिनीं र्हं अल्लो हरे सुर महंमद रकं बरस्ये ।
अल्लो अल्लां इल्लल्लेति इल्लल्लाः ॥ १० ॥

# अल्लसूक्त

ॐ अस्मल्लां इल्ले मित्रा वरुणो दिव्यनि धत्ते
इल्लल्ले वरुणो राजा पुनर्द्दुः ।
हव यामि मित्रो इल्ला इल्लल्लेति
इल्लल्लां वरुणो मित्रो तेज कामः
होवार मिन्द्र होतार मिन्द्रो महा सुरिन्द्राः ।
अल्लो ज्येष्ठं श्रेष्ठं परमं पूर्ण ब्राह्मण मल्लां
अल्लो रसूल महमद रकं बरस्य अल्लो
अल्लां आदल्ला बुकमेककं ।
अल्लां बुकं लिखातकं ।
अल्लो यज्ञेन हुतहुत्वः अल्ला
सूर्य्य चंद्र नक्षत्रः अल्लो ऋषिणां
सविद्या इंद्राय पूर्व माया पर मन्त
अन्तरीक्षा अल्लोपृथिवी अन्तरीक्षं
विश्व रुपां दिव्यनि धत्ते इल्लल्ले
वरुणो राजा पुनर्दुर्हुः ।
इल्लाकबर, इल्लाकबर, इल्लल्लेति
इल्लाल्लाः इल्ला इल्लल्ला अनादि
स्वरुपा अथर्वनी शाखां न्हं न्हीं
जनान पशून सिद्धान जलचराण

अदृष्टं कुरुकुरु फट ।

असुर संहारिणी हुं अल्लो रसूल

महमदरकं बरस्य अल्लो

अल्लां इल्लल्लेति इल्लल्लः ।

पुरातनकाळीं जेव्हां आर्य लोक उत्तरेकडून प्रथमतःच हिंदुस्थानांत आले तेव्हां हिंदुस्थानांत अनार्य ( हिंदुस्थानचे मुळचे रहिवाशी ) लोकांची वस्ती होती. व त्यांची मोटमोठालीं बलाढ्य राज्यें होती. पण हे मूळचे रहिवाशी रानटी स्थितींत होते असें ह्मणतात. आणि आर्यांनी त्यांच्याशी युद्धे करून व त्यांना जिंकून त्यांच्यावर आपले वर्चस्व स्थापून ते स्वतः राजे बनले. व पुढें कालांतरानें या अनार्यांना आपले दास करून टाकले, आणि त्यांना दास्यत्वाची सर्व कामें अर्पण केली. हिंदुस्थानांत आलेल्या आर्य लोकांत कोणतीच जात किंवा पंथ मुळींच नव्हता व त्यांचा वैदिक धर्म होता.

ज्या वेळीं हिंदुस्थानांत आर्य लोकांची राज्यें स्थापन झाली त्यावेळीं त्या आर्य लोकांना प्रत्येकास राज्याची वाटेल तीं कामें करावी लागत, ह्यामुळें कामांत विघ्नें येऊं लागली व कामें सुरळींत चालत नसत ह्मणून निरनिराळ्या कामामुळें चार वर्णांत त्यांचा समावेश झाला.

जे लोक धार्मिक कृत्ये, व राजमंत्री व लिहिण्या वाचण्याची कामें करित त्यांना ब्राह्मण अशी संज्ञा असे.

दुसरें:—जे लोक राज्य चालवून देशाचा पर चक्रापासून बचाव करित त्यांना क्षत्रिय अशी संज्ञा असे.

तिसरें:—ब्राह्मण आणि क्षत्रिय यांना देशाच्या उन्नतिसाठीं लागणाऱ्या जिनसा व व्यापार करून त्यास वृद्धी करणाऱ्या लोकांना वैश्य अशी संज्ञा होती.

चवथें:-वरील तीन वर्णांची राहिलेली कामें व त्यांची सेवा करणारे लोकांना शुद्र असें ह्मणत पण हे शुद्र बहुतेक हिंदुस्थान व मूळचे रहिवाशी होते.

वर दर्शविलेल्या कार्यांत प्रत्येकांनी मोठी ख्याति मिळविली व पुढें कालांतरानें स्मृती कारांनीं ह्या सर्व जाती बनवून दिल्या; वास्तवीक पाहतां ह्या जाती नव्हत्या तर धंद्यावरून हीं नांवें किंवा पदव्या दिलेल्या होत्या कारण हे वर दर्शविलेले चार वर्ण नव्हेत तर त्या धंद्या मुळें पदव्या आहेत.

या सर्वांचा धर्म ह्मटला ह्मणजे वैदिक धर्म व हिंदुस्थानांत राहिल्या-मुळें त्यांना हिंदु धर्मी ह्मणू लागले.

विद्येचे तसेंच धर्माचे सर्व संस्कार करणारे लोकांना, ब्राह्मण अशी पदवी हिंदु धर्मांत त्यांना आहे.

या वरून ब्राह्मण ही पदवी ठरली, व त्यांत ज्या ज्या कामांत आणि ग्रंथांत त्यांनीं प्रविणता प्राप्त केली त्या त्या प्रमाणांत पुढें त्यांना निरनिराळ्या पदव्या मिळत गेल्या जसें:—वेद जाणणाऱ्यांना ' वेदांति ' ह्मणतात, शास्त्रें जाणणाऱ्यांना ' शास्त्री ' असें ह्मणतात, व पुराण जाणणाऱ्यांना ' पुराणीक ' असें म्हणतात, भिक्षा मागणाऱ्यांना ' भटजी किंवा भिक्षुक ' असें म्हणतात, आणि देवळांत ( भजनालयांत ) जे लोक देवाची पूजा आर्चा करितात त्यांना ' पुजारी ' अशी संज्ञा ( पदवी ) आहे पण ' ब्रम्ह जाणें तो ब्राम्हण ' आणि ब्राह्मण कोणी जात किंवा पंथ अथवा धर्म नव्हे. ही निव्वळ कामावरून पदवी आहे. धर्म ह्मटला ह्मणजे वैदिक धर्म अथवा

हिंदु धर्म त्याच प्रमाणें इस्लामी धर्मांत सुद्धां ब्राह्मणा प्रमाणेंच निरनिराळ्या पदव्या आहेत पण भाषें मुळें व देश रिवाजाप्रमाणें पदव्यांची नांवें मात्र वेगवेगळी पण कर्तव्य व संस्कार मात्र सारखेंच.

इस्लामी धर्मंत धार्मीक तत्वें जाणणाऱ्याला मौलवी, न्याय करणाराला काजी, मसजिद, भजनालय, दर्गा वगैरे ठिकाणीं राहून धर्म संस्कार करतात त्यांना पेश ईमाम, मुजावर वगैरे पदव्या असतात जे लोक भजनालयांत धार्मिक संस्कार करतात त्यांना पुजारी (मुजावर) असे ह्मणतात आणि अशा लोकांचा दर्जा सुद्धां सर्व साधारण लोकापेक्षां ज्यास्त असतो. त्याच प्रमाणें अरबस्थानांत श्रेष्ट पैगंबराचे घराणें विद्वतेंत प्रविण होते व तेथील भजनालयाची सर्व धार्मिक संस्कार त्यांच्या पुर्वजाकडेसच त्याच पिढी पासून चालत आलेली होती, एकूण ते अरबस्थानांत भाषेच्या रुढीप्रमाणें अति उच्च अशा ब्राह्मण कुळांतच जन्मले होते असे पुढें सविस्तर वाचावयास सांपडेल.

# अध्याय तिसरा

## प्रकरण पहिले

## लोकस्थिती आणि श्रेष्ठ प्रेषिताचें बालपण

### श्रेष्ठ पैगंबराचें संक्षिप्त चरित्र

इसवी सनाच्या सहाव्या शतकांत सर्व जगांत विशेष करून एशिया खंडांतील अरबस्थानची स्थिती अधिक निर्दयास पात्र झालेली होती. देशांत जिकडे तिकडे अराजकता, पुंडाई, दरोडे, कत्तली, भांडणें, युद्धें, डाके, चोऱ्या मदिरेचे सेवन, जुगार ठगबाजी, नवजन्म बालकांची बालहत्या, व्यभिचार, स्त्रियांचा नाना तऱ्हेचा छळ, मुर्तिपूजा व झाडे, पशु, सर्प, व पक्षी वगैरे अशा सर्व वस्तु भक्तीस्थान बनल्या होत्या. देवापुढे मनुष्य बळी देणें, गुलामगिरी व गुलामांचा व्यापार तसेंच वाटेल त्याला जितक्या बायका करवतील तितक्या बायका करण्याची मुभा होती. व शिवाय त्यांना गुराढोराप्रमाणें वाटेल तेव्हां सोडून देता येई, एक शिरजोर मनुष्य क्षुल्लक गोष्टीवरून खून करून टाकी तरी पण त्याला विचारण्याचें कोणास धैर्य होत नसे एखाद्या लहानशा भांडणास युद्धाचें स्वरुप प्राप्त होई व ते एक सारखे चालूं राही. याचे मुख्य कारण म्हटले म्हणजे लोक अज्ञानाच्या खोल महासागरांत बुडून निति हीन, धर्म हीन होऊन कलि युगाच्या शेवटच्या काळास जाऊन पोहोंचले होते. तसेंच हिंदुस्थान जो एके काळीं सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंहचला होता तेथें सुद्धां लोक अज्ञानाच्या अंधःकाराच्या खोल महासागरांत बुडत चालले होते.

ह्याच समयीं बौद्ध धर्माचा ऱ्हास होण्यास सुरवात लागून आर्य लोकांच्या वैदिक धर्मास पुन्हा चलन सुरूं होते. मनुष्य मात्राची पशु समान नीच अशा स्थितींत गणणा होऊं लागली होती त्याचे उरलेलें थोडेसे स्वरूप आज तागायत न सुधारतां शुद्र आणि अस्पृश्यांशी केलेल्या वर्तनांत अझुन सुद्धां सांपडते. त्याच प्रमाणें स्त्रियांची मुळींच कांहीं योग्यता नसे, मृत नवऱ्या बरोबर तिला सुद्धां जिवंत जाळून टाकले जात असे व या चालीस "सती" ह्मणून धार्मिक स्वरूप प्राप्त झाले होते. निरनिराळे नविन धर्म व पंथ स्थापीत होत जसें शकितमत ह्मणजे वाम मार्ग पंथ, झाड, सर्प, पक्षी, पशु, मुर्ती व मनुष्य मात्राच्या लज्जेच्या वस्तूंची देवा समान भक्ति केली जात असे, अशा प्रकारची निंद्य कर्मे होऊं लागून लोक अनायासे नीतिहीन आणि धर्म हीन झाले होते.

इराण देशाचा नव शेरवान बादशहाचा अंत याच सुमारास झाला त्यामुळें त्या देशाची स्थिती सुद्धां शोचनीय झाली होती व त्या देशास उतरती कळा लागली होती, युरोप रानटी दशेला जाऊन पोहचला होता. त्याच प्रमाणें चीन देशाची स्थिती निर्दयतेची होती.

एकूण अशा कलि युगाच्या शेवटीं सर्व जगांत अज्ञानाचे साम्राज्य पसरलें होतें. त्यामुळें लोक अनायासे नितिहीन, धर्महीन बनले होते. ह्मणून वेद, पुराणें, शास्त्रें वगैरेंत दर्शविल्याप्रमाणें विष्णूचा शेवटचा दहावा अवतार ह्मणजे कल्कि अवताराची अथवा एखाद्या प्रेषित किंवा पैगंबराची लोकांना मार्ग प्रतिक्षा करणें साहजिक होते जसें:— " कलंकी:-कलीच्या अंती संभल ग्रामामध्यें राहणाऱ्या विष्णुयशा नामक ब्राह्मणाच्या कुलांत जन्मास येणारा विष्णूचा अवतार ( श्री मन्महाभारत वनपर्व अध्याय १९० ) हा विष्णूचा दहावा अवतार होय ( भारत शांतिपर्व अ. ३४० ) श्रावण शु॥ ६ हा कल्कि

जयंतीचा दिवस मानतात व कल्कि युगाच्या शेवटीं यादिवशीं कलंकी अवतार होणार असें पुराण ग्रंथ म्हणतात,

'या अवताराला निष्कलंक अवतार असें म्हणतात'

कारण कलियुगांत मानवाची जी अवनति झाली आहे ती या अवतारांत सुधारेल. व लोक सत्य युगांतल्या प्रमाणें वर्तन करतील असें पुराण ग्रंथ उल्लेखीतात"

(पहा पान १२) व (ज्ञान कोष माल भाग १० सन १९२४ इ. पान १४५)

"भयंकर युगाबद्दल, आणि धर्महीन, नीतिहीन अशा त्या युगाच्या शेवटीं होणाऱ्या विष्णू पुराणाच्या चवथ्या अंशांत भविष्यें वर्तविली आहेत" × × × "कालि या युगाची आठवण देऊन कालि युगांत घडणाऱ्या गोष्टींचें भविष्यें कथन केलें आहे. व त्याला जोडून जगाच्या निरनिराळ्या प्रलयावस्था वर्णन केल्या आहेत."

(ज्ञानकोष भाग २० पान २५६) (पहा पान १३)

"८–१० अहो देवांनो संभल ग्रामामध्यें हा "काश्यप" उत्पन्न होईल तो विष्णुयशा नांवानें प्रसिद्ध होऊन विष्णुकीर्ति म्हणून ्याची प्रिय पत्नी असेल" (श्री भविष्यें पुराण चतुर्थखंड प्रतिसर्ग पर्व अध्याय २५ पान ५९७)

"महापराक्रमी अशा विष्णुयशा नामक ब्राह्मणाच्या रुपानें ब्राह्मणाचे वास्तव्य असलेल्या शंभल नामक उत्कृष्ट गांवामध्यें कल्कीचा अवतार होईल" (श्री मन्महाभारत वनपर्व अध्याय १९०)

(पहा पान १४

या वरील ईश्वरोक्त शास्त्राधारें व ईश्वरी प्रगटीकरण व भविष्यें केल्या प्रमाणें कलि युगाच्या शेवटच्या काळीं अरवस्थानांतील (शंभल ग्राम) मक्का म्हणून जे मोठे उत्कृष्ट शहर होते तेथील पुरातन भजनालय किंवा मंदिराची सेवा म्हणजे पुजारीपण एकूण श्रेष्ट व उच्च

घराण्यांतील एका सद्गुणी, सदाचरणी आणि प्रौढ अशा वाखाणणीय व नामांकित सरदार हजरत अबदुल मतलब नावाच्या ब्राह्मणाकडे ( पहा पान १४ ) वंशपरंपरेच्या पिढ्यांपासून चालत आलेली होती. ह्या ब्राह्मण पुजाऱ्याच्या घरीं अब्दुल्ला ह्मणजे विष्णुदास नांवाचा मुलगा जन्मला ( अब्द=बंदा, गुलाम, दास आणि अल्ला=ईश्वर, विष्णु तसेच विष्णु ह्मणजे ईश्वर, अल्ला आणि दास ह्मणजे गुलाम, बंदा, अब्द )

पहा कल्की पुराणांतील भविष्य व वरील भविष्यें.

पुढें हा मुलगा वयांत आल्यानंतर त्याचा विवाह श्रेष्ठ अशा हजरत वाहब नांवाच्या ब्राह्मणाच्या कन्येशी झाला. तिचें नांव हजरत आमिना ह्मणजे पतिव्रता किंवा सुमति असें होते. या जोडप्याला एक पुत्र रत्न झाले त्याचे नांव महंमद उर्फ अहमद असे ठेविलें, आणि हाच हिंदु शास्त्रातील विष्णूचा दहावा आणि शेवटचा अवतार ज्याला " कल्कि " अवतार असें ह्मणतात तो हाच होय. याचा जन्म तारीख २९-८-५७० इ. स. आणि मुसलमानी रब्बीउल अव्वल महिन्यांत झाला ह्मणजे हिंदु लोकांची तारीख श्रावण शु॥ ६ ला झाला. ह्या दोन्ही तारखा हिशोबाने एक होणे शक्य आहे. हाच विष्णूचा दहावा आणि शेवटचा अवतार ज्याला हिंदु लोक कल्कि अवतार असे ह्मणतात आणि श्रावण शु॥ ६ ला पुराणांत उल्लेखिल्या प्रमाणें त्याच्या जन्माची कल्कि जयंति मानतात त्या तिथिला तो जन्मला. या अवताराच्या नांवाचा पुराणांत स्पष्ट उल्लेख केलेला नाहीं पण अथर्वण अल्लोप निषदांत व अल्लसूक्तांत त्याचें नांव स्पष्टपणें " महंमद रसूल अल्ला " असें सांपडते

( पहा अथर्वण अल्लोपनिषद् आणि अल्लसूक्त पान २७ ते ३० )

या अवताराच्या जन्माच्या वेळीं बरेच आश्चर्य कारक दैविक आणि अद्भुत चमत्कार घडले. ह्या अवताराच्या जन्माच्या आधींच पंचविस दिवस त्याचा बाप निवर्तला पण त्या चिमुकल्या बाळाच्या आईने आपल्या लहानशा बालकाची मोठ्या काळजीनें जोपासना

केली. आपल्या शहराची हवा बरी नसलेमुळें त्याला खेडेगांवी एका दाईच्या स्वाधीन करून दूध पाजण्याची मुदत संपताच त्या बालकाच्या आईनें त्याला आपल्यापाशीं बोलावून घेतलें. हें लहानसें बाळ बाळ-पणांतच आपल्या आईच्या ममतेच्या व संरक्षणाच्या छत्राखालीं फक्त सहा वर्षें राहिलें. पुढें त्याची आई सुद्धां निवर्तली ह्मणून त्या बाळाच्या आज्यानें त्याचें पुढें पालन पोषण केलें पण तो बाळ आठ वर्षांचा झाला नाहीं तोंच त्याचा आजा सुद्धां वारला. ह्मणून त्याच्या चुलत्याकडे ( हजरत अबुतअलिब ) त्याचे पालन पोषण आले.

ह्या लहानशा बालपणाच्या वयांतच या अवतारावर किंवा श्रेष्ठ पैगंबरावर क्रमाक्रमानें एक सारखें विकट संकटाचें प्रसंग गुदरलें. त्याचा पिता वारला, मातोश्री सुद्धां निवर्तली या वियोगामुळें ते अनाथ बनले. पुढें आजे सुद्धां मरून गेलें ईश्वरानें बालपणातच त्या बाळाच्या स्वभावात सहन शीलता, परोपकार वगैरे सारख्या उच्च दर्जाचें बी पेरून त्याला दयेचे सागर, उदार, अप्रतीम लीन बनवून त्याचे हस्ते कांहीं मोठे कार्य करवून जनतेला अज्ञानाच्या खोल महासागरांतून काढून त्यांना प्रकाशांत आणण्याचें तसेंच दुसरीं बरीचशीं सत्कार्ये करवून घेतलीं तीं पुढे वाचण्यास सांपडतील.

जेव्हां श्रेष्ठ पैगंबराचे वय बारा वर्षांचे झालें नाहीं, तोंच त्यांना आपल्या चुलत्या समागमे शामच्या मुलखांत व्यापारा निमित्त देश पर्यटन करावे लागले. शाम देशांत " बसरा " ह्मणून एक मोठें बंदर आणि शहर होतें. तेथें " अराजिस बैहराम " नांवाचा ईसाई धर्माचा एक वृद्ध विद्वान राहत असे. त्याने श्रेष्ठ पैगंबरास न्याहळून पाहिले, आपल्या पुरातन ग्रथांत पाहून तो ह्मणूं लागला कीं, " होत-करूं मुलाचे पाय पाळण्यांत दिसतात; यास्तव हा मुलगा मोठा होऊन पुढें ईश्वराच्या एकत्वाचे शंख पृथ्वीवर फुंकील, आणि चोहोंकडे या बालकाची मोठी कीर्ति होईल पुढें तो ह्मणूं लागली कीं, इंजिलमध्यें

हजरत ईसा पैगंबरानी ज्या निर्माण होणाऱ्या पैगंबराची खबर दिली आहे तो हीच व्यक्ति होय. तरी ह्या बालकाची जोपासना व काळजी घेण्यासाठीं श्रेष्ठ पैगंबराचे चुलत्यास त्यानें मुद्दाम बजावून सांगितलें."

पुढें चुलत्या समागमें श्रेष्ठ पैगंबर सुद्धां व्यापार करूं लागले आणि व्यापारांत, देवघेवी मध्यें त्यांची मोठी कीर्ति वाढत गेली. ह्मणून लोकांनीं त्यांना "अलअमीन" व "अलसिद्दीक" ह्मणजे "मोठे प्रामाणिक" व "मोठे सत्यवचनी" अशा पदव्या दिल्या. लोक आपल्या ठेवी आणून त्यांच्या जवळ अमानत म्हणून ठेऊं लागले.

श्रेष्ठ पैगंबराचे वय इ. स. ५९० मध्यें वीस वर्षांचें झालें तेव्हां त्यांनीं लोक कल्याणार्थ एक "हलफुल फजूल" नांवाची संस्था स्थापन केली. या संस्थेचा मुख्य उद्देश गोर गरीब, अनाथ आणि पिडीतांना साहाय्य करणें आणि त्यांच्या सर्व हक्कांचें संरक्षण करणें असा होता.

जेव्हां श्रेष्ठ पैगंबराचे वय पंचवीस वर्षाचे झाले तेव्हां त्यांची कीर्ति अतिशय वाढली, ही वार्ता जेव्हां एक श्रीमंत विधवा स्त्री हजरत "खदिजा" इच्या कानी पडली तेव्हां तिने श्रेष्ठ पैगंबराकडे निरोप पाठवून बोलाविले. आणि आपला कांहीं माल व नोकर चाकर त्यांच्या स्वाधीन करून व्यापारासाठीं परदेशी पाठविले. ह्या समयीं शाम देशांमधील बसरा मुक्कामी त्यांनीं आपला सर्व माल मोठ्या किफाय-तीनें विकला त्या मुळें बराच नफा मिळाला. बसरा येथें ह्यावेळीं ईसाई धर्माचा "नस्तुरा" नांवाचा विद्वान राहत असे. त्याची सुद्धां श्रेष्ठ पैगंबराची गांठ पडली व त्यानें श्रेष्ठ पैगंबरास न्याहळून पाहिले. मग त्याने आपली पुरातन पुस्तकें पाहून श्रेष्ठ पैगंबरा समागमे आलेल्या लोकांस बजाऊन सांगितले कीं, "ह्यांची तुह्मी ज्यास्त काळजी घ्या कारण हे शेवटचे पैगंबर होणार आहेत."

व्यापाराहून परत आल्यावर श्रेष्ठ पैगंबराचा प्रामाणिकपणा आणि सचोटी पाहून हजरत खदीजा इनें, तिचे वय या वेळीं जरी चाळीस वर्षांचे होते तरी श्रेष्ठ पैगंबराशीं आपलें लग्न लाऊन घेतलें. इच्यापासून पुढें दोन मुलगे १ तैयब आणि २ इब्राहीम नांवाचे जन्मले व चार मुली जन्मल्या मुलें बालपणींच मेली त्या मुळे श्रेष्ठ पैगंबरास अति दुःख झाले. मुलींची नांवें येणें प्रमाणेः—१ जैनब २ रुकिया ३ उम्मेकुलसुम आणि फातमा उर्फ कांतिपूर्णा अशी होती. ह्या पैकी रुकियाचे लग्न हजरत उसमान तिसरे खलीफाशीं झालें होतें आणि फातमा उर्फ कांतिपूर्णाचें लग्न हजरत अली चौथे खलीफाशी झालें होतें.

होतां होतां श्रेष्ठ पैगंबराची लोक हिताची ख्याति इतकी वाढली की, लोक त्यांचे हस्ते आपले निवाडे लाऊन घेत असत, व त्यांच्या मसलती घेत मक्केतील लोकांनीं मक्केत असलेले मोठे देऊळ ह्मणजे भजनालय, जे मोडकळीस आलेले होतें ते बांधण्याचें काम सुरू केलें पण त्यांत कांहीं भांडण उपस्थित झालें. तो कलह ह्मणजे इमारतीच्या पायांतील पुरातन पाषाण ठेवण्या संबंधीचा आहे, ह्याचा निवाडा होण्या करितां त्या लोकांनीं पैगंबरा कडून निकाल लाऊन घेतला त्या पाषाणास श्रेष्ठ पैगंबरांनी सर्वांच्या मरजीनें आपल्या हातांनीं योजलेल्या जागीं ठेविला. ह्या त्यांच्या निवाड्यास सर्वांनीं मान दिला. ह्या वेळीं श्रेष्ठ पैगंबराचें वय पसतीस वर्षांचे होते पहा सामवेदांतील उतारा " हे त्वां दगड ठेवणारा " या पुस्तकाचें पान १६ )

ह्या वेळे पासून श्रेष्ठ पैगंबर आपला जास्त वेळ ईश्वर सेवेंत घालूं लागले. व मक्के जवळील " हिरा " नांवाच्या गुहेंत जाऊन बसूं लागले तेथें ईश्वराचे नामें स्मरण करूं लागले. पुढें तेथेंच त्यांच्यावर " वही " उतरूं लागली ह्मणजे इश्वरी प्रगटी करण झाले, आणि ईश्वरी

देवदूत त्यांना शिकऊं लागला. अशा प्रकारें तेथें आपल्या चाळीस वर्षांचें वय होई पर्यंतचा काळ ईश्वरी आराधानेंत घातला.
( पहा पान ४ हा अवतार पर्वताच्या गुहेंत ईश्वराची प्रार्थना करील व तेथें ईश्वर त्याला ज्ञान पढवील पहा कलंकी पुराण )

---

## अध्याय तिसरा

## प्रकरण दुसरें

### श्रेष्ठ पैगंबराचे मक्केंतील तेरा वर्षें.

श्रेष्ठ पैगंबराच्या जन्माचे वेळीं जनतेची अज्ञानामुळें जी दुर्दशा झालेली होती तिचे मुख्य कारण ह्मटले ह्मणजे लोकांना शिक्षणाची मुळींच गोडी नसे. ह्मणून सर्व सुधारणा व उन्नती एकदम बंद पडल्या मुळें श्रेष्ठ पैगंबर सुद्धां निरक्षर राहिले पण ईश्वराला तर त्यांना आपल्या दूता मार्फत शिक्षण देऊन उच्च दर्जावर पोहोंचवून त्यांच्या मार्फत बरीचशीं लोकोपयोगी व कल्याण कारक कामें करवून घ्याव-याची होती. ह्मणूनच ह्या श्रेष्ठ पैगंबराला ईश्वरी साक्षात्कार होऊं लागले. त्या समयीं प्रथमतःच त्यांची पत्नी उम्मुल मोमिनीन ( मुसल-मानांची मातोश्री ) हजरत खदीजा ह्या श्रेष्ठ पैगंबराच्या आज्ञेनुसार मुर्तीपुजा वर्ज्य करून एकच ईश्वराची पवित्र अतःकरणानें स्तुती करूं लागल्या व मुलामध्यें हजरतअली जे श्रेष्ठ पैगंबराचे सख्खे चुलत भाऊ असून ज्यांचे वय फक्त दहा वर्षांचें होते त्यांनीं इस्लामी धर्म स्वीका-रला, सरते शेवटी हेच पुढें चवथें खलिफा ह्मणजे श्रेष्ठ पैगंबराचे नायब निवडले गेले. तदनंतर तरुण मनुष्यामध्यें हजरत अबुबकर

हे इस्लामी धर्मास वश झाले. आणि हेच श्रेष्ठ पैगंबरानंतर पहिले खलीफा झाले.

## गुलामगिरीचा नायनाट व सर्व मनुष्ये मात्राला एक सारखें समजणे

श्रेष्ठ पैगंबराच्या पत्नीने जैद नांवाचा इसम बाजारांतून गुलाम ह्मणून विकत घेऊन तो त्यांच्या सेवेशी दिला परंतु श्रेष्ठ पैगंबरांनीं त्यास तात्काळ मोकळे करून दिले. जरी त्याचे आईबाप त्याला आपले घरीं समागमें चालण्यास सांगू लागले तरी तो त्यांचे समागम न जातां श्रेष्ठ पैगंबराच्या सेवेसाठीं राहण्यास तत्पर झाला जरी तो आतां बंधमुक्त झाला होता. तरी लोक त्याला गुलामच ह्मणत यासाठीं श्रेष्ठ पैगंबरानीं त्याला आपल्या मुला प्रमाणें वागवूं लागले तरी सुद्धां लोक त्याला गुलामच लेखित. त्याला कोणीं गुलाम ह्मणूं नये व जगांतून गुलामगिरी नाहींशी व्हावी ह्मणून त्यांनीं जैदचे लग्न आपल्या आते बहीणीशी लाऊन दिले तरी सुद्धां लोक त्याला गुलामापेक्षां जास्त महत्व देत नसत ह्मणून श्रेष्ठ पैगंबरानीं त्याला हिबरुभाषा शिकवून " तौरेत " ( बायबल ) चा पंडित बनविला तरी सुद्धां लोकांत त्याची योग्यता वाढली नाहीं. जैद हा स्वाभाविकपणें शिपाईगिरीच्या बाण्याचा मनुष्य असून त्यांत सुद्धां तो प्रविण होता, तरी यास्तव त्याच्या योग्यतेनुसार त्याला आपल्या लहानशा सेनेचा सेनाधिपती करून त्याला एका मोहिमेवर पाठविले. आतां प्रत्येकाला त्याच्या आज्ञा पाळाव्या लागत. व मग लोकांना उमजले कीं मनुष्य मात्र सर्व एकाच ईश्वराचे दास आहेत; उच, निच, असा कोणीच नाहीं. व आतां हे खरें तत्व लोकांना श्रेष्ठ पैगंबराच्या चांगल्या शिक्षणामुळें समजूं लागले.

तसेंच ह्याच श्रेष्ठ पैगंबरावर विश्वास ठेवून इस्लामी धर्मास वश होणाऱ्यांपैकीं एका रानटी जातींतील हबशी ( शिद्दी ) कुळांतला

काळाकुट्ट, अनाथ, व निराश्रित असा बिलाल नांवाचा इसम ज्याला सुधारणेचा मुळींच गंध नव्हतां तो येऊन श्रेष्ठ पैगंबराच्या शिक्षणास लुब्ध होऊन त्यानें इस्लामी धर्माची दिक्षा घेतांचक्षणीं त्याची काया पालटली. आणि त्याला एकदम वैभव प्राप्त झाले. ह्मणजे तो सर्वोत्कृष्ट प्रेषिताच्या बाजूस जाऊन बसतो. आपणास कुलीन ह्मणविणाऱ्या अशा अमीर उमरावांच्या बरोबरीनें पंक्तींत बसून एकात्र ताटांत जेऊं लागतो ह्या मुळें त्याला आपण एक रानटी स्थितींतील नीच, गुलाम आणि तिरस्कार युक्त अशा हबशी कुळांतला आहों, हें त्याच्या ध्यानीं मनां सुद्धां येत नस ह्या सर्वांचा त्याला एकदम विसर पडला. पुढें त्याच रानटी ह्मणविणाऱ्या बिलालाचे जिम्मेस श्रेष्ठ पैगंबराच्या अति उत्तम शिक्षणामुळें मुसलमानांच्या भजनालयांत अजान देण्याचें धार्मिक सत्कार्य व भूषण दायक " मोअझनाचें पद " प्राप्त झाले. ज्या काळीं जगांत रानटीपणाचा प्रसार आणि सुधारणेचा नायनाट झालेला आहे अशा समयींचा हा वृत्तांत होय.

( पहा सामवेदः-तो पवित्र रूढी शिरस्त्यांचा पोशिदा बुक पान १६ )

त्याच प्रमाणें जुबेर बिन अव्वाम हा उम्मुल मोमिनीनच्या आप्तांतील एका इसमानें श्रेष्ठ पैगंबरावर विश्वास ठेऊन इस्लामी धर्माची दिक्षा घेतली व पुढें लवकरच बऱ्याच गरीब लोकांतील पुष्कळ लोकांनीं ज्यांत स्त्रिया आणि पुरुष सामील होते त्या सर्वांनीं एका मागून एक इस्लामी धर्माचा अंगिकार केला. पहिल्या प्रथम महंमदी धर्माचा अंगिकार करणाऱ्या लोकांत बहुतेक कुरेशी कुळांतील लोक असून श्रेष्ठ पैगंबराच्या जवळचे नातलग होते. जसे हजरत उमर हे पुढें दुसरे खलिफा झाले, हजरत उस्मान हे तिसरे खलिफा बनले. आणि अबदुल रहमान बिन आफ, साआद बिन अबिविकास ज्यांनी पुढें आपल्या पराक्रमानें इराण देश जिंकला अशा लोकांनी इस्लामी

धर्माची दिक्षा घेतली. श्रेष्ठ पैगंबराच्या चरित्रांत विशेष लक्षांत ठेवण्या सारख्या गोष्टींतील एक विलक्षण गोष्ट ह्मटली ह्मणजे सर्वांच्या आधीं श्रेष्ठ पैगंबराच्या जवळच्या आप्त मित्रांनीं इस्लामी धर्म स्विकारला. वास्तव जर श्रेष्ठ पैगंबराच्या वर्तनांत निष्पापपणा नसतां, त्याचा विश्वास बळकट नसतां, त्याचें वर्तन अनुकरणीय नसतें तर त्यांचा चुलत भाऊ, त्याची पत्नी व त्याचे निकटचे आप्त व मित्र यांचे अनुयायी मुळींच झाले नसते. श्रेष्ठ पैगंबरावरील ह्या त्या इष्ट मित्रांचा दृढभाव पाहिला असतां, त्या मुळें मनाची पक्की खात्री होते कीं, श्रेष्ठ पैगंबरानीं जें काम आपणाकडे सोपवून घेतले होते तिकडे त्यांनीं तन, मन आणि धन ही सर्वस्वी अर्पण केली होती. ही गोष्ट बऱ्याच युरोपियन आणि हिंदुस्थानी परधर्मियांना सुद्धां कबूल करावी लागली. मिस्टर म्यूर, मिस्टर स्प्रीनकर यांनीं सुद्धां कबूल केले आहे कीं, श्रेष्ठ पैगंबराच्या शुद्ध वर्तनामुळें त्यांचे इष्ट मित्रांनीं त्याचा पक्ष धरून धर्म स्विकारला. जर त्यांच्या वर्तनांत निष्पापपणा नसतां तर हेच इष्ट मित्र उलट फिरले असते. पण हेच लोक त्यांचे अति निकट वर्ती झाले.

ह्या प्रमाणें दिवसें दिवस श्रेष्ठ पैगंबराच्या अनुयायांची कुराणाच्या उत्कृष्ट शिक्षणामुळें वाढ होत गेली, हे त्यांचे शत्रु कुरेशी आणि त्यांचा पुढारी अबुजहल यांना बरें दिसेना ह्मणून त्यांनीं श्रेष्ठ पैगंबराचा छळ जास्त नेटाने सुरूं केला. श्रेष्ठ पैगंबराचे शिक्षणामुळें त्याचे अनुयायी तो छळ मुकाट्यानें सहन करित व आपल्या कार्यांत मुळींच अंतर पडूं देत नसत. पुढें इस्लामची वाढ अशा कडक उपायांस न जुमानतां एक सारखी होतच आहे यासाठीं श्रेष्ठ पैगंबराच्या शत्रुंनीं पुन्हा दुसऱ्या प्रकारें त्यांना त्रास देण्यास सुरूवात केली. ज्या गोरगरीब लोकांनीं आणि कुरेशांच्या गुलामांनीं इस्लामी धर्म

स्वीकारला होता त्यांना ते लोक दोन प्रहरच्या कडक उन्हा मध्ये तापलेल्या वाळूवर निजवून त्यांचे अंगावर त्यांनीं मोठमोठाले दगड सुद्धां ठेवण्यांस कमी केले नाहीं, पण ते बिचारे बापडे आपल्या श्रेष्ठ पैगंबरावरील व इस्लामी धर्माच्या दृढ भावनेंत ( निष्ठेंत ) मुळींच अंतर पडूं देत नसत. जेव्हां श्रेष्ठ पैगंबराच्या ह्या दुःखी, पिडीत व निराश्रित लोकांचे होत असलेले हाल दृष्टीस पडले, तेव्हां त्यांनीं त्यांत जे लोक गुलाम होते त्यांना बंद मुक्त करून घेऊन त्यांची सुटका करून दिली आणि त्यांना देश त्याग करून अबिसिनीयांत जाण्याची परवानगी दिली पण सूड ह्मणून मुळींच कोणापासून घ्यावयाचा नाहीं अशी आपल्या अनुयायास सक्त ताकीद केली ह्मणून या समयीं अबिसिनियांत जल मार्गानें १०१ एकशें एक स्त्री, पुरुष जाऊन पोहोंचले. हे कुरैशांना कळतांच त्यांनीं तेथील बादशहाच्या दरबारीं आपला जासूद श्रेष्ठ पैगंबराच्या अनुयायांना त्या देशांतून काढून लावण्याचा प्रयत्न करण्यासाठीं पाठविला. पण तेथील बादशहानें कुरैशांची मागणी कबूल केली नाहीं. आणि श्रेष्ठ पैगंबराच्या निरुपद्रवी अनुयायांस आपल्या राज्यांत वसाहत करण्याची परवानगी दिली. पुढें अबिसिनियाच्या बादशहानें देखील इस्लामी धर्माच्या सद्‌गुणास मोहित होऊन त्या धर्माची दिक्षा घेतली.

श्रेष्ठ पैगंबराच्या कुरैशी शत्रुंना जेव्हां चोहिकडून त्यांच्या छळाची निराशा झाली तेव्हां त्यांनीं एक मोठी सभा भरवून असा निश्चय ( ठराव ) केला कीं, पैगंबराच्या आणि त्यांच्या अनुयायांचा बहिष्कार केल्या शिवाय आपणास गत्यंतर नाहीं व यश प्राप्ती होत नाहीं. ह्मणून कुरैशांनीं आपल्या कार्यास सुरुवात करूं लागले. ह्या मुळें श्रेष्ठ पैगंबराला आपल्या लोकांनिशी, त्यांचे चुलते अबुतालिब यांचे मक्केहून थोड्या अंतरावर असलेल्या " शीब " नांवाच्या

ठिकाणी निरुपायास्तव जावें लागलें मक्केच्या पूर्व भागास जो पर्वताचा तुटलेला कडा आहे तेथें हें स्थळ आहे. तें ठिकाण निरुंद असून त्यांतून जाण्या येण्याचा फक्त एकच रस्ता होता. या ठिकाणीं श्रेष्ठ पैगंबर व त्यांची पत्नी आणि समागमे आलेल्या अनुयांयासह आश्रय घेऊन राहिले त्या संधीचा श्रेष्ठ पैगंबराच्या वैऱ्यांनीं फायदा घेऊन त्या ठिकाणास गराडा घालून त्या नंद कुलोत्पन्न लोकांनीं वेढा दिला आणि तीन वर्षं पर्यंत त्यांना या ठिकाणीं कैद करून ठेविले.

( पहा बुक पान १३

" ११ तो 'कृष्ण लिलामय ग्रंथ मनुष्यास ऐकवील तेव्हां ते नंदकुलोत्पन्न चोहोंकडून एके ठिकाणीं जमून त्या विष्णुयशा ब्राह्मणास पकडतील व त्याच्या पत्नीसह दृढ शंखलांनी बांधून त्यांस लोखंडाच्या दृढ काराग्रहामध्यें टाकतील, कारण ते भयंकर व महाधूर्त नरक गामीच लोक असतील "

( पहा श्री भविष्ये पुराण चतुर्थ खंड प्रतिसर्ग पर्व अध्याय २५ पान ५९७ )

या बंदी खान्यांतून निघाल्या नंतर थोड्याच दिवसांनीं ह्मणजे श्रेष्ठ पैगंबराच्या उदयाच्या १० व्या वर्षी त्यांचे चुलते हजरत अबुतालिब आणि श्रेष्ठ पैगंबराची प्रिय पत्नि उम्मुल मोमिनीन हजरत खदीजा यांचा अंत झाला हे वृत्त इ. स. ६२० मध्यें घडले. त्यामुळें श्रेष्ठ पैगंबरास अति दुःख झाले. तरीपण श्रेष्ठ पैगंबरानीं आपला धर्मोपदेश एक सारखा चालूच ठेविला. त्यामुळें कुरेशांतील बरेंच नामांकित लोकांनीं इस्लामी धर्म स्विकारला. व इ. स. ६२१ मध्यें मदिन्याचे बारा इसम मक्केंत येऊन इस्लामी धर्माची दिक्षा घेऊन परत गेले. व त्यांच्या विनंतीवरून एक उपदेशक त्यांचे समागमें पाठविला. पुढच्या सालीं इ. स. ६२२ मध्यें पुन्हा मदिनेंतून ७२ मनुष्यें आणि ३ स्त्रियां येऊन त्यांनीं इस्लामी धर्माची दिक्षा घेतली. व त्यांनीं

आपले समागमे श्रेष्ठ पैगंबरास सुद्धां जाण्याची विनंती केली. त्यांनीं आपले तन, मन, धन सर्व अर्पण करून स्वतःच्या मुलाबाळाप्रमाणें त्यांचे अनुयायांचे जें मदिनेंत पुर्वी जाऊन राहिले होते त्यांचे सरक्षण करण्याचे कबूल केले. इकडे कुरैशांना श्रेष्ठ पैगंबराचा उत्कर्ष बरा दिसेना ह्मणून त्यांनाच आतां जगांतून नाहींसे करण्याचे कट ते लोक करूं लागले, व त्यासाठीं त्यांनीं ज्यास्त नेटानें उपद्रव देण्यास सुरुवात केली. एके दिवशीं त्या श्रेष्ठ पैगंबराच्या विरोध्यांनीं संधी साधून सर्वत्र मिळून रात्रीच्या समयीं हत्यारबंद अशा तरुणांनीं जिवे मारण्याचा कट करून श्रेष्ठ पैगंबराचे घरास वेढा दिला.

---

# अध्याय तिसरा

## प्रकरण तिसरे

### हिजरत ( प्रयाण ) आणि धर्म प्रसार

पण " ज्याला ईश्वर तारी त्याला कोण मारी " या ह्मणी प्रमाणें श्रेष्ठ पैगंबर आपल्या घरांतून सुरक्षितपणें निसटून आपला एक जिवलग मित्र हजरत अबुबकर सिद्दीक यांचे समागमें निरुपायास्तव मक्केच्या उत्तरेस असलेल्या पर्वताच्या गुहेंत तीन दिवस राहून तेथून पुढें उत्तरेस मदिना ह्मणून जे शहर दीडशे मैल आहे, तेथें हिजरत केली मदिनेंत आगमन तारीख २-७-६२२ इ. रोजीं झाले. ह्या हिजरत पासून इस्लामी हिजरी सनास सुरुवात झाली. ( पहा कल्की पुराण " पुढें त्यांच्या नातलगाचा ह्मणजे समाजांतील लोकांपासून त्याला

छळ होईल त्यामुळें त्राहीत्राही होऊन निरुपायास्तव उत्तरेकडील पर्वतांत त्यास जावे लागले. ( पहा बुक पान ४ )

मदिनेंत पोहचल्यानंतर श्रेष्ठ पैगंबरानीं आपला धर्मोपदेश तेथें सुरूं केला. तेथें एक मसजीद् तयार केली व तिला लागूनच आपल्या राहण्यासाठीं एक घर बांधले, आणि आपल्या अनुयायांपैकीं जे अनाथ होते त्यांच्या साठीं सुद्धां एक मोठेसे घर बांधून दिले. तदनंतर लौकरच आपल्या पत्नीस ( उम्मुल मोमीनीन हजरत आयेशा सिद्दीका इला मक्केहून बोलावून घेतले.

श्रेष्ठ पैगंबराचे सद्गुण पाहून मदिनेंतील सर्व समाज जसेः— यहुदी, ईसाई व पारशी वगैरे मोहित होऊन त्यांनीं त्यांना आपला अध्यक्ष निवडला, आणि त्यांच्या हस्ते आपले सर्व निवाडे लाऊन घेऊं लागले. पण तेथील अबदुल्ला बिन अब्बे नांवाच्या श्रीमंत मनुष्यास श्रेष्ठ पैगंबराची ही होत असलेली उन्नति आवडली नाहीं कारण त्याला मदिन्याचे अध्यक्ष प्राप्तीची बरेंच दिवसापासून हाव होती. पण जेव्हां तेथील लोकांनीं श्रेष्ठ पैगंबराला आपला अध्यक्ष निवडला तेव्हां तो द्वेषी बनला आणि मक्केकराशी श्रेष्ठ पैगंबराच्या नाशासाठीं गुप्त रितीनें पत्र व्यवहार करून त्यांना मदिनेवर स्वारी करण्यास त्यानें प्रवृत्त केलें. मक्केकरांना ही अमोल्य संधी अनायासे प्राप्त झाली ह्मणून त्यांनीं ह्या संधीचा लाभ घेऊन कांहीं कारण नसतां मदिनेवर एकदम स्वारी केली. ह्यासमयीं श्रेष्ठ पैगंबराला खडगा खणून आपल्या लोकांच्या बचावासाठीं खंदक तयार करावी लागली व त्यांनीं मजुरा बरोबर स्वतः काम केलें.

( पहा सामवेद खडग्यास खणले. बुक पान १६ ( ५ )

श्रेष्ठ पैगंबरांनीं आपला धर्म तरवारीच्या बळावर प्रसार केला असा दोष कित्येक अडाणी लोक आपल्या गैर समजूतीनें देतात तरी

त्यांचे चरित्र अवलोकन केल्यानंतर हा पोकळ दोष देण्यांत कांहींच अर्थ नाहीं असें समजून पडेल. या शिवाय पूर्ण खुलासा अध्याय ६ मध्यें केला आहे.

प्रथमतः श्रेष्ठ पैगंबराच्या अनुयायांची संख्या फारच थोडी होती, जर त्यांनीं थोडीशी सुद्धां तरवारीची इच्छा प्रगट केली असती तर अरबस्थानासारख्या कडवे लढवय्ये लोकांनीं त्या मूठभर माणसांचा तत्काळ एका दिवसांत चुराडा करून दिला असतां. पुढें जरी त्यांच्या अनुयायांची संख्या थोडी वाढली होती तरी ते इतके नव्हते. ज्या प्रमाणें एक हजार लोकांपुढें एक दोन मनुष्याची कांहींच विषाद ( गणणा ) नाहीं त्या प्रमाणें त्यांची स्थिती होती. अशा स्थितींत जर त्यांच्याकडून कोणी एका समाजा विरुद्ध कांहीं थोडेसे सुद्धां कडक वर्तन झाले असतें तर त्या समाजाच्या मदतीस सर्व अरबस्तान उलथून पडला असता आणि मुसलमनांना कोठेंच थारा ( आश्रय ) मिळाला नसता. जरी त्यांना एवढें मोठे वैभव प्राप्त झाले होते तरी ते तरवारीच्या साहयाने आपले कार्य सिद्ध करूं शकले नसतें. लोकांना जो पोकळ भ्रम आहे त्याचे मुख्य कारण ह्मटले ह्मणजे श्रेष्ठ पैगंबराना आपल्या आणि आपल्या जिम्मेस असलेल्या निरनिराळ्या धर्मियांच्या संरक्षणार्थ ज्या बऱ्याच लढाया कराव्या लागल्या, हें असावें असें वाटतें. तथापि त्याचे दुसरे कारण ह्मटले ह्मणजे जेव्हां अरबस्थानच्या लोकांना असें वाटले कीं, श्रेष्ठ पैगंबरानीं एक नविन धर्म स्थापित केला आहे आणि त्यामुळें त्यांच्या पुरातन रुढींना आळा बसून त्यांची मुर्तिपूजा एकदम बंद पडली, ह्मणून अज्ञानपणामुळें ते लोक त्यांचे वैरी बनले, आणि जसजसी त्या श्रेष्ठ पैगंबराच्या धर्माची उन्नति होत गेली तसतसें वैर जास्त वाढत गेले; आणि हे वैमनस्य इतक्या विकोपास जाऊन पोहोंचलें कीं, ज्या कुळांत त्यांनीं

जन्म घेतला होता त्या कुरेशी लोकांना जेव्हां श्रेष्ठ पैगंबर मक्केहून मदिनेस आपल्या बचावा साठीं गेले तेव्हां सुद्धां कांहीं कारण नसतां, त्यांनीं मदिनेवर स्वारी केली. ह्याच कुरेशांनीं पूर्वी श्रेष्ठ पैगंबराच्या अनुयायांचा समुद्रा पलिकडे अबिसिनिया पर्यंत पाठलाग केला होता तेव्हां मदिना तर आतां त्यांच्याच देशांत दीडशे मैलांच्या अंतरावर होता! ह्मणून अबदुल्ला बिन अब्बेची मांगणी कांवरें ते कुरेशी लोक कबूल करणार नव्हते? ह्मणून तत्काळ मदिनेवर चालून येऊन त्यांनीं हल्ला केला. ह्या वरील गोष्टींचा आपणच शांत मनानें आणि न्यायानें विचार करा कीं, शत्रु कांहीं कारण नसतां आपल्या शहरावर चालून आले अशा स्थितींत श्रेष्ठ पैगंबर आणि त्यांच्या लोकांनीं काय करावयाचें होतें? अशा स्थितीत शत्रुंशी शौर्यानें लढून आपला बचाव करणें हाच एक उपाय राहिला होता. या पलिकडे दुसरे काय करणार ह्मणून त्यांनीं सुद्धां तेंच केलें. शत्रु जवळ जरी श्रेष्ठ पैगंबराच्या लोकांपेक्षां या समयीं चौपट सैन्य व सर्व शस्त्रांअस्त्रांनीं सज्ज होतें तरी श्रेष्ठ पैगंबरानीं आपल्या लहानशा टोळीनिशी ईश्वरावर भरवसा ठेऊन आपला बचाव करून शत्रुवर जय मिळविला.

ह्या एका लढाईमुळें पुढें एक सारखा लढायांचा क्रम सुरू झाला पण खरोखर ते दैवशाली असून व त्यांचा ईश्वरावर पक्का भरवसा होता. ह्मणूनच प्रत्येक लढाईत विजयश्री त्यांनाच प्राप्त होत गेली. व पुढें श्रेष्ठ पैगंबराचे वजन एक सारखें वाढत गेले या वाढत्या प्रमाणांतच आपल्या मनांत ईश्वरी मदतीची नेहमी आवड धरून त्यांनी मक्केची विजश्री संपादन केली. या न्यायानें प्राप्त केलेल्या जयाच्या प्रसंगी त्यांना चक्रवर्ती राज्यपद प्राप्त झाले आणि वास्तविक पूर्वी ज्या लोकांनीं त्यांचें वाईट केलें होतें व त्यांना त्रास देऊन देश त्याग करविला होता ते सर्व या समयीं श्रेष्ठ पैगंबर विसरून गेले

व त्यांनीं आपल्या उदार बुद्धीनें त्यांस क्षमा केली. आणि सर्व प्रकारें शांतता ठेविली आणि ह्या सर्व घोटाळयांचा व मूर्तिपूजेचा नायनाट करून टाकला. पुढें सर्व अरबस्थान त्यांचे अंकीत झाले. आणि सर्वांनीं मोठ्या आनंदानें त्यांच्या धर्माची दिक्षा घेतली. त्यामुळें एकदम युग पालटले. ( पहा श्री मन्महाभारत वनपर्व अध्याय १९० यांतील कल युगांतील लोकवृत्ती व कल्कीचा अवतार " महापराक्रमी अशा विष्णु यशा नामक ब्राह्मणाच्या रुपानें ब्राह्मणाचें वास्तव्य असलेल्या शंभल नामक उत्कृष्ट गांवामध्यें कल्कीचा अवतार होईल. त्याच्या मनांत येतांच सर्व प्रकारची वाहनें, आयुध्यें योद्धे, शस्त्रें आणि कवचे ही त्याजपाशी येतील व तो न्यायानें विजय संपादन करून चक्रवर्ती राजा होईल आणि जिकडे तिकडे घोटाळा माजून गेलेल्या ह्या लोकांत तो लोक क्षयाचा नाश करणारा उदार बुद्धीचा दैदीप्यमान असा तो ब्राह्मण अवतीर्ण होऊन शांतता करील. व सर्व घोटाळयाचा शेवट लाऊन युगाची परिवृत्ति करील.

( पहा बुक पान १३-१४ )

श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद ( ज्यांचेवर दरूद होवो ) यांना जे अप्रतिम यश मिळाले ह्याचे मुख्य कारण हाटले ह्मणजे ते मोठे एकनिष्ट, खरे न्यायी, व ईश्वराशिवाय दुसऱ्या कोणास कधीं न भिणारे असे होते. त्रास व आपत्ति यांना मुकाट्याने सहन करून शांतपणें व गंभीर पणानें कधी न डगमगता त्यांचा सामना करणें व कधींच निराश न होणे अशा फक्त त्यांच्यास संवयी होत्या.

मनुष्य मात्रा संबंधी नेहमी त्यांच्या मनांत अतिशय कळकळ होती. अरबस्थानासारख्या रानटी आणि मागासलेल्या देशांत राहून स्त्रियांना, गुलामांना सर्व मनुष्य मात्रांचे समाईक हक्क देऊन त्यांना अति नीच अशा दशेंतून सारख्या आणि अति उच्च अशा स्थितीला

आणणें, हीं कार्यें अशी कांहीं उत्कृष्ट आहेत कीं, त्या बद्दल सर्व मनुष्य मात्रांनीं त्यांचे आभार मानले पाहिजेत. या श्रेष्ठ पैगंबराच्या उत्कृष्ट शिक्षणामुळें लोकांची स्थिति एकदम सुधरून सत्य युगाप्रमाणें झाली.

(या बुकांतील उतरा पहा कलंकी व विष्णु पुराण.)

श्रेष्ठ पैगंबराच्या सर्व साहबी ह्मणजे अनुयायांपैकीं चार साहाबी मुख्यतः फारच प्रसिद्धीस आले व ते त्यांच्या बंधू प्रमाणें होते व त्यांनीं श्रेष्ठ पैगंबराच्या शिक्षणा प्रमाणें वागून त्यांच्या धर्माचा प्रसार केला व पुढें त्या पैकी प्रत्येकाला एका मागून एक असे खिलाफतीचे पद प्राप्त झाले त्यांची नांवें येणें प्रमाणें:—

(१) हजरत अबुबकर सिद्दीक.

(२) हजरत उमर फारूक.

(३) हजरत उसमान गनी.

आणि (४) हजरत अली करम अल्लावजेह.

(पहा कलंकी पुराण "या अवताराला चार बंधू असतील ते त्याच्या धर्माचा सर्व पृथ्वीवर प्रसार करतील. बुक पान ४)

ह्या श्रेष्ठ पैगंबरानी मोठमोठ्या वैभव शाली बादशहाशीं पत्र व्यवहार केले होते. व त्यांना मोठमोठाले हमेशा नजराणे येत असत. व त्यांनीं आपल्या शक्तीनें पुढें मक्क्याची विजयश्री मिळवून चक्रवर्ती राज्यपद प्राप्त केलें.

(पहा पान १९)

# अध्याय तिसरा

## प्रकरण चवथें

### श्रेष्ठ प्रेपिताचें लग्न संबंधी

त्याच प्रमाणें बऱ्याच लोकांचा अज्ञानपणामुळें गैर समज होऊन श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद ( ज्यांचेवर दरूद होवो ) यांनीं जी तेरा लग्नें लाविली त्याबद्दल ते बहु पत्नीवादी व ते त्यांना ऐषआरामी व स्वेच्छाचारी होते, असा दोष देतात. आणि उघडपणें ते तसेंच दिसते. पण त्यांचे चरित्र वाचलें ह्मणजे हा दोष देण्यांत कांहींच अर्थ नाहीं असें कबूल करावें लागेल.

( १ ) जेव्हां श्रेष्ठ पैगंबराचे वय फक्त पंचवीस वर्षांचे होते त्या वेळीं आपल्या तारुण्यअवस्थेंत असतां त्यांनीं आपलें पहिलें लग्न एका चाळीस वर्षाच्या विधवेशी केलें. कोणी ऐषआरामी मनुष्य आपल्या विवाह संबंधी अशी मोठी चूक कधीं करीत नाहीं. पुढें एक सारखें पंचवीस वर्षें पावेतो ह्मणजे जो पर्यंत त्यांची पहिली पत्नी जिवंत होती तो पर्यंत, त्यांनीं मुळींच दुसरें लग्न लाविले नाहीं. पहिली पत्नी वारल्यावर जेव्हां श्रेष्ठ पैगंबराचे वय त्रेपन वर्षाचे झाले तेव्हां त्यांनीं अनुक्रमानें ज्यास्त स्त्रीयांशीं लग्नें लाविलीं. या स्त्रियांपैकीं फक्त एक खेरीज करून बाकीच्या सर्व उतारवयाच्या अशा सर्व विध-वाच होत्या. हीं लग्नें त्यांनीं अशा प्रसंगी केलीं कीं, त्या वेळीं खरोखर त्याना सर्व अरबस्थानचे सार्वभौमत्व असे चक्रवर्ती पदाचें वैभव प्राप्त झालें होतें आणि लहान थोर त्यांचे अंकित होऊन त्यांच्या लहानशा इशाऱ्या प्रमाणें वागूं लागले होते. अशा समयीं यत्किंचित सुद्धां त्यांची सूचना असती तर अरबस्थानांतील लोकांनीं अति स्वरुप व लावण्य-

वती अशा मुली त्यांच्या चरणीं लग्नाकरितां अर्पण केल्या असत्या पण असें वैभव प्राप्त झाल्यावर सुद्धां त्यांनीं चाळीस व पन्नास वर्षांच्या अनाथ आणि गरीब अशा विधवाशीं लग्नें लाविल्यास आणखी कांहीं दुसरींच निराळीं कारणें होतीं. त्या पैकीं कांहींचा खुलासा सादर केला आहेः—(१) या वेळीं जगांत स्त्रियांना मुळींच कांहीं मान नसे स्त्रियांना कोठें जनावराप्रमाणें वागविले जात असे, कोठें मृत नवऱ्या बरोबर जिवंत स्त्रिला जाळून टाकले जात असें, कोठें भजनालयांत देवावर अर्पण करून सोडून दिले जात असे. व विधवांच्या पुनर्विवाह तर मुळींच अगदी बंद होता अशा समयीं सती जाणें बंद करून त्या स्त्रियांना पुनर्विवाहाचा हक्क दिला. या शिवाय दुसरें कारण असें कीं, श्रेष्ठ पैगंबरानी ज्यास्ती लग्ने लावून आपसांतील वैरत्व मोडून त्यांनी आपले नातलग करून घेतले. व एकी जोडली ही श्रेष्ठ पैगंबराच्या लग्नाची हकीकत झाली. ह्या लग्नामुळें अरबस्थानांतील कुटुंबाचे परस्पर तंटे चालले होते ते पुष्कळ नाहींसे झाले.

पुरातन इतिहासावरून असें समजतें कीं, इस्लामी धर्म प्रस्थापित होई पावतो अरबस्थानांत व एशिया खंडांत आणि विशेष करून सर्व जगांत बहुपत्न्या करण्याची चाल होती आणि ह्याच रिवाजाप्रमाणें पुरातन पैगंबर व अवतार सुद्धां अलिप्त राहिले नाहींत. जसें:-पैगंबर हजरत दाऊद यांना शंभर स्त्रिया होत्या. पैगंबर हजरत सुलेमान यांना बऱ्याच बायका होत्या, पैगंबर हजरत इब्राहिम ह्यांना दोन बायका होत्या, पैगंबर हजरत इसूफ यांना किती तरी बायका होत्या, व हिंदुस्थानांत श्री कृष्ण महाराजांच्या गोप्या मशहूरच आहेत व राजा दशरथाला बहुपत्न्या होत्या हे कोणास माहीत नाहीं असें नाहीं.

अशा समयीं यहुदी लोकांत बहुपत्नी वादी बरेच होते व ह्याचे अनुकरण अरबस्थानांत केले जात असे. जेव्हां अशा लोकांतून

कित्येक लोकांनीं इस्लामी धर्माची दिक्षा घेतली व त्यांच्या समागमें त्यांच्या स्त्रियांनी सुद्धां इस्लामी धर्म स्विकारला जसेंः—कैस इब्ने अलहर्स हा जेव्हां मुसलमान झाला तेव्हां त्याला आठ स्त्रिया होत्या ह्मणून श्रेष्ट पैगंबरानीं त्याला फर्माविले कीं, तुह्मी इस्लामी कायद्या अन्वये त्यांतून फक्त चारच वायका आपले साठीं निवडूं शकतां तसेंच जेव्हां " गल्ल्याण शकफाने " इस्लामी धर्म स्विकारला, त्याला दहा वायका होत्या त्यांनीं सुद्धां इस्लामी धर्माची दिक्षा त्याचे समागमे घेतली. पण त्याला सुद्धां असाच हुकूम मिळाला. आणि अशा प्रकारची लाखो उदाहरणें दाखल करतां येतात पण स्थळ संकोचास्तव येथें जास्त उल्लेखाची गरज नाहीं, लिहिण्याचे इतकेच कीं, इस्लामी धर्माचें आधीं सर्व साधारण बहुस्त्रिया करण्याची चाल होती. व हे अधिक सिद्ध करण्याची गरज मुळींच नाहीं कारण जबूर, तौरेत ( बायबल ) इंजील आणि दुसऱ्या पैगंबरावर निर्माण झालेल्या श्रद्धां ग्रथांत कोठेंच स्त्रियांच्या लग्ना संबंधाने उल्लेख नाहीं, फक्त पैगंबर हजरत ईसा यांचेच एक उदाहरण असें आहे कीं. आजन्म त्यांनीं मुळींच लग्न केले नाहीं. पण ह्यांचे जर लग्ना संबंधांत अनुकरण केलें तर लवकरच श्रृष्टीचा नाश होऊन जाईल. आणि हा सार्वजनीक रिवाज बनणें अति कठीण. पण त्यांनीं सुद्धां लग्न न करण्यासाठी कोठेंच ह्मटले नाहीं, पण श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांनीं घालून दिलेल्या लोकोपकारी व लोक हितचिंतक कायद्यांचा जर शांत मनाने विचार केला असतां, ते सर्व खरे, फायदेशीर, अलोप्य आणि सुखदायक असून संसाररूपी नावेंत बसून इश प्राप्तीला पोहचविणारें असून परमार्थ साधण्याची खरी वाट आहे आणि व्यभिचाराचा अनायासे प्रतिबंध होतो असे सिद्ध होते. तसेंच इस्लामी धर्म लोकांचे दुर्वतन दूर करण्यास निर्माण झाला आणि सुधारणा व सुख प्राप्ती

करण्यास सुलभ वाट दाखविते त्यांचा अभ्यास केल्याने हें सर्व समजून पडते. आणि व्यभिचार नाहींसा होऊन विषय वासनेचा त्यायी स्मृति शास्त्रानुसार कसा कायदेशीर प्रतिबंद होतो ह्याचा थोडक्यांत खुलासा दिला आहे.

स्त्रियांच्या हक्काचे, विवाहाचे. मेहेर ( कन्यादान ) वगैरे सर्व वाजवी कायदे इस्लामी धर्मा खेरीज दुसऱ्या धर्मांत मिळण दुर्मिळ

**इस्लामी धर्माने चार स्त्रिया पर्यंत एका इसमास मुभा दिली आहे.**

वास्तवीक पाहतां स्वाभाविकपणें उष्ण प्रदेशांत मनुष्याला विषयभोगाच्या वासनेची जास्त आवड असते आणि थंड प्रदेशांत याचा साहाजिक द्वेष असतो ह्याचें मुख्य कारण हवापाणी आहे.

२ जगांमध्यें सर्वच ठिकाणी स्त्रियांच्या साधारण आजारीपणांत रजस्वला होतेवेळीं, गर्भार पणांत स्त्रियांना मनुष्यापासून स्वाभाविकपणें दूर रहावे लागते.

अशा स्थितींत एक पत्निव्रत मनुष्यास किती त्रास होत असतो हे ज्याचे त्यालाच समजते. तरी त्यांत जे लोक आपली मन शुद्धी ठेऊन आपल्या विषय वासनेला आळा घालून मुकाट्यानें वसणारे लोक फारच थोडे. त्यांना आपल्या वासना पूर्ण करण्यास कांहीं निराळे मार्ग शोधावे लागतात ह्मणजे कित्येकांना व्यभिचाराचा मार्ग धारण करावा लागतो पण हे धर्मानें मोठे पातक आहे. एक पत्नीव्रत राहण्यासाठीं प्रत्येक धर्माने ताकीद केली आहे. पण एक पत्निव्रत धारण करणें कसें कठीण जाते हे वर दर्शविलेले आहे विषय वासनेपासून अलिप्त राहून मन शुद्धी ठेवण्यास कितीतरी धार्मिक बंधने घातलेले आहेत उपास करणे, ईश्वराचे जास्त नामस्मरण जपणें, दुसऱ्या चांगल्या कामांत मनाला लावणें व आपली शुद्ध राहणी ठेवणें, इतके असून सुद्धां प्रत्येकास स्वाभाविकपणें विषय सुखाची वासना

असणें साहजिक आहे व त्यामुळें शुद्ध राहणी ठेवणें मोठे कठीण पडते व व्यभिचार तर अति मोठे पातक आहे. यास्तव या पातकाचे प्रति-बंधाचा किती सौंदर्यानें इस्लामी धर्मानें उपाय सुचविला याचा विचार करणें जरूर आहे. आणि तो उपाय ह्मटला ह्मणजे आपल्याला व्यभि-चारापासून अलिप्त ठेऊन ईश्वरी निर्माण केलेल्या कायद्या अन्वये चार पर्यंत लग्नें करणें. पण त्यांत सुद्धां अटी घातलेल्या आहेत.

( १ ) जो इसम सर्व स्त्रियांचे बाबतींत एक सारखे हक्क ठेऊं शकेल त्यानेच फक्त एक पेक्षां जास्त स्त्रियांशीं लग्नें लावावीत. नाहींतर त्यानें एकाच स्त्रीशीं आपला संसार करावा.

( २ ) ज्या इसमाची स्थिती बरी आहे. त्याची प्रकृती बरी असून शरीरानें सदृढ असून निरोगी असतो व तो विषय वासना पूर्ण करण्यासाठीं व्यभिचार करूं लागतो हे धार्मिक मोठे पाप आहे तसेंच जगांत त्याची मोठी दुर्दशा होते या साठीं अशा इसमाला एका पेक्षां जास्ती लग्नें करण्याची धर्मानुसार मुभा आहे.

( ३ ) शिवाय आपले नांव आपल्या मागे जगांत रहावें अशी इच्छा प्रत्येकास असणे साहजिक आहे जर असा इसम वरील अटी परिपूर्ण करूं शकतो तर तो सुद्धां संततीं साठीं एक पासून चार पर्यंत स्त्रियांशीं लग्नें करूं शकतो

( ४ ) जो इसम श्रीमंत व सदृढ, व विषय भोगाची ज्यास्त आवड निरोगी व सर्व स्त्रियांचे सारखे हक पाळू शकतो. अशा इस-मानें एक ते चार पर्यंतच कां बरें लग्नें लावाची ? त्यापेक्षां कमि किंवा जास्त कां बरें लग्नें करूं नये ? असा प्रश्न केल्यास त्याचा सुद्धां इस्लामी धर्मांत खुलासा सांपडतो.

एखाद्या इसमानें एका स्त्रीशीं लग्न लाविले आणि ती स्त्री गरोदर झाली हे तीन महिन्यानंतर समजले त्यामुळें वैद्यकी किंवा

चिकित्सा शास्त्राधारें अशा स्त्रीशीं पुढें संबंध ठेवता येत नाहीं. ह्मणून व्यवहारांत पहिल्या स्त्रिच्या मदती साठीं दुसरें लग्न केलें ती सुद्धां गरोदर झाली असें समजतांच ह्या दोघींच्या शुश्रूषेसाठीं पुन्हा तिसरे लग्न लाविले. दैव गतीनें ही स्त्री सुद्धां गरोदर झाली व पहिली स्त्री बाळांत झाली अशा स्थितींत त्यांच्या मदती साठीं त्यानें चौथे लग्न लाविले पण ही सुद्धां गरोदर झाली आणि दुसरी स्त्री बाळांत झाली येणें प्रमाणें एका वर्षातच चारी स्त्रियां गरोदर राहून पुढें पाळीपाळीनें बाळांत होऊन पुढें संसारांत उपयोगी पडूं लागल्या ह्मणून चार स्त्रियांपेक्षां जास्त लग्नें करण्याची गरज राहिली नाहीं.

पहा बुक पान १३ पहा भविष्य पुराण अध्याय २५. ८-१० अहो देवांनो संभल ग्रामामध्यें हा "कश्यप" उत्पन्न होईल. तो विष्णूयशा नांवानें प्रसिद्ध होऊन विष्णु कीर्ति ह्मणून त्याची प्रियपत्नी असेल. "कश्यप" ह्या ऋषींचे वर्णन महाभारतांत केलेले आहे हा मिरिची ऋषीचा मुलगा होता. महाभारत आणि दुसऱ्या शास्त्राधारें त्यानें अदिती आणि दक्षाच्या आणखी बारा मुलींशीं लग्नें लाविली होती त्याने अदिती आणि अदित्याशी असी तेरा लग्नें केली होती. ज्याला तेराच पत्न्या किंवा बहुपत्नीवादी आहे असा कश्यपाशिवाय हिंदु धर्मांत दुसरा कोणीच झाला नाहीं. आणि श्रेष्ठ पैगंबराला सुद्धां तेराच पत्न्या होत्या ह्मणून भविष्य पुराणांत त्या संभल ग्रामांत निर्माण होणाऱ्या अवताराचे उघडपणें नांवाचा उल्लेख न करतां रूपक व उदाहरणार्थ ह्मणून कश्यपाची उपमा दिलेली आहे. वास्तविक पाहतां आतांतर त्या श्रेष्ठ पैगंबरासंबंधानें मुळींच संशय राहिला नाहीं कारण अरबस्थानांतील तो श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद ह्मणजे हिंदुस्थानांतील विष्णूचा शेवटचा दहावा अवतार ज्याला कल्कि अवतार असें मानतात ती आणि ही एकच व्यक्ति आहे. फक्त आप-

आपल्या भाषे मुळें निरनिराळी नांवें मात्र दिलेली आहेत. आणि ह्या अवताराला निर्माण होऊन आज साडे तेराशे वर्षे होऊन गेली. पुढें भविष्य पुराणांत अध्याय २६ पान ६१२ मध्यें असें ह्मटले आहे कीं, " त्यावेळीं मुर्तीमंत चार वेदांगे, व अठरा पुराणें, तेथें आनंदानें यतील १०-१३ व ते पुराण पुरुषाच्या अंशा पासून झालेल्या कल्की देवताची स्तुती करतील "

( पहा पान १४ )

तरी वेद, विष्णु पुराण, कल्की पुराण, भविष्य पुराण, गीता महाभारत, वनपर्व, अथर्वण अल्लोपनिषद् अथवा अलोप्य उपनिषद् आणि अलसूक्त वगैरे ग्रथांत असा उल्लेख सांपडतो. व हा कल्कि अवतार ज्याला मुसलमान लोक सन्माननीय श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद ( ज्यांचेवर दरूद होवो ) तो आपणास मनुष्य, वंदा असेंच ह्मणतो व पुराण त्याची स्तुती करतात ह्मणून हे सुद्धां खरोखर मोठे कौतुकास्पद असून मोठे भूषण दायक आहे. तसेंच वेळोवेळीं निरनिराळ्या हिंदु धर्मीय ग्रंथांत वारंवार ज्यांनी आठवणी करून दिल्या ते मोठे धन्य आणि त्यांनी असें स्तुत्य व उचित कार्य केलें तें त्यांना फारच श्रेयस्कर असून त्या लोकांनीं खरोखर जगावर मोठा उपकार केला असें ह्मटल्या वांचून राहवत नाहीं. इस्लामी धर्मात या श्रेष्ठ पैगंबराला " खतमुल मुरसलीन व पैगंबरे आखरीउजमा " इत्यादी संज्ञा आहेत ह्मणजे हे शेवटचे काळाचे पैगंबर असून यांच्या वरच पैगंबरीचा शेवट झाला व यांचे पुढें दुसरा कोणी पैगंबर किंवा अवतार निर्माण होणार नाहीं, ( पहा कल्की पुराण " शेवटच्या काळीं " एक अवतार होईल. ) हा विष्णूचा शेवटचा आणि दहावा अवतार होय. भा. शा. अ. ३४० व कली युगाच्या शेवटीं कल्की अवतार होणार असें पुराण ग्रंथ ह्मणतात.

( पहा बुक पान ३ (१)

ह्या श्रेष्ठ पैगंबरानें एके समयीं न्यायाधीशाचे काम केलें तसेंच मजुरा समागमे खंदक सुद्धां खणली. ते अशिक्षित होते तरी पंडीत व शास्त्री या सर्वांचे आद्य गुरु व आचार्य होते. ते एक शिपाई होते तरी तसेंच मोठ्या व रणशूर सेनापतीच्या पदावर सुद्धां चढले. त्यांनीच रानटी व अडाणी अशा लोकांना शिष्टाचाराचें शिक्षण देऊन त्यांना थोर आणि सर्वोत्कृष्ट बनाविले. ते कायदे कानून करणारे स्मृतिकार होते तसेंच न्यायाधीश सुद्धां होते. ते एक व्यापारी असून मोठे श्रीमंत सुद्धां होते तसेंच ते दरिद्रि स्थितींत सुद्धां राहिले. ते परोकारी परिचित असें मित्र व पूज्य असें गुरू होते. ते जगांतील मोठ मोठ्या बादशहाशी पत्र व्यवहार करित तसेंच गरीब, अनाथ व नादार अशा लोकांमध्यें मिसळून राहत. मोठमोठ्या बलाढ्य बादशहावर त्यांचा दरारा असें पण एक साधारण म्हातारी मुळींच कांहीं भीति न बाळगता मोकळ्या मनाने त्यांच्याशी सभाषण करीत असें. जरी त्यांना वैभव प्राप्त झाले तरी ते आपली स्वतःची लहान सहान कामें आपले हातांनीं करीत, अहो रात्र जाग्रण करून ईश्वर भक्तींत आपला वेळ घालीत. ते स्त्रियांचे भ्रतार असून मुलांचे बाप होते. रयतेचे पालन कर्ते असून प्रजापति होते. उम्मतचे पेशवा व रसूल सुद्धां होते. सारांश मनुष्य मात्रांच्या आयुष्यक्रमांत जितके कांहीं सदाचरण संभवल त्या सर्वांचा समुच्चय या श्रेष्ठ पैगंबरांत एकून एक अनायासे सांपडतो म्हणून अबाल वृद्ध प्रत्येक जण श्रेष्ठ पैगंबराला आपला किस्ता बनऊं शकतो. आणि त्यांच्या आयुष्यक्रमांतील रहणीचे अनुकरण केल्यानं खरोखर सर्व मन कामना प्राप्त होतात. पूर्वी निर्माण झालेले सर्व अवतार अथवा पैगंबराचें सर्व सद्गुणांचा समुच्चय ह्या एकट्या व्यक्तींत वसत होता याचे कारण जगांतील लोकांनीं त्यांच्या आयुष्य क्रमाचा धडा घेऊन अनुकरण करावे म्हणून अनाथ स्थिती

पासून तो बादशहा पर्यंतच्या सर्व अगणित क्रिया ईश्वरानें त्यांच्या आयुष्य क्रमांत त्यांच्याकडून पूर्ण करून घेतल्या.

---

## अध्याय तिसरा

## प्रकरण पांचवें

### श्रेष्ठ प्रेषिताचे सद्गुण.

श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद ( ज्यांचेवर दरूद होवो ) हे सृष्टीतील मनुष्य मात्रांचें कल्याण करण्यासाठीं निर्माण झाले होते ह्मणून त्यांना पुरुषोत्तम, खैरूलबशर व रहमतुल्लालमीन अशी सुद्धां संज्ञा आहे ह्मणजे मनुष्य जातींचा शुभ चिंतक, मानवांचे कल्याण करणारे त्याने असंख्य नियम घालून दिले त्यांपैकीं कांहींचा खालीं खुलासा केला आहे.

पृथ्वीवर जनतेला एकाच ईश्वराच्या आराधानेचा खरा मार्ग त्याच श्रेष्ठ पैगंबराने दाखविला, अद्वित्वाची ह्मणजे एकाच ईश्वराची प्रार्थना करणें त्याच्या बरोबर कोणास मुळींच सामील करूं नये असें शिक्षण दिले

मुर्तीपूजेचे सर्वस्वी खंडण केले.

ज्या काळीं लोक नितिहीन, धर्महीन बनले होते अशा काळीं विद्या संपादन करण्याची सक्तीनें हुकूम दिला. जर विद्या चीन देशांत असली तरी तेथें जाऊन ती प्राप्त करून घ्यावी असा निरोप दिला.

विद्या संपादण्याचा स्त्री व पुरुषांस सारखाच हक्क आहे. आणि धर्म संस्कारांत कोणासच मुळींच कांहीं प्रतिबंध होत नाहीं.

जगांतून गुलामगिरी नाहींशी करून तिचा नायनाट करण्याचे उपयुक्त नियम घातले.

मनुष्य मात्रांत सारखेपणा व बंधु भाव मानण्याचा शिरस्ता घातला.

स्त्रियांचे हक्क पाळवयास लाविले, त्यांची योग्यता वाढविली पुर्वी स्त्रियांचे नानातऱ्हेचे जनावरापेक्षां नीच हाल होत असत जसें मनुष्यास वाटेल तितक्या बायका करण्याची व वाटेल तेंव्हां त्यांना ढोरा प्रमाणें सोडून देण्याची मुभा होती. विधवांचा पुनर्विवाह होत नसे व कित्येक ठिकाणी तर भ्रतार मरताच जिवंत स्त्री तिच्या नवऱ्याच्या शवा समागमे जिवंत जाळून टाकली जात असें. ह्मणून विधवांचा पुनर्विवाहाचें नियम घालून सतीची चाल बंद केली.

बाल हत्तेचा प्रतिबंध करावेला व बालसंगोपण झाले.

देवा पुढें मनुष्य बळीची क्रूर व जुलमी चाल बंद करविली.

मनुष्य मात्रांतील सर्व दुर्गुण, दुर्व्यसनें, मुर्तीपूजा आणि इतर सर्व दुष्ट कृत्यें नाहींशीं केली.

लोकांना शुद्ध शिक्षण देऊन जितके कांहीं सद्गुण आहेत ते राखण्याची आज्ञा दिली.

अशा प्रकारचे लोक कल्याणकारी अगणित व उत्कृष्ट नियम प्रस्थापीत केले त्या सर्वांचा येथें अनवकाश व स्थल संकोचास्तव वर्णन करतां येत नाहीं. तरी या सुधारणेच्या काळांत त्या श्रेष्ठ पैगंबरानें घालून दिलेल्या नियमास लोक हळूंहळूं कोणत्यानाकोणत्या उपायांनी स्वीकारूं लागले आहेत.

आज पासून साडेतेराशे वर्षांपूर्वी घालून दिलेल्या नियमांस स्वीकारणें हे मोठे वाखाणणीय असून जनतेला भूषणास्पद आहे कारण ते सर्व नियम चिरायू असून सर्व कालीं एक सारखेउपयोगी पडणारे आहेत जसें शारदाबिल, शिक्षण, विधवांचा पुनर्विवाह इत्यादि आणि पुढें

हळूंहळूं याचप्रमाणें त्या श्रेष्ठ पैगंबराने घालून दिलेल्या सर्व नियमाचेंहि अनुकरण केल्या वांचून जग राहणार नाहीं हे सुद्धां खरें.

हिंदू लोकांच्या सर्व शास्त्रांतून कल्किअवतारचें वर्णन एके जागीं एकत्र करून लिहिले असतां एक लहानसे संक्षिप्त चरित्र तयार होते. त्या ग्रंथांपैकीं प्रत्येक ग्रंथांत निरानिराळीं लक्षणें उलेखिलेली आहेत. कोण्या ग्रंथांत त्या अवताराची जन्मभूमी, कलयुगाचे अखेरीस उदयास येणें तसेच आई, बाप, शिक्षणाची जागा त्याच्या घराण्यांतील लोकांच्या त्रासामुळें आपल्या जन्म भूमीचा त्याग करून उत्तरे कडील पर्वतांत जाणें त्याच्या पत्नचें वर्णन, व त्याच्या मित्रांचा कांहीं उलेख तर दुसऱ्या ग्रंथांत तो कधीं निर्माण होईल व युगाची आणि त्या वेळच्या लोकांची असलेल्या स्थितीचे वर्णन आहे. कोठें कोठें तर त्या अवतारच्या जन्मामुळें युग पालट व सुधारणा आणि विष्णूचा शेवटचा आणि दहावा अवतार असल्याबद्दल उलेख आहे. एका ग्रंथांत त्याच्या वर निर्माण होणारा ग्रंथ ज्याला " कृष्ण लिलामय ग्रंथ " ह्मटले आहे, कोण्या ग्रंथांत त्याच्या शत्रुंचा उल्लेख व त्यांच्या पासून त्याला होणारा छळ व स्त्रीसह बंदीवास व त्याला युद्धासाठीं लागणारी मदत आयुध्यें, शस्त्रें, वाहने, कवचें, वगैरेंचा उल्लेख आणि. पण स्पष्ट नांवाचा उल्लेखनकरतां दुसऱ्याची उपमा दिलेली आहे जसे त्याला कश्यप ह्मटले आहे. सरते शेंवटीं जी उपनिषदें वाचण्यास कोणास परवानगी नाहीं अशा गुप्त लपवून ठेवलेल्या उपनिषदांपैकीं अथवर्ण अल्लोपनिषद व अल्लसूक्तांत त्याच्या नांवाचा स्पष्टपणें उल्लेख सांपडतो. त्यामुळें तर शंकेचें निवारण होऊन ज्यानें एक वेळ सुद्धां श्रेष्ट पैगंबराचे चरित्र वाचले असेल त्याला निर्धास्त कबूल करावे लागते कीं हिंदुधर्मांत काल्कि अवतार ह्मणजे इसलामी धर्मांतील श्रेष्ट पैगंबर हजरत महंमद लक्ष साम्यावरून एकच व्यक्ती आहे. व तो इस्लामी पैगंबरच आहे.

त्यामुळें काल्कि अवतारच्या पुढें निर्माण होण्याचा जो पोकळ भ्रम आह तो नाहींसा होतो. आणि कबूल करावे लागते कीं, हा अवतार अरबस्थानांत निर्माण होऊन आज तेराशे अठेचाळीस वर्षे झाली.

जर हा सृष्टींतील सर्व लोकांचा हितचिंतक व लोककल्याण करणारा असा अवतार ठरला तर त्या अवताराची कोण बरें स्तुती करणार नाहीं? व त्याच्या उत्कृष्ठ उपदेशास व शिक्षणास कां बरें कोणी मानणार नाहीं? त्या निष्कलंक अवतार ह्मणजें श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांचे संक्षिप्त चरित्र आपण वाचलेंच आहात. कीं, तो जगाचा श्रेष्ट व शेवटेचा अवतार आहे. आणि तो काळ आतां दूर नाहीं, आणि हें आपण वाचलेंच आहे, त्यानें निर्माण केलेले नियम आज सुद्धां जग पाळूं लागले आहे. आणि कालांतरानें त्याचे अनुकरण केल्यावाचून जग राहणार नाहीं.

---

## अध्याय चवथा

## प्रकरण पहिले

### बायबल आणि इंजीलातील भविष्यें

या श्रेष्ठ पैगंबराच्या जन्मास येण्याच्या आधींच जगांतील प्रत्येक धर्मांतील श्रद्धाग्रंथांत त्याच्या जन्मासंबंधीं उल्लेख केलेला आहे त्यांपैकीं हिंदुस्थानांतील हिंदु लोकांचे भविष्य पाहणें झाले बाकीचे धर्मांच्या भविष्याकडे वळूं व त्यांचा तपशील अनुक्रमानें एकसारखा संक्षिप्त दिला आहे. ( तौरेत किंवा बायबलांतील भविष्या वरून वाचकांच्या सहज ध्यानी येईल.

(१) यहुद्यांचे तौरेत उर्फ वायवल ( Old Testment ) नांवाचा जो त्यांचा श्रद्धांग्रंथ आहे त्यांत हजरत मूसा पैगंबरला ईश्वरानें अशी खबर दिली होती कीं, " मी इसराईलच्या भावां मध्यें तुझा एक असा नबी ( प्रेषित ) निर्माण करीन " ( तौरेतचे उर्दु भाषांतर इतसेनारचे पुस्तक अध्याय १८ अयात १८. )

(२) हजरत दाऊद पैगंबरानी त्याचें वर्णन या प्रमाणें केलें आहे. कीं, " तू सौंदर्यांत नबी आदम पेक्षां किती तरी पटीनें देखणा आहे " ( जबूर अध्याय ४१ )

(३) हजरत सुलेमान पैगंबरानीं त्या निर्माण होणाऱ्या पैगंबराची स्तुति या प्रमाणें केली आहे. " माझा प्रियकर तेजपुंज व गौर वर्णाचा, हजारो लोकां मध्यें सरदार आहे... आणि तो सर्वस्वी महंमद आहे." ( जबूर गजलुल गजलात अध्याय १५ दरस ११ से १२ )

(१) इंजिलांतील भविष्यें पैगंबर हजरत यहिया, पैगंबर हजरत ईसा आणि त्यांच्या हवारी या सर्वांनीं आपआपल्या काळीं भविष्यें सांगितलें कीं, " अनुताप करा कारण आकाशाची बादशाही जवळ आली. " इंजिलमती बाब ३, ४, १०.

(२ तसेंच लेखक मौलाना शिबली रहमतुल्ला आलेह यांचे व प्रकाशक सयद सुलेमान निदवी यांचे " सिरतुननबी " नांवाचे पुस्तक भाग ३ यांतील श्रेष्ट पैगंबराच्या उदया संबधीं भविष्यांचा उतारा येणें प्रमाणें.

(२) हजरत ईसा पैगंबरानें श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांच्या निर्माण होण्या बद्दल जे भविष्य वर्तविले आहे. ते येणें प्रमाणें:-"आणि जेव्हां ईसा बिन मरियमनें सांगितले कीं, " अहो बनी इसराईल मी तुह्मांपाशी ईश्वराचा निरोप घेऊन व माझ्या पूर्वी जो तौरेत ( हजरत

मूसा पैगंबरावर निर्माण झालेला श्रद्धा ग्रंथ ) त्याची मी साक्ष देऊन आणि माझे नंतर " अहमद नांवाच्या एका पैगंबराच्या निर्माण होण्याची शुभ वार्ता घेऊन आलों "

(३) इंजिल युहन्नाच्या बाब ( अध्याय ) १४ मध्यें एका निर्माण होणाऱ्याची शुभवार्ता खालील शब्दांत दिली आहेः—" आणि मी आपल्या बापाशी विनंती करीन आणि तो तुह्मास दुसरा "फारकलित" देईल, कीं, तो नेहमीं तुमचे समागमे राहावा. " १४—१६

(४) पुढें पुन्हा असें वर्णन केकेलें आहे कीं:—" परंतु तो 'फारकालित " जो " रुहुल कुद्दूस " आहे त्याला माझें नांवानें बाप पाठविल. तो तुह्मांला सर्व गोष्टि शिकाविल ज्या सर्व गोष्टीं मी तुह्मांस सांगितल्या त्या गोष्टींची तुह्मांस आठवण करील. १४—२६

(५) ह्याच इंजिलच्या १५—२६ मध्यें लिहिलेले आहे कीं, " पण जेव्हां तो " फारकालित " ज्याला मी तुमचे साठीं बापा कडून पाठवीन ह्मणजे पवित्र आत्मा जो बापापासून निघतो तर तो माझ्या साठीं साक्ष देईल "

(६) पुढें ह्याच इंजीलच्या ७—१६ मध्यें दर्ज आहेः—" तरी पण मी तुह्मांस खरें सांगतों कीं, तुमच्या कल्याणासाठीं मला जाणें भाग आहे. जर मी न गेलों तर " फारकलित " तुमचे पाशी येणार नाहीं तथापि जर मी गेलों तर त्यास तुमचे पाशी पाठवून देईन. आणि तो आल्यावर जगास पापापासून सत्यानें ( न्यायानें. ) अदालतीतून दोषी ठरवील. पापापासून या करितां कीं, या श्रृष्टीचा त्या सरदाराला अधिकार दिला गेला आहे. मला तुह्मांला बऱ्याचश्या गोष्टीं सांगावयाच्या आहेत पण त्यांना तुह्मीं सहन करूं शकत नाहींत. पण जेव्हां तो पवित्र आत्मा येईल, तर तो सर्व सत्य गोष्टीं दाखवील कारण तोआपले स्वतः

चे कांहीं सांगणार नाहीं. पण जें कांहीं तो ऐकेल तेंच तो सांगेल. आणि पुढील भविष्य तुह्मांस सांगेल. आणि माझा आदर करील. यो करितां कीं, तो माझ्या गोष्टींना प्राप्त करील व तुह्मास दाखवील.

इंजिल मधील वरील अध्यायांत हजरत ईसा पैगंबरानें ज्या निर्माण होणाऱ्या पैगंबराची वारंवार खबर दिली आहे त्याला " फारकलित " असें स्पष्टीकरण केले आहे. " फारकलित " हा शद्व हिब्रू किंवा सिरयानी भाषेतील आहे. ज्याचा शद्वशः पूर्णपणें अचुक अर्थ " महंमद " अथवा " अहमद " असा आहे पुरातन काळीं याचा उच्चार " पिरइक्लियूतास " असा केला आहे.

ज्याचा अर्थ " फारकलित " अथवा " अहमद " चा समानार्थक आहे. ह्यामुळें तर इस्लामी धर्माला अधिक मोठी पुष्टीकरण मिळून वळकटी येते व मग त्याचा सत्य पणा दृष्टीस पडतो.

पुन्हा "तौरेत "( बायबल ) जो हजरत मूसा पैगंबरावर निर्माण झाला होतां त्यांत खाली दर्शविल्या प्रमाणें भविष्य दर्ज आहे:-

" ईश्वर सीना पर्वतावरून आला, आणि सईर पर्वताहून उद्भवला आणि फारानच्या पर्वतावर प्रकाशित झाला " ( अस्तशना ३२ )

ह्याच वरील भविष्याचा एका भागाचा उल्लेख हजरत "हबकूक" नबीनें पुन्हा केला आहे. तो येणें प्रमाणें. "

" ईश्वर " तीमान " वरून आणि जो पवित्र आहे तो " फारान " च्या पर्वतावरून आला, त्याच्या वैभवानें आकाश झांकलें गेलें व पृथ्वी त्याच्या स्तुतीनें उत्कर्ष पावेल ( ३ — ३ )

" अस्तनाच्या ग्रंथांत त्या भविष्यामध्यें ईश्वराचा देखावा पर्वतावर दर्शविला गेला आहे.

" सीना पर्वत, सीयर पर्वत, आणि फारान पर्वत हे तीनच पर्वत वास्तविक पाहतां पैगंबरांच्या प्रकाशित होण्याचीं ठिकाणें आहेत. " सीना पर्वतावर हजरत ईसा आणि " फारान " पर्वतावर श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद हे प्रगट झाले. " फरान " हे मक्के जवळील पर्वताचें नांव आहे.

श्रेष्ठ पैगंबराची निरनिराळया ग्रंथकारांनीं लिहिलेली असंख्य चरित्रें व सफर नामे आहेत, त्यामध्यें वर्णन सांपडते कीं, " यहुदी आणि ईसाई धर्मांतील वहुतेक विद्वान लोकांना पुरातन पुस्तकांत लिहिल्या प्रमाणें श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांच्या निर्माण होण्याचा काळ ( वेळ ) माहित होता ह्मणून " सैफ " नांवाच्या यमनच्या सर-दारानें श्रेष्ठ पैगंबराचे आजे हजरत अबदुल मतलब यांना शेवटचा श्रेष्ठ पैगंबराच्या उदयाची अशी खवर दिली होती कीं, तुमच्या कुळांत लौकरच शेवटचा नवी निर्माण होणार आहे.

II पुढें श्रेष्ठ पैगंबर निर्माण झाल्यावर त्यांचे वारा वर्षांचे वय झाले नाहीं तोंच त्यांना त्यांचे चुलते ( हजरत अवुतालीव ) यानीं आपले समागमे व्यापारासाठीं शाम ( इराक अरव ) मध्यें नेले. तेथें एक ईसाई धर्माचा वृद्ध विद्वान मुनी राहत असें त्याचे नांव " बहेरा राहिब " असें होतें. त्यानें श्रेष्ठ पैगंबरास पाहून त्याच्या चुलत्यास तत्काळ सांगितलें, कीं, " तुह्मी या बाळाची चांगली खबरदारी घ्यावी कारण हा मोठा होऊन शेवटचा पैगंबर होईल कारण मीं आपल्या पुरातन श्रद्धा ग्रंथांत जें वर्णन त्या निर्माण होणाऱ्या पैगंबरासंबंधीं पाहिले ते सर्व एकूणएक या मुलांत सांपडतात. तरी यहुदी लोक या वाळाच्या जिवाचे शत्रु वनतील "

III ज्यावेळीं श्रेष्ठ पैगंबर २५ वर्षांचे झाले त्यावेळीं त्यांना पुन्हां दुसऱ्यानें स्वतः व्यापारा निमित्त शामदेशांत प्रवास करावा लागला त्यासमयीं तेथें " नस्तू " नांवाचा राहिब ( मुनी ) राहत होता त्यानें सुद्धां श्रेष्ठ पैगंबरास न्याहाळून पाहून आपलें पुरातन काळचे ग्रंथ तपासुन पाहून आपली खात्री करून घेतली आणि श्रेष्ठ पैगंबरासमागमें जो काफला होता त्यांना बजाऊन सांगितलें कीं, " ह्या इसमाचा शेवटचा पैगंबर बनण्याचा काळ समीप आला आहे. कारण आमच्या पुरातन कुतुब सामावियाच्या लेखा वरून त्यांत शेवटच्या पैगंबरा-संबंधानें ज्याला खुणा व लक्षणें दर्शविल्या आहेत त्या सर्व एकूण एक ह्या व्यक्तींत आढळतात. "

IV पुढें जेव्हां पैगंबर हजरत महंमद (ज्यांचे वर दरूदहोवो) यांचें वय चाळीस वर्षांचे झाले व त्यांच्यावर ईश्वरी प्रगटीकरण होऊन वही उतरूं लागली तेव्हां त्यांची भार्या उम्मुलमोमिनीन हजरत खदीजा ह्यांनीं आपला चुलत भाऊ " वरका बिन नौफैल " जो त्यावेळीं तौरेत ( बायबल ) चा सुप्रसिद्ध विद्वान होता त्याच्या पाशीं श्रेष्ठ पैगंबरास नेलें. त्यानें आपल्या धर्मांतील ग्रंथांत शेवटच्या पैगंबरा-संबंधीं उलेखिलेल्या भविष्यांस पाहून ह्मटलें कीं, " निसंशीय हे शेवटचे पैगंबर आहेत. "

V सुलमान फारशी हे इराणी कुळांत जन्मले यांचा पारशी ह्मणजे अग्निपूजक धर्म होता. ईराण देशांत अस्पहान शहराच्या जवळ एका गांवकऱ्याचें घरी यांचा जन्म झाला. एके दिवशीं ते एका गिरज्या ( चर्च ) मध्यें गेलें तेथें त्यांना ईसाई लोकांचीं आराधाना करण्याची रीत पसंत पडली, मग त्यांनीं ईसाई धर्माचें मुख्य स्थान कोठें आहे अशी चौकशी केली. ते स्थळ शाम मध्यें आहे असें समजल्यावर ते तेथें जाण्यास तयार झाले. एका काफल्यासमागमें शामदेशांत जाऊन

पोहोंचल्यावर तेथें एका ईसाई पाद्री पाशी राहूं लागले कांहीं दिवसांनीं पाद्री वारला व त्याच्या जागी दुसरा वृद्ध चांगला पाद्री नेमला गेला. ह्याही पाद्रीचा मरण काळ समीप आला तेव्हां त्यानें सुलमान फारशीला सांगितलें कीं, आज काल चांगले आचार्य मिळणें दुर्मिळ झाले आहेत तरी मोसलमध्यें फक्त एक मनुष्य आहे. त्याला भेटल्यास तुह्मांस मोठा आनंद होईल ह्मणून तेथून ते मोसल मुक्कामी गेलें. व तेथून नसीबैन आणि मग अमूरिया येथें जावूंन राहीले. अमूरियाचे पाद्रीनें मरतेसमयीं त्यांना उपदेश केला कीं, "लौकरच एक पैगंबर उदयास येणार आहे जर तुह्मी त्यासभेटाल तर तुह्मास धर्माची खरी वाट सर्वस्वी त्याजपाशी मिळेल. तथापि हे धर्माच्या उत्सुकता व आवडीनें प्रेरित होऊन चांगल्या परिपूर्ण आचार्याच्या शोधांत बराच काळ फिरत राहिले. व ईसाई धर्मातील ग्रंथांत त्यांनीं शेवटच्या पैगंबराच्या उदयाचें भविष्य पाहिले. पण मध्यंतरी कोण्या जुलमी मनुष्यानें त्यांना धरून गुलाम करून टाकले. व सरतें शेवटीं मदिना येथील एका यहुद्यानें त्यानां विकत घेतले. याच वेळेस श्रेष्ठ पैगंबर मक्केहून मदिनेस हिजरत करून आले होते तेव्हां श्रेष्ठ पैगंबराची किर्ति त्यांच्या कानीं पडली तेव्हां त्यांनी आपणास माहित असलेल्या भविष्याच्या आधारें श्रेष्ठ पैगंबराच्या अयुष्य क्रमाची तुलना करून आपले समाधान करून खऱ्या मनोभावानें श्रेष्ठ पैगंबरावर श्रद्धा ठेऊन इस्लामी धर्माची दिक्षा घेतली व अशा प्रकारें आतां त्याची मनशुद्धि होऊन मनकामना पूर्ण झाली. मुसलमानांनी त्यांना यहुद्या पासून विकत घेऊन बंधमुक्त केले.

पुढें सुलामन फारशीनें श्रेष्ठ पैगंबराच्या उच्च शिक्षणामुळें मोठी योग्यता प्राप्त केली त्यामुळें माहाजरीन आणि अनसार त्यांना आपला नातलग बनऊं लागले आणि हा वाद जेव्हां श्रेष्ठ पैगंबरा पर्यंत पोहोचला तेव्हां त्यांना स्वतः त्याला

आपल्या अहलेरैांसारखा आपल्या गोत्र व खानदानींतील इसम बनविला यामुळें वाद नाहींसा झाला.

VI हबश ( अबिसिनीया ) येथील नजाशी हा ईसाई धर्माचा बादशाहा होता. त्यानें आपल्या पुरातन ग्रंथांत पाहून श्रेष्ठ पैगंबर हे शेवटचे नबी असल्याबद्दल आपली खात्री करून घेऊन तदनंतर त्यानें इस्लामी धर्म स्वीकारला.

VII इ. सनाच्या सातव्या शतकाचे सुरुवातीस रोमचा बादशाहा ( कैसरेरूम ) ज्याचें नांव हरकल असें होते जेव्हां तो बैतुल मुकद्दस ( जेरूशलेम ) मध्यें आला होता. त्यावेळेस त्याला श्रेष्ठ पैगंबराचा जासूद 'देहिया कलबी' याचे मार्फत श्रेष्ठ पैगंबराची इस्लामी धर्म स्वीकारण्यासाठीं आमंत्रण पत्रिका मिळाली. हरकल बादशाहाला पुढें निर्माण होणाऱ्या पैगंबरासंबंधीं पुरातन पैगंबरांनीं केलेल्या भविष्याची माहिती होती. तरी त्यानें पुन्हा खालील प्रमाणें चौकशी करून आपले समाधान करून घेतले, तथापि तो उघडपणें इस्लामी धर्माचा अंगिकार करूं शकला नाहीं.

ज्यावेळीं हरकल बादशाहापाशीं श्रेष्ठ पैगंबराचे वरील पत्र पोहोंचलें तेव्हां त्यानें पत्रांतील मजकूर वाचून आपल्या लोकांस हुकूम दिला कीं, जर कोणी इसम हज्जाजचा रहिवाशी आणि त्या पैगंबरीचा दावा करणाऱ्याचा कोणी देश बांधव बैतुलमुकद्दस मध्यें आला असेल तर त्यास आमचे दरबारीं हाजर करा. कर्मधर्म संयोगानें शोधांअंती त्यांना अबुसफियान जो व्यापारानिमित्त तथें आला होता त्याची गांठ पडली. मग त्याला हरकल बादशाहाच्या दरबारीं हाजर केले. अबुसफियान हा श्रेष्ठ पैगंबराचा कट्टा हाडवैरी आणि विरोधी होता. दरबारांत अबुसफियान आणि हरकल बादशाहा यांच्या मध्यें दुभाष्या मार्फत जे संभाषण झालें त्याचा खुलासा खालीं दिला आहे:-

प्रश्नः-हरकल ह्मणतोः तुह्मी महंमदला ओळखतां ?

उत्तरः-अबुसाफियान ह्मणतो—चांगले पूर्ण पणें.

प्रश्नः-हरकल—त्याचे कुळ कसें आहे ?

उत्तरः-अबुसफियान—फारच श्रेष्ठ आहे.

प्रश्नः-हरकल—महंमदाच्या पूर्वजामध्यें कोणीं बादशाहा झाला काय ? उत्तरः-अबुसाफियान—कोणीच नाहीं.

प्रश्नः-हरकल-महंमदच्या वचनांचें अनुकरण श्रीमंतच करतात अथवा गरीब किंवा अनाथ ?

उत्तरः-अबुसफियान—सर्वच पाळतात पण त्यांत गरीब आणि अनाथ अनुयांयी जास्त आहेत.

प्रश्नः-हरकल—आतां त्याच्या अनुयायांची संख्या वाढत आहे किंवा कमी होत आहे ?

उत्तरः-अबुसफियान—दिवसें दिवस वाढ होत आहे.

प्रश्नः-हरकल—नबुवता ( प्रेषिताचा दावा करण्यापूर्वी त्यानें कधीं खोटें बोललें काय ?

उत्तरः-अबुसाफियान—तो कधींच खोटें बोलला नाहीं.

प्रश्नः-हरकल—कधीं तुह्मा लोकांत लढाई झाली ?

उत्तरः-बरेंच वेळां.

प्रश्नः-हरकल—मग परीणाम काय झाला. ?

उत्तरः-अबुसफियान—कधीं तो विजयी झाला, कधीं आह्मी.


प्रश्नः-हरकल—ते तुह्मांस काय सांगतो ?

उत्तरः-अबुसफियान—तो फक्त हेंच सांगतो कीं, परमेश्वर एकच आहे. व त्याचे बरोबर कोणालाच साथीदार किंवा सामील करूं नका, व मला त्या ईश्वराचा रसूल ( प्रेषित ) मानावे. खोटे बोलणें धोकेबाजी, चोरी, व्यभिचार वचन भंग आणि ठकबाजी यांपासून

आलिप्ररहा, व एकाच ईश्वराची प्रार्थनाकरितजा दया धर्म पाळितजा भिक्षा घालीतजा, जकात ( दान ) द्या. आणि पुढें तो ह्मणतो आपल्या पूर्वजांच्या मूर्तिपुजेच्या रुढीस वर्ज्ज करा सत्यवचनी असा, आणि माझ्या हुकुमांस पाळून त्यांची अमलावारी करा. हरकंल बादशाहानें हें सर्व भाषण ऐकून दुभाष्या मार्फत सांगितलें कीं, मला वाटते हा तोच इसम आहे ज्याची आह्मांस मार्ग प्रतिक्षा आहे.

श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांचा उल्लेख तौरेत ( बायबल ) आणि इंजिल मध्यें आहे अशा बद्दल एका कवीनें उर्दू भाषेत एक कविता रचली आहे ती येथें खाली सादर केली जातें:—

सरदारे दो आलमका एकताये जमाना था ।
अफजल था रसूलोंमे नबीयोंमें एगाना था ॥ १ ॥
ताआलीम हकीकतकी देता था फरिश्तोंको ।
जाहिरमें तो उम्मी था बातिनमें सियाना था ॥ २ ॥
इंजिलके वर्कों में मूसाके सहीफोमें ।
चर्चेथे महंमदके अहमदका फिसाना था ॥ ३ ॥
महेबूबके खिलवतमें मिलनेकी तमन्नाथी ।
मेयेराजका हीलाथा दावतका बहाना था ॥ ४ ॥
लौलाक व कमलीको देखा जो रुबा हमनें ।
ये शाही लबादाथी वो ताज शहाना था ” ॥ ५ ॥



# अध्याय चवथा

## प्रकरण पहिलें.

### ईराण देशांतील पारशी ( अग्निपूजक ) लोकांचे धर्म ग्रथांत त्या निर्माण होणाऱ्या श्रेष्ठ पैगंबराचें संक्षिप्त वर्णन.

ईराणांतील पारशी जातींतील अवतारांनी व ऋषींनीं त्या निर्माण होणाऱ्या श्रेष्ठ पैगंबरासंबंधीं मोठ्या खुबीनें मजेदार वर्णन केले आहे तें खरोखर वाचण्याजोगें असून ऐकण्यासारखें आहे. आणि त्या भविष्या वरून सहज अंदाजा करतां येतो कीं. श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांच्या निर्माण होण्याचे आधींच ईराणांतील लोक किती काळां पूर्वी त्यांच्या अस्तित्वांत येण्याची चातका प्रमाणें कशी मार्ग प्रतिक्षा करित होते व सरते शेवटीं पुढें ती किती तंतोतंत खरी ठरून परिपूर्ण झाली हें दिसून पडते.

पारशी लोकांचे ईश्वरी निर्माण सुप्रसिद्ध धर्म ग्रंथ " दसतीरे आसमानी " नांवाचे आहे. त्यांत बऱ्यांचशा " दखशोज " ह्मणजे नबींची पुस्तकें सामिल आहेत. त्यांतीलच एक पुस्तक " मश्त सासान नख्त " नांवाचे आहे. या पुस्तकांत ( पर्वांत ) शेवटच्या काळाचे भविष्याचा उल्लेख आहे. त्यांत असें वर्णन केलेले आहे. कीं, ' जव्हां हे लोक आपल्या बादशाहाच्या आज्ञेच भंग करितील आणि आपल्या ऋषींचा आज्ञा मोडतील तव्हां अशा समयीं अरबस्थानांत एक मोठी

प्रतापशाली व्यक्ती निर्माण होईल." हे भाकित झिंद भाषेंत आहे तथापि त्या झिंद भाषेंतील भाकिताचे खालीं मराठीं भाषेंत शब्दशः भाषांतर दिले जातेः—

( १ ) " जेव्हां इराणी लोक ह्या प्रकारचीं कार्यें करूं लागतील तेव्हां अरब लोकांत एक प्रतापशाली व्यक्ति निर्माण होईल."

( २ ) " त्याच्या अनुयायांच्या हस्ते ईराणचे मुकुट, गादी आणि धर्म या सर्वांचा नाश होईल."

( ३ ) " तुह्माला दिसेल की, देवळें ( भजनालये ) आणि आगाऱ्या यांच्या जागीं पैगंबर ( इब्राहिम ) चे तयार केलेले घर मूर्तिंनी निर्मळ होईल. आणि नमाज पढण्यासाठीं तो किबला बनेल."

( ४ ) " तो नवी अरबस्थानचे पीर ( मुसलमान ) महायन नांवाचें शहरावर आणि त्याचे आसपास आणि तूस व बलखच्या आग्याऱ्या आणि मोटमोठ्या मुक्कामावर कबजा करतील."

( ५ ) "ईराणचे विद्वान लोक आणि तसेंच दुसऱ्या मुलखांतील लोक ( मुसलमानांत ) शरीक होतील."

हे वरील भविष्य आपले आपणच विवरणकरते कारण ह्या हकीकती वरून स्पष्टपणें जाहीर होतें कीं, एके काळीं श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांचा उदय होण्यापूर्वीच जे भाकित केलें होते ते शब्दशः पुढें स्वाभाविकपणें खरें ठरले. ज्यावेळेस इंराणदेशास उतरतीकळा लागली होती बरोबर त्याच समयीं अरबस्थानांत श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमदचा जन्म झाला. व मग ह्याच श्रेष्ठ पैगंबराच्या उदयाच्या प्रतापानें " खानये काब्यांतील " सर्व मूर्ती निघून तो काबा निर्मळ झाला आणि त्यांच्या अनुयायांच्या हस्ते " दसातीरांत " लिहिल्याप्रमाणें ईराण देश फत्ते झाला. व सर्व देशावर मुसलमानांनी आपला कबजा करून

घेतला व आज तागायत तो तसाच चालत आलेला आहे. व ज्यानें एका बाजूस ह्या वरील भविष्याचा विचार करून पाहिले आहे व ज्यानें इस्लामी इतिहासाचा अभ्यास केला असतां व दुसरीकडे त्यादेशाची स्थितीकडे लक्ष पुरविले ह्मणजे ह्या भाकिताचा खरेपणा डोळयासमोर बरोबर दिसून पडतो ह्या वरून प्रत्येक न्यायी इसम श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांच्या वैभवशाली प्रतापाच्या उदयाचा अंदाजा करूं शकतो.

वास्तविक पाहातां ही गोष्ट सर्वस्वी खरी आहे कीं, जेव्हां एकाद्या गोष्टीची खबर अस्तित्वांत जाहिरपणें दृष्टोप्तीस येतें तिला खोटं करणें मोठें कठीण आहे.

तरी दुराग्रहाच्या व पक्षपाताच्या दृष्टीला दूर करून थोर मनानें आणि न्यायानें पाहिले असतां ह्या भविष्याला आणि ईराणची स्थिती पाहून आज भूपृष्टावर कोण बरें त्या श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांच्या भव्यपणाचा इनकार करील. ?

ह्याच कारणांनी ज्या पारशी बंधूंनीं ह्या भविष्याच्या सत्यतेवर विश्वास ठेऊन विचार केला आणि आपल्या ईश्वरी ग्रंथांतील उल्लेखास पाहिलें व त्यावर सविस्तर मनन पूर्वक विचार केला तेव्हां त्यांनीं तत्काळ त्या श्रेष्ठ पैगंबराच्या सत्यतेचा अंगिकार करून इस्लामी धर्माची दिक्षा घेतली. पुढें श्रेष्ठ पैगंबरानीं ह्याच ईराणी लोकांसंबंधीं फर्माविले होते कीं, “ ईराणी लोकांचा इस्लामी धर्मांत बराच मोठा वाटा आहे. ” आणि ह्मणूनच तर ईराणांतील सूज्ञ लोकांनी इस्लामी धर्मात शिरून साधू, संत, अवलिया, कवि व विद्वान वगैरे असें मोठ मोठे दर्जे प्राप्त करून त्यांचे औदार्य आज तागायत चालूं आहे त्यामुळें श्रेष्ठ पैगंबराचे फरमान कसें खरें ठरलें हें आपण पाहिलेच आहे.

---

# अध्याय ५ वा.

## सन्माननीय श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांनीं पुनर्जिवन केलेला—इस्लामी धर्म आणि त्यांतील औदार्य

इस्लामीधर्म सृष्टी निर्माण झाल्यापासूनच सुरूं होता कारण सृष्टींत ईश्वरानें पाहिला थोर आद्य व मुळ पुरुष हजरत आदम यांना निर्माण केलें. व त्यास ईश्वरानें सर्व कांहीं ज्ञान शिकविलें आणि एकाच ईश्वराची स्तुति करण्याचा त्यांना सरळ मार्ग दाखविला आणि इस्लामी धर्मातील सर्वोत्कृष्ट आणि आद्य तत्व ह्मटलें ह्मणजे एकाच ईश्वराची उपासना आहे पुढे कालंतरानें जगांत जसजसी वाढ होत गेली तसतसी त्याअद्वय अशा एकाच ईश्वराची स्तुती न करतां जगांतील लोक दुसऱ्या बऱ्याच वस्तूंना त्या परमेश्वराबरोबर जोडी दार करूं लागले होते ह्मणून तसें न करतां फक्त एकाच ईश्वराची जो निर्गुणनिराकार आहे अशा अद्वितीय ईश्वराचीच आराधना करण्याचा खरा मार्ग दाखविण्यासाठीं ईश्वरानें प्राणी मात्रातच एक अति उत्कृष्ट व्यक्ति निर्माण केली त्या व्यक्तीला श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद असें ह्मणतात, आणि ह्या श्रेष्ठ पैगंबरनीं तोच धर्म पुन्हां स्थापित केला व जुन्या धर्माचे पुनार्जीवन केले व त्यासच इस्लामी धर्म ह्मणतात. इस्लाम हा नाम वाचक शब्द सलम या क्रियापदापासून निघालेला आहे.

सलम ह्मणजे शांत होणें, विसावा घेणें, कर्तव्य करणें, मुक्त होणें, व सर्व प्रकारें ईश्वराच्या स्वाधीन होणें. इस्लाम या नामवाचक शब्दाचा अर्थ, शांति नमस्कार, आश्रयस्थान, मुक्ति, प्रकाश, व सर्व प्रकारें ईश्वराच्या आधीन होणें असा आहे.

इस्लामी धर्म ह्मणजे शांततेचा धर्म, आश्रयस्थान. मुक्तद्वार इस्लामी धर्मांतील मुख्य तत्वांतील एक तत्व असें आहे कीं, इस्लामी धर्म दुसऱ्या कोणत्याहि धर्मांतील अवतार, प्रेषित आणि पैगंबर यांचा सुद्धां आदर करण्याचें शिकवितो असें शिक्षण क्वचितच दुसऱ्या धर्मांत सांपडेल.

इस्लामी ह्मणजे मुसलमान, तो पुरातन काळापासून त्या धर्मांत असो किंवा आजच त्यानें इस्लामी धर्म स्वीकारला असो. त्या सर्वांस मुसलमान असें ह्मणतात. इस्लामी धर्म स्वीकारलेल्या अशा परधर्मीय इसमाला, इस्लामी धर्मांत असलेल्या जुन्या मुसलमानासारखे समाईक व एक सारखे समाजिक हक्क तत्काळ प्राप्त होतात. आणि दुसऱ्या कोणालाच ते धार्मिक व समाजिक हक्क मागावयास कोठें व कोणाकडें जावें लागत नाहीं. त्या धर्माच्या नैसर्गिकपणामुळें ते आपोआप प्राप्त होतात. या हक्का पैकीं थोड्याशा हक्कांचा उल्लेख केला जातोः- जसें दर्जा सारखेपणा धर्म संस्कार, समाईक व एकसारखे हक्क भाऊबंदकी धार्मिक शिक्षण, खाण्या पिण्यांत सारखेंपणा, इत्यादि.

दर्जाः–सर्व मुसलमानांचा इस्लामी धर्मांत एक सारखा दर्जा आहे. आजच कोणीं पर धर्मीयानें इस्लामी धर्म स्वीकारला तर त्याचा कांहीं दुसरा कमी ज्यास्त प्रमाणांत दर्जा आहे असें मुळींच नाहीं. ज्याची जशी लायकी, योग्यता आणि ज्ञान असतें त्याप्रमाणें त्याला नैसर्गिकपणें प्राप्त होतात. प्रत्येक इसम ज्ञान संपादून आपल्या शक्तिनुसार कमिज्यास्त प्रमाणांत वाटेल तसा उंच्च दर्जा प्राप्त करूं शकतो. त्यांत त्याला कोणत्याच प्रकाचा अडथळा उद्भवत नाहीं. असा दर्जा प्रत्येकाची चांगली रहणी सदाचरणात सग्दुण, धार्मिक श्रद्धां, धर्मसंस्कार, आणि धार्मिक ज्ञान वाढऊन तो त्याची उन्नति करूं

शकतो. या कार्यांत त्याला कोणताच अडथळा किंवा प्रतिबंध मुळींच होत नाहीं. विषेश करून आपला मान मर्यादा वाढविणें हें तर स्वतः वरच अवलंबून आहे. अशा प्रकारच्या सद्गुणाच्या गोष्टी जो आपल्या मनोभावानें करितो त्याची गणना उंच म्हणविणाऱ्या लोकांत आपोआप होऊं लागते ईश्वराच्या प्रार्थनेच्या समयीं, सामाजिक मेजवानीच्या प्रसंगी आणि सर्व सामाजिक जमावाच्या वेळीं जेव्हां समाजांतील लोक एकत्र जमले असतां कोणीं कोणास उच्चनीच असा भाव ध्यानीं मनीं सुद्धां आणित नाहीं उलट प्रत्येक जण आपल्यास एकाच आई बापांचीं लेंकरें आहोंत व सर्वजण आपसांत परस्पर भाऊबंधू आहोत असें समजतो. तसेंच मसाजिदींत तर कोणत्याहि जागीं बसून आपली प्रार्थना करतां येते यापेक्षां बहुत काय पण बादशाहाच्या पुढें व बाहूला बाहू लाऊन उभे राहून प्रार्थना करतां येतें. इस्लामी धर्मांत अशा प्रकारच्या सर्व सारखेपणाच्या गोष्टी मुळींच कांहीं खटपट न करवां नैसर्गिकपणें प्राप्त होतात म्हणूनच या धर्माला शांततेचे आगर अशी सुद्धां संज्ञा आहे.

इस्लामी धर्मांत प्रत्येक इसमास विद्या संपादन करण्याची सक्तीची ताकीद केलेली आहे व सक्तीचें शिक्षणाचा बोध केलेला आहे. विद्या संपादन करण्याच्या गोष्टीं विषयीं म्हटलें आहे कीं, जर उपयुक्त विद्या चीन देशांत असेल तर तेथें जाऊन ती संपादन करावी मनुष्यां प्रमाणें स्त्रियांना सुद्धां धर्म शिक्षण प्राप्त करण्याची सक्तीची सारखीच आज्ञा आहे स्त्रियांचा मान मरातब आणि त्यांच्या हक्कांच्या संरक्षणाचे कायदे ज्या प्रमाणें न्यायानें इस्लामी धर्मांत केलेले आहेत तसे न्यायी कायदे दुसऱ्या धर्मांत मिळणें दुर्मिळ.

( गुलामगिरी ) ज्या दुसऱ्या धर्मांत ज्यांना क्षुद्र आणि अस्पृश्य असें म्हणतात त्यांच्या धर्मांत त्यांचा काय दर्जा आहे आणि

त्यांची काय योग्यता आहे हे येथें लिहिण्याची जरूरी दिसत नाहीं कारण त्यांना त्यांच्या धर्मांत किती निर्दयपणानें वागविलें जाते हे सर्वांस विदित आहेच.

आतां इसलमी धर्मांत अशा लोकांचा काय दर्जा आहे याचा विचार करूं. इस्लामी धर्मानुमतें या शुद्र आणि अस्पृश्यांना कमिज्यास्त प्रमाणांत गुलाम ह्मटल्यास कांहीं गैरवाजवी होणार नाहीं. तरी प्रथमतःच इस्लामी धर्मानें या गुलाम ह्मणविणाऱ्या लोकांचा किती सौजन्यानें प्रतिपाळ करून, गुलामगिरीला जगांतून नाहींसे करण्याचा व त्यांना उच्च दर्जावर चढविण्याचा कसा स्पृहणीय प्रयत्न केला व सरते शेवटी या निंद्य वाईट चालीचा कसा नायनाट केला या बद्दल थोडक्यांत संक्षिप्त इतिहास रूपीं वर्णन केलें आहे.

जेव्हां सन्माननीय श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांना त्यांची पत्नी उम्मुल मोमीनीन हजरत खदीजा यांनीं जैद नांवाच्या गुलामाला विकत घेऊन श्रेष्ठ पैगंबरास अर्पण केला तेव्हां श्रेष्ठ पैगंबरांनीं त्याला तत्काळ बंधमुक्त करून वाटेल तिकडे जाण्याची मोकळीक दिली पण जेव्हां जैदला आपली सुटका झाली असें समजलें तेव्हां तो कोठें न जातां आपल्या उपकारी धन्याचे पदरीं राहण्याचे त्याला मोठें भूषण वाटलें ह्मणून त्यांच्याच सेवेत राहणें त्यानें पतकरलें यास्तव श्रेष्ठ पैगंबर सुद्धां त्याला आपल्या मुलाप्रमाणें वागवूं लागले. पुढें कांहीं दिवसांनीं जैदच्या आईबापास आपला मुलगा गुलाम ह्मणून विकला गेला व तो श्रेष्ठ पैगंबरापाशीं आहे हे समजतांच त्यांनीं आपल्या मुलाच्या सुटके-साठीं बरीच मोठी रक्कम संभागमें घेऊन श्रेष्ठ पैगंबराच्या सेवेशी सादर झाले. आणि जैदच्या सुटके साठीं विनंती करूं लागले. श्रेष्ठ पैगंबरानीं सांगितलें कीं, तो पहिल्या पासूनच मोकळा असून त्याला वाटेल तेथें

जाण्याची मोकळीक आहे. ह्मणून जैदच्या आईबापांनीं आपले समागमें घरीं चालण्यास जैदला ह्मटलें पण त्यानें स्पष्टपणें आपल्या आईबापांच्या समागमें जाण्याचें नाकारलें. तो श्रेष्ठ पैगंबराच्या पदरींच राहिला पण लोक त्याला गुलाम असेच लेखित असत. व श्रेष्ठ पैगंबराला जगांतून गुलामगिरीची निंद्य चाल बंद करावयाची होती ह्मणून त्यांनी जैदचें लग्न अति उच्च कुळांतील एका स्वरुपवान जैनब बाईशीं लाऊन दिले. तरी पण लोक त्याला गुलाम असेंच समजत ह्मणून श्रेष्ठ पैगंबरानीं त्याजकडून विद्या संपादन करवून त्याला हिब्रू भाषेचा विद्वान करविला तरी सुद्धां लोक त्याची गणना गुलामगिरींतच करित. जैद हा पूर्वी पासूनच मोठा शूर आणि बुद्धीमान असा होता. तरी त्याच्या गुणावरून त्याचे योग्यतेनुसार श्रेष्ठ पैगंबरानीं त्याला सैन्याचा सेनापति नेमला व ह्या दर्ज्यामुळें त्याची गणना श्रेष्ठ पैगंबराच्या निवडक जिवासजिव देणाऱ्या सहाबा ह्मणजे अनुयायी लोकांत होऊं लागली व आतां लोकांना त्याच्या आज्ञा पाळाव्या लागत. अशा प्रकारें लोकांच्या मनांतील द्वेष नाहींसा झाला व इतःपर त्याला गुलाम ह्मणून कोणींच समजत नसत आतां लोकांना समजले कीं, सर्व मनुष्य मात्र एकाच ईश्वराची निर्माण केलेली प्रजा आहे आणि आपसांत सर्वजण भाऊबंधू आहेत. हे समजल्यानंतर जैदचा सर्वच लोक मोठा आदर करूं लागले.

पुढें एक सुप्रसिद्ध हिंदु सद्गृहस्थ बाबू शामसुंदर साहेब दोग्रा (काश्मीर) यांनी इ. स. १९२८ मध्यें दिल्ली येथील "पेशवा रसूल नंबर" यांत जो निबंध लिहिला त्यांतील थोडासा भाग नमूद केला आहे. त्यावरून मनुष्य मात्राची लहान थोरपणाबद्दल इस्लामी धर्मांत काय योग्यता आहे हें समजले.

श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद साहेब हे जगांतील अति उच्च अशा श्रेष्ठ दर्जांतील आचार्य किंवा गुरुंपैकीं आहेत ह्या गोष्टीला

नाकारणें ह्मणजे समाला वर्ज करणें होय. त्यांच्या शिक्षणांत ईश्वराच्या ऐक्यत्वा संबंधीं अग्रगण्यस्थान प्राप्त झालें आहे. त्यांचें शिक्षण एक आणि फक्त एकच ईश्वराची भक्ति ह्मणजे अद्वित्याची उपासना आहे. त्यांनीं हा निरोप जगाला अशा समयीं दिला कीं, ज्यावेळीं प्रत्येक दगड ईश्वर होऊन बसला होता. आणि वृक्ष आराधना करावयास योग्य असा बनला होता. लोकांनीं हें वर्ज करून त्यांनीं एकाच अशा खऱ्या ईश्वराची स्तुति करण्याचें शिक्षण दर्शविण्यासाठीं नानातऱ्हेच्या हजारो हाल अपेष्टा स्वतः सहन केल्या, त्यासाठीं आपल्या जन्म भूमीचा त्याग करणें पत केलें पण आपल्या एकनिष्ट व खऱ्या धर्म प्रसारांत मुळीच अंतर पडूं दिलें नाहीं. आणि आज या परिणामाला सार्वजनिक स्वरूप प्राप्त होत आहे.

ईश्वराच्या अद्वितियपणाच्या भक्तीचें शिक्षणानंतर त्यांनीं जगाला सारखेपणाचें शिक्षण दिलें, उच्च आणि नीच ( खोल )यांना सारखेपणाच्या स्थितींत आणून समानता प्राप्त करून दिली. आणि सर्व मनुष्य मात्र हे ईश्वराचेच निर्माण केलेले आहेत आणि लहान थोर असा भेद मुळींच नसून सर्वजण एक सारखेच आहेत अशा प्रकारचा उजेड प्रत्येकाच्या मनावर पाडला. हे त्यांचे मोठें स्तुत्य वाखाणणिय कार्य आहे अशा बद्दल त्यांचे स्नेही आणि शत्रु हे दोन्ही एक सारखी त्याची प्रशंसा करतात आणि प्रथमतःच त्यांनीं स्वतः ह्या अशा कार्यांची अमलावारी करून उदाहरण घालून दिले.

पुढें दुसरें असेंच एक अप्रतीम उदाहरण ह्मटलें ह्मणजे, बिलाल नांवाचा सिद्दी ( हबशी ) यांचे आयुष्यक्रमासंबंधीं आहे आणि आबेसीनिया देशांतील एक बिलाल नांवाचा सिद्दी गुलाम नीच कुळांतील अधम, काळाकुट, निराश्रित, रानटी, व ज्याला सुधारणेचा मुळींच गंध नाहीं असा इसम श्रेष्ठ पैगंबराचें चरणीं हाजर

होऊन त्यांचेवर पूज्य भावानें आणि एक निष्ठेनें श्रद्धा ठेऊन इस्लामी धर्माचा अंगिकार करितो, व ज्याला तत्काळ त्याची काया पालट होऊन एकदम निराळेंच असाधारण अप्रतीम वैभव प्राप्त होतें. दोन्ही जगांतील सर्वोत्कृष्ट अशा श्रेष्ठ पैगंबराच्या निकट जाऊन तो वसतो, कुलीन अशा अमीर उमरावाबरोबर एकाच ताटांत जेऊं लागतो. ह्यामुळें त्याला आपण एक हबशी ( शिद्दी ) आहों, आणि तिरस्कारयुक्त अशा रानटी कुळांत आपला जन्म झाला आहे असें त्याच्या मुळींच ध्यानीं मनीं सुद्धां येत नाहीं हा वृतांत अशा समयीचा आहे कीं ज्याकाळीं हा सुधारणेचा नायनाट होऊन, रानटीपणाचा प्रसार झाला होता, ह्या रानटी ह्मणविणाऱ्या बिलालास इस्लामी धर्माची दिक्षा घेतांच, सुरुवातीपासूनच मुसलमानांना ईश्वराच्या दरबारीं बोलविण्याचें उत्कृष्ट धर्म संस्काराचें " मौवजनाचे " कर्तव्य दिले. आणि आज सुद्धां त्याच बिलालानें प्रथमतः दिलेल्या " अजान " चा डंका अरबस्थान देशाच्या कोनाकोपऱ्यांत ऐकूं येत आहे.

तसेंच ता० १०-५-१९२९ ई. ला. दिल्ली येथून निघालेल्या " मुनादी " नांवाच्या दैनिक उर्दू वर्तमान पत्रांतील उतारा वाचकांसाठीं दिला आहे.

मिस्टर. सी. एम्. लंग साहेब लिहितात कीं, मनुष्यमात्राला स्वाभाविकपणें अशी संवय पडली आहे कीं, तो जगाच्या सुखांत व समाजांतील वैभवांत निमग्न होऊन जातो ह्मणून त्याला आपल्या अतः शुद्धीचें मुळींच भान राहत नाहीं. अशा प्रकारें या जगाच्या मोहपाशांत सांपडून तो निष्काळजी बनतो, व मग त्याला आपल्या निर्माणकर्त्याचा आपोआपच विसर पडतो. तरी जेव्हां मी इस्लामी धर्मांतील खालील गोष्टींचा विचार करतों तेव्हां मला आनंद आणि कौतुक वाटल्या वांचून

राहवत नाहीं. इस्लामी धर्मानें आपल्या आज्ञाधारक आणि श्रद्धा, ठेवणाऱ्यावर रात्र दिवसातून पांच वेळची नमाज (प्रार्थना) कायम करून दिली आहे. आणि कसल्याहि निकडीच्या कामांत हे धर्मसंस्कार पार पाडावयास भाग पाडलें आहे. ह्मणून मला कबूल करावें लागतें कीं आज्ञेची ही एक श्रेष्ठ प्रकारची ताकीद आहे. जेव्हां खऱ्या निष्ठेचा एकदा इसम आपल्या मोठ्या प्रफुल्लित मनानें ईश्वराची सेवा करूं लागतो व शुद्ध अंतःकरणानें ईश्वराचे नामस्मरण करून मोठ्या नम्रतेनें त्याची स्तुति करून आपले सुख, ऐश्वर्य आणि खऱ्या मार्गावर चालण्यासाठीं प्रार्थना करूं लागतो त्यावेळीं खरोखर त्याचा आत्मा एका उच्च स्थितीला जाऊन पोहोंचतो. आणि त्याच्या डोक्यांतून आपल्या पोकळ ऐश्वर्याचा वेडेपणा पार नाहींसा होतो.

मी एका मोठ्या दर्जाच्या मुसलमानाला पाहिलें आहे. त्याला प्राप्त झालेल्या ऐश्वर्याच्या गर्वामुळें आपल्याहून गरीब, निराश्रित व अनाथ अशा इसमाशीं कदाचित आपल्याला कमिपणा येईल ह्या दृष्टीनें त्याच्याशी बोलण्याचें देखील त्याच्या ध्यानीं, मनीं येत नाहीं व तो त्याला तिरस्कार युक्त अशा मुद्रेनें तुच्छ पाहूं लागतो पण नमाजाची वेळ आली ह्मणजे अजान ऐकतांच तोच वैभवशाली मोठा मनुष्य अति उतावळीनें मसजिदमध्यें दाखल होतो, आणि आपल्या त्याच अनाथ आणि तुच्छ समजलेल्या भावाबरोबर ईश्वरस्तुति साठीं, बरोबरीनें उभे राहण्यांतच मोठें भूषण समजतो. ह्या देखाव्याला पाहून उघडपणें, स्पष्ट होतें कीं, खरोखर ह्या प्रार्थनेंत साधेपणा आणि लीनतेचा धडा आहे. आणि ह्यांतच सारखेपणाची चिन्हें दृष्टीस पडतात. वास्तविक पाहतां इस्लामी धर्माच्या श्रेष्ठ पैगंबरानें मोठ्या आश्चर्यकारक तऱ्हेनें लहान थोरांस एका रांगेत एकत्र करून दिले. यास्तव मला सर्वस्वी कबूल करावें लागतें कीं, नमाज हा, एक उत्कृष्ट प्रकारचा भक्तिमार्ग आहे.

मि० काणे वकील रा० उमरावती यांनीं पैगंबराचें चरित्र लिहिले त्यांतील उताऱ्याचा कांहीं भाग खाली सादर केला आहे.

## दास—गुलामगिरी

गुलामगिरी ही फार प्राचीन काळापासून जगांत चालूं आहे. दुसऱ्याचा बळाचा उपयोग करून घेऊन आपली मेहनत वांचवून सुख साध्य करून घेणें हें गुलामगिरीचें मूळ, इस्लामी धर्मांत जातिभेद किंवा वर्ण भेद मानण्याची चाल नाहीं. मानवांची योग्यता सारखीच व दर्जा पण एकच रणीं, दरबारीं, राज प्रासादीं, अथवा परमेश्वर मंदिरीं सर्वांचा मान सारखाच. सर्व जण मोकळ्या मनानें एकमेकांस भेटतात. इस्लामाचा पहिला मोवाझीन ह्मणजे प्रार्थनेस पुकारणारा शिद्दी गुलाम होता. इस्लामनेंच गुलामगिरीची पहिल्यानें कंबर मोडिली आपल्या शिष्यांस श्रेष्ठ पैगंबराचा असा उपदेश होताकीं, गुलामांस बंधांतून मुक्तकरण्या इतको दुसरी कोणतीहि गोष्ट परमेश्वराला प्रीय नाहीं. आपली सुटका करून घेण्यास गुलाम लोकांस सरकारी खजिन्यांतून उसनें द्रव्य देण्याची श्रेष्ठ पैगंबरानें तजवीज करून ठेविली होती. जो एकदां दासपणांत सांपडला त्यानें जन्मभर त्याच स्थितींत राहावें असा इस्लामचा हेतु कधींहि नव्हता श्रेष्ठ पैगंबरानें असें स्थापिलें होतें कीं, परदेशांतील गुलाम इस्लामी राजाच्या राज्यांत जर पळून आलातर त्याला मुक्त करावें. गरीबांच्या पोषणाकरितां ह्मणून जो एक कर घेत त्यांतील कांहीं रकम गुलमांना मुक्त करण्याकडे लावावी असा नियम केला. दास्यत्व असल्यामुळें मनुष्य नीच गणतां कामा नये. कारण दास्यत्व हें प्रसंगोपात्त चांगल्या स्थितींतल्या मनुष्यासहि प्राप्त होतें; ही स्थिति आज आहे तर उद्या नाहींशीं होईल, अक्षयींची नाहीं झेद याजला श्रेष्ठ

पैगंबरानें दासपणांतून मुक्त केलें होतें व त्याजकडे सर्व सैन्याचे आधिपत्य दिलें होतें. आणि मोठमोठ्या कुळांतील सरदार मोठ्या आनंदानें त्याच्या हाताखालीं काम करित असत. हेलेर्णा लोकांवर जी स्वारी केली त्या स्वारीवरचे सैन्याचें आधिपत्य झैद याचा मुलगा असामा याजंकडेसच सोपविलें होतें. दुसऱ्या लोकांना त्यांच्या देशांतून धारून आणून त्यांस दास्यत्वांत घालणें अगर गुलामांचा व्यापार चालूं करणें, ह्यांची श्रेष्ठ पैगंबरानें सक्त मनाई केली होती. श्रेष्ठ पैगंबराच्या शद्बांचा खराहेतु ह्मटला ह्मणजे दासपणा जगांतून नाहींसा व्हावा असा आहे तेव्हां दासपणा जगांतून नाहींसा करण्याविषयीं सर्व मुसलमानांनीं झटावें, हें त्यांचें कर्तव्यकर्म आहे.

पयामे अमीन नांवाच्या उर्दू पुस्तकांतील मराठी भाषेंत भाषांतर, बंगाल्यांतील एक हिंदूसगृहस्थ आणि टिकाकार यांचे इस्लामी धर्मासंबंधी विचारः—

मिस्टर भुपेंद्रनाथ वासु हे एकीकडे ईश्वरी देणगीच्या योग्यतेनुरुप इंडीया कौन्सिलचे मेंबर बनले तसेंच दुसरीकडे ज्ञानाच्या आकाशावर सूर्य ह्मणून प्रकाशित झाले. ते ह्मणतात कीं:—" मी धर्माचें ज्ञान संपादन करण्यांत विद्यार्थी बनून राहिलों मी कोणत्याच धर्मांत सारखेपणाची अशी खूबी पाहिली नाहीं.

आमच्या हिंदु मध्यें जाती पातीचा एक मोठा रिवाज आहे. हिंदूलोकांच्या पुरातनकाळीं, जातीच्या चाली संबंधी निवळ धर्माचा एक अंश बनला होता किंवा नाहीं या संबंधाच्या भानगडींत पडत नाहीं. तथापि सध्यां ही चाल प्रचलित आहे हिंदुलोकांची श्रद्धा अशी आहे कीं, जातींतील कांहीं लोक ब्रह्माचे डोंके तर कांहीं बाहू व कांहीं त्याच्या पायापासून निर्माण झाले.

आणखी दुसऱ्या धर्मांपैकीं जे इस्लामी धर्माशीं बहीणीचे नातें ठेवितात त्यांपैकीं आह्मी यहुदी लोकांना पाहतों. ते आपल्यास बनीइसराईल हेच काय ते ईश्वराचे प्रियबंदे आहेत असें समजतात.

ईसाई धर्मासंबंधी हिंदुस्थानांत दृष्टोतपत्तीस येतच आहे कीं, पाद्रीलोकांनीं देशी इसाई आणि आपल्या युरोपियबंधू यांजमध्यें दुजाभाव आणि भेद असा एक निराळाच मार्ग काढून दिला आहे. हिंदुस्थानांतील देशी इसाई ज्यांना नेटिव्ह क्रिश्चियन असें ह्मणतात यांच्याहून ज्यास्त सुदैवी असें त्यांचे स्वधर्मीयबंधू जे युरोपांत जन्मले ते नेटिव्ह क्रिश्चियनाला तुच्छ समजतात. (इतकेच नव्हे तर या परस्परांच्या धर्मसंस्काराच्यासाठीं चर्चे ( गिरजा ) मध्यें जागा सुद्धां निरनिराळया असतात.)

इस्लामी धर्मांतील आणखी एक औदार्य असें आहे कीं, त्यांच्यांत धर्मासंबंधीं आपसांत, मुद्दाम असा कोणताच निराळा उच्च ह्मणविणारा पंथ अथवा भेद नाहीं प्रत्येक मुसलमान सर्व धार्मिक संस्कार करूं शकतो.

आजसुद्धां जगांत या सुधारणेच्या काळांत जातींत उच्च नीच असाद्वेषभाव प्रचलित आहे. शिवाय असें बरेंच देश आणि समाज आहेत की, जे स्वतःला अति उत्कृष्ट समजून दुसऱ्याला तुच्छ समजतात. उदाहरणार्थ युरोपांतील लोक एशिया खंडांतील लोकांना तिरस्कारयुक्त मुद्रेनें पाहतात तसेंच दुसरे असे की, हिंदुस्थानांत आपण पाहतों कीं अस्पृश्यांना तुच्छ आणि धिःकारयुक्त समजतात. फक्त इस्लामी धर्मांतच ह्या द्वेषभावाचा समूळ नायनाट झालेला आहे. आणि सर्वजण भाऊबंधू असून एकाच स्थितींतले आहेत असें समजतात. ह्याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे इस्लामी धर्मांतील उपदेश, महत्व, व गुणधर्म मोठें असाधारण व अपूर्व आहे.

## —❀() विद्येचे महत्व ()❀—

—:o:—

" सन्माननीय श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद यांनी एक हदीस फर्माविली असून तिचें स्पष्टीकरण त्यांच्या एका सहाबी हजरत अबदुल्ला बिन अब्बास यांनीं केले आहे कीं, " जो अहोरात्र जागरण" करून ईश्वरस्तुति करण्यांत तल्लीन होऊन राहतो त्याच्यापेक्षां फक्त रात्री थोडाचवेळ जो विद्वान कांहीं विद्या शिकतो, शिकवितो, ज्ञान संपादितो किंवा ग्रंथ रचतो हें अधिक उत्कृष्ट आहे." ( दारमी )

डॉक्टर स्प्रिंकर साहेबानें लिहिलें आहे कीं इल्मे रजालवर मुसलमान लोक जितका गर्व करूं शकतील तितका थोडाच आहे. व त्यांचे तसें करणें वाजवी आहे. कारण आज पावेतों मुसलमानांखेरीज कोणताच समाज झाला नाहीं कीं, ज्यानें मुसलमानाप्रमाणें बारा शतकेपर्यंतचे विद्वानांची चरित्रे लिहिली आहेत. आह्माला आज सुद्धां सुप्रसिद्ध पांचलक्ष विद्वानांचा उल्लेख त्यांच्या ग्रंथावरून सांपडतो. ( मुसद्दसे हालीं )

श्रेष्ठ पैगंबराच्या पुर्वीं जे लोक लढाईत पाडाव करून धरले जात त्यांना गुलाम करून विकून टाकीत असत आणि हीच चाल श्रेष्ठ पैगंबराच्या वेळीं सुद्धां अस्तित्वांत होती. पण श्रेष्ठ पैगंबरानी अशा लोकांचीं सुद्धां योगता वाढवून दिली. त्या पाडाव करून धरून आणलेल्या लोकांत जे लोक विद्वान असत त्यांच्याकडे प्रत्येकीं दाहा दाहा इसमास कांहीं नियमित मुदती पर्यंत विद्या शिकाविण्याचें काम देऊन पुढें त्यांची सुटका करून दिली जात असे. ज्या मुदती पर्यंत हे विद्वान लोक शिक्षण देत तों पर्यंत श्रेष्ठ पैगंबराची मुसलमनांना आज्ञा

असें कीं, त्या लोकांशीं चांगलें वर्तन ठेऊन त्यांना आपल्या पेक्षां चागलें अन्न पोटभर जेऊं घालावें. ह्मणून मुसलमान लोक श्रेष्ठ पैगंबराच्या आज्ञे प्रमाणेंच त्यांच्याशीं वागत. पुढें त्या लोकांची सुटका होई व ते आपल्या समाजांत परत जात तेव्हां ते लोक मुसलमानांची मोठी प्रसंशा करून, म्हणूं लागत कीं, "मुसलमान लोक निवळ साधे अन्न खात, व कधीकधी तर ते लोक उपाशी सुद्धां राहत पण आह्मांस चांगले अन्न देऊन आह्मांस पोटभर जेऊं घालीत." व ज्यांना खंडणी देण्याची ऐपत नसे त्यांना उपाकारादाखल तसेंच सोडून देत व जे लोक खंडणी देऊं शकत त्यांच्या पासून खंडणी घेऊन त्याना सोडून देत पण कोणलाच गुलाम करून आपले पाशी मुळींच ठेवित नसत." इतकें करून सुद्धां त्यावेळीं देशांतून गुलामगिरीचा व्यापार नाहीसा झाला नाहीं. तथापि प्रथमतः श्रेष्ठ पैगंबरानेंच जगांतून गुलामगिरी नाहींशी करण्याचा प्रयत्न केला.

तसेंच श्रेष्ठ पैगंबराचे दुसरे खलीफा हजरत उमर फारूके आजम यांनीं आपल्या गुलामाशी कसें स्तुत्य वर्तन केलें, हें खालील हाकिकतीवरून सहज ध्यानीं येईल. जेव्हां बैतुलमुकद्दस (जेरूशलेम) मुसलमानांच्या कबज्यांत आले, तेव्हां तेथील इसाई लोकांनीं मुसलमांन लोकांनां अशी अट घातली होती कीं, जो पर्यंत मुसलमनांचा खलिफा जेरूशलेम शहरास येणार नाहीं तो पर्यंत आह्मी तह करण्यास तयार नाहीं. म्हणून हजरत उमरला मक्केहून तेथें जावें लागतें. हे खलिफ एवढ्या मोठ्या सलतनतीचे वैभवशालीं बादशाहा असून सुद्धां त्यांचे समागमे न मोठेसें लष्कर ना मोठासा डामडौल, तर फक्त थोडेशे निवडक शिपाई, आपला एक उंट आणि एक गुलाम या लनहाशा लवाजम्यासह ते मक्केहून निघाले. दररोज त्यांना जितका

कांहीं प्रवास करावा लागे, त्यांत अर्ध्या प्रवासांत आपण स्वतः उंटावर बसत व बाकीच्या अर्ध्या प्रवासांत आपल्या गुलामास उंटावर बसवीत आणि आपण स्वतः पायीं चालत. जेव्हां हजरत उमर हे जेरूशलेम शहरांत शिरत होते, तेव्हां उंटावर बसण्याची पाळी त्यांच्या गुलामाची होती; ह्मणून त्यांचा गुलाम उंटावर बसलेला होता. आणि खलिफा हजरत उमर हे आपल्या हातांत उंटाची नकेल ( दोरी ) धरून पायीं चालले होते व आंगांत नेहमीं प्रमाणें थिगळें लावलेले कपडे घातलेले होते अशा स्थितींत ते वेशींतून शहरांत शिरतांना तेथील ईसाई लोकांनी सफिलीवरून व जमिनीवरून हा खलिफाच्या रहणीचा देखावा पाहून मोठें विस्मीत होऊन त्याठिकाणीं असलेल्या मुसलमान सरदारांना ते लोक विचारूं लागले कीं, तुमचा बादशाहा कोणता आहे ? जेव्हां त्या ईसाई लोकांना समजले कीं, खलिफा आपल्या हातांत उंटाची दोरी धरून पायीं चालत आहे आणि त्यांचा गुलाम उंटावरबसलेला आहे तेव्हां तर त्यांच्या कौतुकास पारावार उरला नाहीं; हा आहे तो, श्रेष्ठ पैगंबरानें शिकविलेला सारखेपणाचा धडा, कीं, ज्या धर्मांत मालक आणि गुलाम यांचा सारखाच दर्जा आहे. यागोष्टीची साक्ष बऱ्याच युरोपियान इतिहासकारांनीं सुद्धां दिली आहे.

हिंदुस्थानांत तर एकेकाळीं गुलाम घराणें दिल्लीच्या तक्तावर राज्य करित होते, हें कोणास माहित नाहीं. असें नाहीं आणि इस्लामी धर्मांत प्रत्येकजण आपल्या योगते नुसार आपला दर्जा वाटेल तसा वाढवूं शकतो. हे ह्या दृष्टांतावरून स्पष्ट झाले कि ज्यास्त, लहानथोर, असा इस्लामी धर्मांत मुळींच भेद आणि दुजाभाव नाहीं.

ह्याच हजरत उमरला जेव्हां इस्लामी धर्माच्या श्रेष्ठ पैगंबराच्या दास्यत्वाची भूषणदायक माळा गळयांत घालण्याचें अग्रगण्यस्थान

प्राप्त झालें तेव्हां हेच हजरत उमर पुढें त्या अति श्रेष्ठ पैगंबराच्या सहवासांत राहून असे कांहीं इस्लामी सेवक व निस्सीम भक्त निपजले कीं, त्याचें फळ या लोकींच प्रथमतःच त्यांना दुसऱ्या खलिफाचे भूषण-दायक पद मिळालें. हेच हजरत उमर इतके कांहीं विद्वान, राज्य-कारस्थानी, आणि शूर व न्यायी होते की, ज्या गोष्टीं बऱ्याच नामां-कित व्यक्तींत सांपडतात त्या सर्व ह्या एका व्यक्तींत वसत होत्या, ह्मणूनच त्यांचें नांव राज्य कारस्थानी लोकांच्या यादींत अग्रगण्य सांपडते. ह्याच खलिफाची फक्त साडेदाहा वर्षांच्या थोड्या दिवसाची कारकीर्द अतिशय सुखावह शांत, न्यायी असून मोठ्या उर्जितकालास जाऊन पोहोंचली, ह्मणूनच मोठमोठ्या प्रसिद्ध इतिहासकारांनीं त्यांचा गौरव केला आहे. हेच हजरत उमरकल्कीपुराणांत श्रीकृष्ण महारा-जानीं फरमाविल्याप्रमाणें ह्या श्रेष्ठ अवताराच्या चार मित्रां पैकीं एक आहेत व त्यांनींच त्या अवताराच्या धर्माचा प्रसार केला

ह्याच हजरत उमर फारूक खलिफा ( उमरदी ग्रेट ) च्या कारकीर्दीतील कांहीं ठळक गोष्टींचा येथें थोडासा उल्लेख केल्यास त्या फारच मनोरंजक, बोधप्रद असून त्या जिज्ञासु वाचकांस अप्रतीम मनोवेधक वाटतील.

हजरत उमर जेव्हां दुसरें खलिफा निवडले गेलें त्यावेळीं त्यांच्या ताब्यांत बराच मोठा मुलूख होता तरी पण त्यांनीं पुढें आपल्या थोड्या दिवसाच्या कारकीर्दीत इजिप्त आणि इराण व पालिस्ताईन सारखी मोठमोठाली राज्ये हस्तगत करून आपल्या राज्यास जोडिली. ह्यामुळें त्यांना लहानसहान कामें सुद्धां करण्यास वेळ कसा फावत होता ह्याचेच मोठें आश्चर्य वाटते. यांच्या कार-किर्दींत ज्या लहानमोठ्या सुधारणा आणि घडामोडी झाल्या तशा पुढें कधिंतकधिं एक शतक पर्यंत झाल्या नाहीत. तसेंच त्यांना आपल्या

रयतेचा ऐषआराम, सुख, आरोग्य आणि बढतीची कितपत काळजी होती हें खालील वृतांतांवरून सहज ध्यानीं येईल.

एके समयीं एक मुसाफर लोकांचा मोठा काफला मदिना येथें आला आणि तो काफला शहरा बाहेर उतरला. हें समजतांच उमर फारूक रात्रींच्यावेळीं त्यांच्या संरक्षणार्थ आपण स्वतः चौकीदारी करण्यास गेले. गस्त करित असतां त्यांना एकीकडून रडण्याचा आवाज ऐकूं आला ह्मणून तिकडे जाऊन पाहिलें असतां एक लहानसें मूल आपल्या आईच्या ओटींत रडत आहे. त्यांनीं त्या बाळाच्या आईस मुलास विनाकारण न रडूं देण्याविषयीं सक्त ताकीद देऊन दुसरें बाजूकडें गेले. पुन्हां फिरतां फिरतां तसेंच त्याच बाजूला थोड्यावेळानें आले तर तें मूल तसेंच रडत होते, ह्मणून त्यांनीं त्या बाईला पुन्हां ह्मटले कीं, तूं मोठी निर्दय आणि कठोर अशी बाई आहे. त्या बाईनें उत्तर दिले कीं, तुह्मी माझ्यावर विनाकारण कांवरें रागावतां? खरी गोष्ट विचारित असल्यास येथील खलिफा उमर हाच मोठा कठोर आहे. कारण त्याचा असा हुकूम आहे कीं, जो पर्यंत मूल आपले आईचें दूध पिणें सोडणार नाहीं तो पर्यंत त्या मुलाला सरकारांतून पगार मिळणार नाहीं ह्मणून मी आपल्या मुलाचें दूध पिणें सोडवित आहे. कारण जर त्यानें दूध पिणें लौकर सोडलें तरच त्याला सरकारांतून पगार मिळूं लागेल. त्या बाईला हें काय माहित होतें कीं, ती ज्यांच्याशी रागावून सांगत आहे ते हेच हजरत उमर खलिफा होतें. हे दृश्यानें हजरत उमरच्या मनाला बराच जब्बर धक्का बसला. तेथून परत आल्यावर दुसऱ्याच दिवशीं त्यांनीं आपल्या राज्यांत हुकूम जारी करून दिला कीं, ज्या दिवशीं मूल जन्मेल त्याच दिवसापासून सरकारांतून त्याचा पगार सुरू होईल.

तसेंच एके समयीं हजरत उमर रात्रीं गष्त करित असतां एक बध्दू आपल्या डेऱ्यापुढें जमिनीवर बसला होता. हजरत उमर सुद्धां त्याच्या पाशीं जाऊन बसले. इकडच्या तिकडच्या गोष्टी करित असतां त्या बध्दूच्या डेऱ्यांतून रडणें एकूं आले ह्मणून हजरत उमरनीं त्या बध्दूला विचयारले कीं, डेऱ्यांत कोण रडत आहे तेव्हां तो बध्दू ह्मणूं लागला कीं, माझ्या बायकोच्या पोटांत मूल ~~जन्मास येणाऱ्याचें दुःख~~ होत आहे त्यामुळें ती रडत आहे व ती डेऱ्यांत एकटीच आहे आणि या अहोरात्री तिच्या सुश्रु करितां दुसरी बाई मिळणें कठीण. हें ऐकून हजरत उमर तेथून उठून तसेंच आपले घरीं गेले. आणि आपले समागमें आपल्या स्त्रीस घेऊन त्या बध्दूच्या घरीं दाखल झाले आणि बध्दूची परवानगी घेऊन आपल्या स्त्रीस त्या बाईच्या सुश्रु साठीं डेऱ्यांत पाठविलें. थोड्या वेळानंतर त्या बुध्दूच्या बायकोस मूल झाले, डेऱ्यांतून हजरत उमरच्या पत्नीनें सांगितलें कीं " अहो आमिरूलमोमिनीन तुम्ही आपल्या मित्राचें अभिनंदन करा कीं, त्याच्या स्त्रीस मूल झाले." जेव्हां त्या बध्दूला समजले कीं, हे मदत करणारें खुद आमिरूल-मोमिनीन ह्मणजे खलिफा हजरत उमर आहेत तेव्हां तो भयानें गर्भ-गळीत झाला. हें पाहून हजरत उमरनीं त्याचें शांतवण करून त्यास सांगितलें कीं, भिण्याचें मुळींच कांहीं कारण नाहीं. तुम्ही उद्या सकाळीं दरबारी हाजर व्हा ह्मणजे तुमच्या नवजन्म बालकाचा पगार ठरवून दिला जाईल. व तेथून हजरत उमर आपल्या पत्नीसह आपल्या घरास परत आले. हें पहा इस्लामी धर्मानें बालसंगोपणाचा कसा प्रतिपाल केला ! मुलगा असो अथवा मुलगी असो जन्मतांच तत्काळ त्या नवजन्म बालकाचा पगार सुरूं करून दिला जात असें. ह्यामुळें अनायासें बालहत्या बंद झाली.

एके प्रसंगी हजरत उमर रात्रीं गष्त करण्यास निघाले असतां मदिन्याहून तीन मैलाच्या अंतरावर " सरार " ह्मणून एक ठिकाण

आई तेथें पोहोंचल्यानंतर त्यांना असें दिसलें कीं, एक बाई आपल्या झोपडींमध्यें स्वयंपाक करित बसली आहे. आणि तिची लहान लहान मुलें तिच्या शेजारीं रडत बसलीं आहेत. ह्मणून हजरत उमर त्या झोपडीं पाशीं गेले आणि त्या बाईला मुलांच्या रडण्याचें कारण विचारूं लागले त्याबाईनें सांगितलें कीं, ह्या मुलांना सांजापासून खाण्यास कांहींच मिळाले नाहीं. आणि माझ्या घरांत त्यांच्या खाण्यासाठीं मुळींच कांहीं नाहीं; ह्मणून ते अन्नासाठीं रडत आहेत, आणि त्यांच्या शांतवणासाठीं एका भांड्यांत पाणी घालून चूलीवर ठेऊन दिलें आहे. भांड्यांत अन्न शिजत आहे अशी त्यांची समजूत करित आहे. तदनंतर तत्काळ हजरत उमर मदिन्यांत येऊन बैतुलमाल जो गोर गरिबांसाठीं मुद्दाम ठेविलेला होता त्यांतून आपल्यास जितकें कांहीं खाण्याचें सामान उचलतां येईल तितकें स्वतः घेऊन त्या बाईच्या झोपडीवर पुन्हां परत आले आणि तिच्या स्वाधीन करून लागलीच त्यांच्या खाण्यासाठीं अन्न शिजऊन त्या सर्वांना जेऊं घातलें. त्या बाईनें आशिर्वाद देऊन ह्मटलें ईश्वर तुमचें कल्याण करो. जर खरी गोष्ट विचारित असाल तर मी खरें सांगतें कीं, अमिरूल मोमिनीन ( खलिफा ) तुम्ही व्हावयास पाहिजे होतें. पण लोकांनीं उमरला विनाकारण खलिफा निवडून मोठी चूक केली.

ह्याच हजरत उमरचा दररोजचा दस्तुर होता कीं, लढाईवर जे शिपायी जात व तेथून ते शिपायीमदिन्यांतील आपले नातलगांस जी पत्रें पाठवित ती पत्रें त्या त्या शिपायांच्या नातलगांस स्वतःहजरत उमर त्यांच्या घरोघरीं जाऊन वाटून देत व त्यांना त्या पत्रांचीं उत्तरें लिहून ठेवण्यास सांगत व पुन्हां दुसऱ्या दिवशीं त्यांची उत्तरें एकत्र जमा करून डाक रनर मार्फत त्या शिपायांना परत पाठवून देत. यदाकदाचित कोणास लिहिणें येत नसेल तर त्यांच्या पत्रांचीं उत्तरें तेथें बसून ते लिहून सुद्धां देत.

हजरत उमर हे शामदेशांतील जेरूशलेम शहरांतून मक्केस जाण्यास परत फिरले असतां कूफा नांवाच्या प्रांताच्या एका जिल्ह्यांतील एका गांवांत त्यांनीं एक तंबू पाहिला आपल्या स्वारीवरून उतरून डेऱ्याकडे गेले तेथें एक ह्मातारी दृष्टीस पडली. तिला विचारले तुला उमरचा कांहीं वृतांत माहित आहे काय? तिनें उत्तर दिलें होय तो शामांतून रवाना झाला आहे पण ईश्वर त्याचा नाश करो कारण त्याच्या कडून आज तागायत मला मुळींच कांहीं मिळालें नाहीं. त्यावर हजरत उमरनीं सांगितलें कीं, इतक्या लांब अंतरावरचें हाल त्याला कसे कळूं शकतील तिनें ह्मटलें जर त्याला आपल्या रयतेचा वृतांत कळत नाहीं. तर तो खिलाफतीच्या तक्तावर कशा करितां बसला? हे ऐकून हजरत उमरचें मनांत मोठा धक्का बसला. व डोळयांतून दुःखाश्रू निघूं लागून ते रडूं लागले. आणि राजधानींत पोहोंचल्यानंतर सदरहू ह्मातारीच्या खाण्यापिण्याची व्यवस्था लाऊन दिली. व पुढें अशा प्रकारचे निराश्रित लोकांची नेहमी काळजी बाळगित असत.

## अध्याय ६ वा.

# दोषनिवारक संग्रह

## -:इस्लामी धर्माचा विस्तार:-

——:o:——

इस्लामी धर्माचा अल्पकाळांत विस्तार अतित्वरेनें झाला आणि अशी अप्रतिम व भव्यपणाची वृद्धि होत आहे हें पाहून बहुतेकांचा अज्ञान पणामुळें असा गैरसमज झालेला आहे कीं, " इस्लामी धर्माचा प्रसार निव्वळ तरवारीच्या जोरावर झाला आहे. " तरी ह्या त्यांच्या अज्ञानःपणाच्या गैरसमजूतीमुळें किंवा दुराग्रहामुळें त्यांना वाटत असेल कीं, ह्या वरील वाक्याच्या उपयोगानें कदाचित इस्लामी धर्माच्या शुद्ध पणावर कांहीं कलंक लागेल, व त्यांत कांहीं उणपणा येईल करितां या वाक्याचा इस्लामी धर्मावर काय परिणाम होतो, हें आपण पाहूं.

प्रत्येक न्यायी व सुज्ञ अशा इसमानें आपल्या अति थोर मनानें खालील गोष्टींचा विचार केल्यास त्याचा उलगडा आपोआप पूर्णपणें होईल.

(१) अशा प्रकारचा भ्रम, दुराग्रह आणि मत्सर करणाऱ्यांना एक तर इस्लामी धर्माच्या इतिहासाची मुळींच माहिती नाहीं, किंवा ज्या कारणांमुळें समाजाची एकी जुळलेली असते आणि ज्या कारणांवर वाढ आणि घट अवलंबून असते ह्यांचे त्यांना ज्ञान नसते.

(२) तसेंच सत्य गोष्टी समजण्यांत प्रत्येकाची समज शक्ति कमीजास्त प्रमाणांत असते, ह्याचें सुद्धां त्यांना ज्ञान नसते.

(३) ईश्वराची शक्ति कोणत्याही गोष्टीचा उत्कर्ष व विस्तार करण्यांत आणि मुलूख हस्तगत कराविण्यांत किती परिपूर्ण आहे याचें त्यांना ज्ञान नसतें, असें समजते.

ह्मणून असा अज्ञान मनुष्य जो इस्लामी धर्मावर दुराग्रहानें विरोध करितो तो स्वतःच अज्ञानाच्या अंधःकाराच्या खोल महासागरांत पडून तो तिरस्काराच्या चिन्हाचाच फक्त द्रुशी बनला आहे इतकेच नव्हे तर त्याची स्थिति याहून सुद्धां जास्त निष्ठुरतेस पात्र आहे असें समजतें.

तसेंच कित्येकांचा तर अज्ञानाच्या भ्रमामुळें असा सुद्धां गैरसमज झालेला दिसतो कीं, इस्लामी धर्माचीं पुस्तकें वाचल्यानें आपला धर्म भ्रष्ट होतो कीं काय? तरी या करितां त्यांनीं त्यांच्याच जाती बांधवांतील कांहीं निपक्षपाती विद्वानांनीं इस्लामी धर्मासंबंधीं लिहिलेलीं पुस्तकें आणि इतिहास वाचले असते, तर असें उग्दार काढण्याचें त्यांना धाडस झाले नसतें. पण उलट त्यांचा खात्री झाली असती कीं, मुसलमानांनीं आपल्या धर्म प्रसारा प्रित्यर्थ कधींच आज पावेतों जुलूम केला नाहीं किंवा तरवार हातीं धरली नाहीं. हे थोडसें ज्ञान खर्च घातलें असतें तर त्यांना सहज समजलें असतें खुद्द हिंदुस्थानांतच सरासरी सात आठ शतकें इस्लामी बादशाही होती हें कोणास माहित नाहीं असें नाहीं. तेव्हां जर कोणास (हिंदूंना) जबरीनें मुसलमान बनविण्याचें थोडेसे प्रयत्न केलें असते, तर हिंदुस्थानांत जी आज सात कोटी इस्लामी लोकसंख्या आहे, त्या ऐवजीं सर्वच हिंदुस्थान निव्वळ इस्लामी बनला असता आज सुद्धां बरेंच देश असें आहेत कीं, जेथें इस्लामीच आबादी आहे उ.सें:- अरबस्थान ईराण आणि अफगाणिस्थान वगैरे

पुढें ज्यांना इस्लामी धर्मांच्या उत्कर्षा संबंधानें ज्यास्त ज्ञान प्राप्त करून घेण्याची उत्सुकता आहे त्यांनीं, ज्या निरनिराळया धर्मांच्या ग्रंथकारांनीं इस्लामी धर्मांच्या प्रसारावर जीं पुस्तकें लिहिली आहेत, ती वाचली असतां, त्यांना इस्लामी धर्मांच्या वाढीचें खरें गुह्य समजेल तरी पण येथें वाचकांच्या करमणूकीसाठीं हिंदू आणि ईसाई वगैरे धर्मांतील कांहीं विद्वान इतिहासकारांनीं इस्लामी धर्मांच्या सत्याबद्दल जें उद्गार काढून शाबिती करून दिली त्याचा थोडक्यांत खुलासा केल्यास अयुक्तिक होणार नाहीं.

सुप्रसिद्ध ग्रंथकार मिस्टर जॉन डयुनपोर्ट साहेब लिहितात, "कीं, कुराणी धर्म व त्याचे शिक्षणाचा प्रसार तरवारीच्या साहित्यानें वाढला असें ह्मणणें निव्वळ चुकीचे आहे. कारण प्रत्येक निःपक्षपाती इसम थोडासा विचार करून सहज समजूं शकतो कीं, हजरत महमंद यांचा धर्म असा कांहीं होता कीं त्यांत मनुष्य बली व कत्तली या ऐवजीं प्रार्थना (नमाज) आणि दान धर्म (जकात) यांनांच प्राधान्य दिलें आहे. आणि नेहमींचे भांडण व दंगे धोपे यांच्या ऐवजीं शुद्ध वर्तन आणि प्रेम यांची प्रस्थापना झाली होती. ह्मणून हींच मूळ कारणें इस्लामी धर्मांच्या विस्ताराचीं आणि उत्कर्षाचीं आहेत. वास्तविक पाहतां हा धर्म पूर्वेकडील लोकांना खरोखरच देणगी होती."

वरील उल्लेखावरून स्पष्टपणें कळतें कीं, जर कोणा एका परधर्मीय न्यायी अशा इसमानें आपल्या ज्ञानाला इतिहासावरून वाढविलें आणि त्यांतल्या त्यांत त्यानें मत्सर आणि बालपणांत ऐकलेल्या ज्ञानाचे मिश्रण होऊं न दिलें तर त्याला स्पष्टपणें कबूल करावे लागते कीं, विरोधी आणि मत्सरी लोकांनीं इस्लामी धर्मांच्या प्रसारावर विचार करण्यांत निःपक्षपातानें; प्रामाणिकपणें ज्ञान खर्ची करून न्यायाचें कार्य केलें नाहीं.

जिज्ञासू वाचकांचें लक्ष आणखी कांहीं अशा प्रकारच्या मनोवेधक गोष्टींकडे वळवितों.

(२) इस्लामी धर्माचा, निव्वळ तरवारीच्या जोरावर विस्तार झाला हें जर खरें आहे, तर मिस्टर कारलॉईल ग्रंथकारांच्या ह्या खालील प्रश्नाचें काय बरें उत्तर आहे?

श्रेष्ठ पैगंबर महमंद यांनीं जर तरवार धारण करणाऱ्या शिपायांच्या जोरावर इस्लामी धर्माचा प्रसार केला तर मग पहिल्या प्रथम त्या शिपायांना कोणाच्या तरवारीनें मुसलमान बनविलें बरें? ह्यावरून तर असें व्हावयास पाहिजे होतें कीं, ज्या ठिकाणीं तरवारीनें या धर्माचें मुळींच सहाय केलें नाहीं त्या मुलुखांत तर इस्लामी धर्माची पडछाया सुद्धां पडावयाची नव्हती. सर्वांना विदित आहे कीं, इस्लामी धर्माच्या बाळपणांतच त्यावर कसें विकट प्रसंग आणि अरिष्टें आलीं होतीं. इस्लामी धर्माचे कट्टर हाडवैरी कुरेशातील अबुजहल आणि अबुसफियान सारख्यांच्या धूरिणत्वाखालीं जमून त्यांनी मुसलमानांना अरबस्थानांतून अबिसीनियांत हांकलून लाविलें होतें. व हें लोक इतकेंच करून उगे राहिलें नव्हते. तर पुढें अबिसीनियाच्या बादशाहाच्या दरबारापर्यंत त्यांचा पाठलाग करून, त्यांनीं मुसलमानांना त्याच्या राज्यांत राहूं न देण्यासाठीं जासूद सुद्धा पाठविलें, पण तेथील बादशाहानें त्या कुरेश्यांच्या जासूदास घालवून दिलें आणि त्या निराश्रित इस्लामी लोकांना आश्रय देऊन आपल्या राज्यांत राहण्याची सढळ मनानें मोकळीक दिली होती. त्या राजाच्या ह्या उपकाराबद्दल तर इस्लामी लोकांना त्यांचे विरुद्ध तरवार उचलण्याचें मुळींच कधीं कारण पडलें नाहीं. पण त्या ठिकाणीं आज अर्धी लोकसंख्या इस्लामी धर्माची आहे.

आफ्रिकेच्या त्या प्रदेशावर जेथें इस्लामी शिपायांचे कधीं मुळींच

वारें सुद्धां लागलें नव्हतें त्या ठिकाणीं कां बरें एवढी मोठी इस्लामी आबादी दृष्टीस पडते?

चीन देशावर कधींच इस्लामी फौज पाठविली गेली नसून सुद्धां त्या देशांत तीन चार कोटी मुसलमान कोठून बरें आले?

मलाया द्विपकल्पें तर मुळापासूनच इस्लामी सलतनतपासून अलिप्त राहिलीं पण आज तेथें चार कोटी मुसलमान कोणत्या प्रकारें उत्पन्न झालें बरें?

सियाम, अनाम आणि पूर्वेकडील द्विपकल्पांत मुसलमान शिपायांचे पाऊल सुद्धां पडलें नाहीं पण त्या ठिकाणीं कशी बरें इस्लामी आबादी झाली?

तसेंच तुर्क आणि तातारी (मोगल) हे प्रथमतः मुसलमान झालेले नव्हते, आणि त्यांनींच एकेकाळीं मुसलमानावर तरवारी चालविल्या होत्या, पुढें त्यांच्यावर कोणी बरें तरवारी चालवून त्यांना मुसलमान बनविलें?

आतां या सुधारणेच्या विसाव्या शतकांत दक्षिण अमेरिकेंतील ब्राजील वगैरे देशांत पन्नास हजार लोकांनीं इस्लामी धर्माचा अंगीकार केला, तरी त्यांचेवर कोणत्या फौजा पाठवून व कोणाच्या तरवारीनें त्यांना मुसलमान बनविलें बरें?

एक फ्रेंच डॉक्टर गुस्तावलीबान हे आपल्या अरबस्थानच्या सुधारणा (तमदुन) संबंधींच्या पुस्तकांत लिहितात कीं, :- "आपण अरब लोकांच्या विजयावर दृष्टी टाकून पाहिलें असतां असें कळतें कीं, त्यांनीं आपल्या धर्म प्रसाराप्रित्यर्थ तरवारीचें मुळींच सहाय घेतलें नाहीं, कारण मुसलमान लोक नेहमीं आपल्या अंकित झालेल्या लोकांना

त्यांचे धर्म संस्कार करण्यास मोकळे सोडून देत असत. मुसलमानांचे अंकित झालेल्या ईसाई धर्मातील लोकांनीं त्या विजयीं मुसलमान लोकांच्या धर्माचा अंगिकार केला, इतकेंच नव्हे, तर पुढें सरते शेवटीं त्यांच्या भाषेचा सुद्धां त्यांनीं अंगिकार केला. याचें मुख्य कारण ह्मटलें ह्मणजे आपल्या ईसाई धर्मातील सरदारांपेक्षां हे नवीन आलेले मुसलमान सरदार जास्त शांत, आणि मोठे न्यायीं असे होते. तसेंच त्यांच्या जुन्या ईसाई धर्मापेक्षां हा नवीन इस्लामी धर्म त्यांना जास्त सत्य आणि साधा असा आढळला. इतिहासावरून सर्वस्वी असें शाबित होतें कीं, "जगांतील कोणताच धर्म तरवारीच्या जोरावर विस्तार पावत नाहीं." ज्या काळीं ईसाई लोकांनीं तरवारीच्या बळानें अरबापासून स्पेन देश जिंकला त्यावेळीं तेथील अंकित झालेल्या मुसलमानांनीं मृत्युला वळी पडणें, आणि देश त्याग करणें पत करले पण आपला धर्म सोडला नाहीं. इस्लामी धर्माचा प्रसार तर निव्वळ सदुपदेश, साधी राहणी, सद्‌गुण आणि वक्तृत्वाच्या भाषणांनीं वृद्धींगत झाला. आणि ह्याच कारणांमुळें मोगल व तारतरी ह्यांनीं इस्लामी धर्माचा अंगीकार केला.

पुढें इतिहासकार रॉबर्टस आपल्या चार्लिस पंचममध्यें लिहितों कीं :- "मुसलमानांच्या धर्म प्रसाराच्या उत्सुकते बरोबर निःपक्षपात आणि न्याय सुद्धां सामील होता. एकीकडे तर ते आपल्या पैगंबराच्या धर्माचा प्रसार करित व दुसरीकडे जे लोक त्यांचा धर्म स्वीकारित नसत त्यांना त्यांच्याच जुन्या धर्मावर कायम राहूं देत."

तसेंच मेशू आपल्या ग्रंथांतील धर्मयुद्धा (Crusade) च्या वर्णनांत लिहितों कीं, "ज्या वेळीं हजरत उमरनी (खलिफा दुय्यम) बैतुल मुकद्दम (जेरुशलेम) जिंकलें, त्यावेळीं त्यांनीं ईसाई लोकांचा मुळींच

छळ केला नाहीं व पुढें कांहीं शतकानंतर जेव्हां ईसाई लोकांनीं ह्याच शहरास मुसलमानांपासून परत घेतलें तेव्हां त्यांनीं मुसलमानांची मोठ्या निर्दयतेनें कत्तल उडविली, आणि यहुद्यांना जाळून टाकलें "

पुन्हां फ्रेंच डॉक्टर गुस्तावलीबान यांनीं याच जेरुशलेमच्या जया संबंधीं लिहिलें आहे कीं, "बैतुल मुकद्दसच्या जयाचे समयीं हजरत उमरचे सद्गुण व औदार्य शाबित करतात कीं, मुलुख हस्तगत करणारे इस्लामी लोक आपल्या अंकित झालेल्या लोकांशीं अती नम्र वर्तन करित होते. पुढें ईसाई लोकांनीं ह्याच शहरास कांहीं शतकानंतर हस्तगत केलें तेव्हां त्यांनीं जें वर्तन केलें त्याची तुलना केल्यास मोठें कौतुक वाटतें. इस्लामी दुयम खलीफा हजरत उमर हें फारच थोड्या लोकांनिशी या शहरांत दाखल झालें होते. त्यांनीं 'सफरुनिस वतरीक' (ईसाई लोकांचे धर्माध्यक्ष व सरदाराचे नांव आहे.) याला सुद्धां शहरांत आपले समागमें दर्शनास चालण्यासाठीं विनंती केली होती. ह्या प्रसंगीं प्रथमतःच हजरत उमरनी शहरांतील लोकांची मालमत्ता, व त्यांच्या धर्मस्थळाचें कोणत्याही प्रकारें अपमान न व्हावा व तसेंच ईसाई लोकांच्या गिरजा (चर्च) मध्यें मुसलमानांना प्रार्थना करण्याचा मुळींच हक्क नाहीं अशा प्रकारची खबरदारी घेऊन तेथें ह्याही फिरवून हमी घेतली होती. याच प्रमाणें हजरत उमरच्या सेनापती उमरूबिन अल आस यानें जेव्हां इजिप्त (मिसर) काबिज केला तेव्हां त्यानें त्या देशांतील रहिवाशाशीं जें नम्र वर्तन केलें, तें सुद्धां या पेक्षां कांहीं कमी नव्हते. त्यानें मिसरच्या लोकांना कोणतेच बंधन न घालतां पूर्ण धर्म स्वातंत्र्य पूर्ण न्याय, आणि त्यांच्या मालमत्तेचें संरक्षणाचें पूर्ण हक्क त्यांना दिलें जाईल, असें अभिवचन दिलें होते. आणि त्याच देशांत मुसलमानांच्या पूर्वी ईसाई धर्माच्या ग्रीकच्या बादशाहाची अमलदारी होती, त्या ग्रीक लोकांनीं बऱ्याच जुलमी आणि कडक अटी घालून मिसरी लोकांपासून जो जबर कर वसूल

केला जात होता; त्या ऐवजीं मुसलमानांनीं फक्त एक जजिया ह्मणून लहानसा कर त्यांच्याच संरक्षणार्थ घेतला जाईल असें ठराविलें. आणि ही रक्कम फक्त दहा रुपये सालीना होता. ह्या अटीला त्या लोकांनीं तत्काळ सहज कबूल करून घेतलें. आणि ती जजियाची रक्कम सुद्धां पेशगी दाखल जमा करून दिली. त्या ईसाई धर्माच्या ग्रीकच्या कान्स्टानटाईन बादशाहीच्या सरदारांचा नाना प्रकारचे जुलूम आणि छळ त्या मिसरच्या लोकांना सोसावा लागे तोच आतां मुसलमानांनीं त्यांच्याशीं इतकें कांहीं नम्र वर्तन केलें, त्यामुळें मिसरचे ईसाई लोक मोठ्या मोकळया मनानें एका मागून एक इस्लामी धर्माचा अंगिकार करूं लागले. आणि पुढें लौकरच त्यांनीं त्यांची अरबी भाषा सुद्धां स्वीकारली. या साठीं मी वारंवार सांगेन कीं, असें अप्रतिम यश तरवारीच्या बळावर मुळींच कधीं प्राप्त होऊं शकत नाहीं."

ग्रंथकार सिल साहेब लिहितात कीं, "इस्लामी धर्म तरवारीच्या जोरावर वाढला असें ह्मणणारे खचीत मोठी चूक करतात. आणि ज्या मोगल व तार्तरी लोकांवर मुसलमानांनीं कधीं सैन्य पाठविलें नाहीं त्याच मोगल व तार्तरी लोकांनीं प्रथमतः मुसलमानांच्या खिलाफतीस मोडकळीस आणलें. पण अशा लोकांनीं कां बरें इस्लामी धर्म स्वीकारला? यावरून तर असें वाटतें कीं, ह्या इस्लामी धर्मांत कांहींतरी विशेष अमानुष शक्ति होती ह्मणूनच तर हे लोक इस्लामी धर्मांत शिरलें. आणि अशा प्रकारें त्या धर्माची भरभराट होत गेली. करितां यावरून असें सिद्ध होते कीं ते लोक इस्लामी धर्मातील खऱ्या औदार्याला मोहीत होऊन मुसलमान बनलें."

पुढें एलफिन्स्टन साहेब हें हिंदुस्थानांतील हिंदूना सुद्धां मुसलमानांनीं बाटविल्याचें मुळींच कबूल करित नाहींत. यासाठीं ते लिहितात कीं, "महंमूद गजनवीनें एखाद्या हिंदूला देखील बळजबरीनें

मुसलमान बनविलें नाहीं; आणि त्यानें लढाई खेरीज करून हिंदून्य। रक्तानें आपली तरवार भ्रष्ट केली नाहीं. "

आतां इस्लामी धर्माचा श्रेष्ट पैगंबर आणि इस्लामी धर्माच्या विस्ताराबद्दल हिंदूस्थानांतील सुप्रसिद्ध अशा कांहीं हिंदू ग्रंथकाराचे दाखले खालीं सादर करितों:-

एका जगप्रख्यांत व्यक्तिच्या दृष्टीनें इस्लामी धर्म माहात्मा गांधी ता. १७-९-१९२४ इ. रोज बुधवारचा "बॉंबे क्रानिकल" नांवाच्या पत्रांतील उतारा.

" I became more than ever convinced that it was not the sword that won a place for Islam in those days in the scheme of life. It was the rigid simplicity, the utter self-effacement of the Prophet the scrupulous regard for pledges, his intense devotion to his friends, his intrepidity his fearlessness, his absolute trust in God and his own mission. These and not the sword, carried every thing before them and surmounted every obstacle.

पुढें महात्मा गांधी ह्मणतात कीं,:- "मुसलमानांचा धर्म असत्य धर्म नाहीं, करितां हिंदूंनीं ह्या सत्य धर्माचा चांगल्या प्रकारें आणि निपक्षपातानें अध्ययन केल्यास ते ह्याशी इतकाच प्रेम करूं लागतील, जितका मी करित आहे. "

सन्माननीय श्रेष्ठ पैगंबर हजरत महंमद (ज्याचेवर ईश्वराचा अशीर्वाद होवो). हे आपल्या समाजांतील कुरेशी लोकांस व तसेंच आपले नातलगांस ईश्वराच्या अद्वैत्वाबद्दल ह्मणजे ईश्वर एक आहे व

तोच फक्त पुजेस पात्र आहे, त्याच्या बरोबरीचा असा कोणीच नाहीं. अशा प्रकारचा सत्य मार्ग पत करण्याचा व सदाचरणाचा सदोपदेश करित असत. व कृष्णलीलामय ग्रंथ ( कुराणशरीफ ) लोकांस ऐकवीत ह्यामुळें त्यांच्या सत्य तत्वांना लुब्ध होऊन लोक दिवसें दिवस इस्लामी धर्मास मोठ्या आनंदानें पतकरूं लागले. इस्लामी धर्माची संख्या वाढूं लागून त्या धर्मास उर्जितकाल प्राप्त होऊं लागला हें त्यांच्या वैऱ्यांना बरें दिसेना, ह्मणून ते लोक श्रेष्ठ पैगंबरास त्रास देऊन उपद्रव देत आणि तसेंच त्यांच्या अनुयायांचा छळ करण्यांत मोठें भूषण समजत. पुढें एके दिवशीं कुरेशांतील नवकोट नारायण व पुढारी " अबुजहल " यानें आपल्या समाजांतील लोकांस एकत्र करून त्यांचे समोर एक मोठें स्फूरण चढविणारें आणि उत्तेजन भाषण करून त्यांना उद्देशून ह्मणूं लागला कीं, " अहो कुरेशा ! तुह्मां सर्वांस एका अशिक्षीत आणि निराश्रित अशा इसमानें ह्मणजे महंमद यानें तुमच्या मुर्तींना तुच्छ मानून त्यांची निंदा करून निर्भत्सना केली व तुमच्या पूर्वजांना नरकांत जाण्याची वाट दाखविली, ह्या त्यांच्या ह्मणण्याचा व वर्तनाचा तुमच्या मनांवर मुळींच परिणाम होत नाहीं, हें कसें? तुमची लज्जा कोठें गेली ? तुमचे जिणें निरर्थक आहे. असें मला वाटतें ! आणि त्या एकट्या मनुष्यानें तुह्मां सर्वांस खालीं पहावयास लावलें, ही मोठी खेदाची गोष्ट आहे ! ह्या सर्व गोष्टी तुह्मांस कशा बरें सहन होतात, ह्याचेंच मला मोठें आश्चर्य वाटतें! मला तर त्या मुळींच सहन होत नाहींत, आणि ह्या त्यांच्या कृतीबद्दल तुह्मां पैकीं कोणासच सुद्धां त्यास शासन करण्याचें किंवा त्याला जिवें मारण्याचें धैर्य अझून कसें होत नाहीं, हें पाहून तर मला अधिकच कौतुक वाटतें. " अशा प्रकारें नानातऱ्हेनें त्यानें आपल्या लोकांना चिथवून पुन्हां उद्देशून ह्मटलें कीं, "जर तुमच्यापैकीं जो कोणी त्या निराश्रित महंमदास जिवे मारील तर त्यास मी चांगलें शंभर उंट बक्षीस देईन. या करितां हें कार्य कोण पतकरतो, हें मला

आतां पाहणें आहे. ”

ह्या त्याच्या वरील भाषणाचा त्या लोकांच्या मनांवर विजेप्रमाणें तत्काळ परिणाम झाला आणि त्यामुळें प्रत्येक जण श्रेष्ठ पैगंबराचा हाड-वैरी बनला आणि त्यांना जिवे मारण्याचा प्रत्येकजण आपल्या मनाशीं विचार करूं लागला.

इतक्यांत ह्या सभेंत प्रथमतःच आपल्या हातांत नागवी तरवार घेऊन उभा राहिला तो महावीर व शूर असा "उमर" होता. उठतां क्षणींच त्यानें अबुजहलला पुन्हां एकवेळ भर सभेंत विचारलें कीं, जर तूं आपल्या वचनावर पूर्णपणें कायम आहे तर मी महंमद यास जिवें मारण्यासाठीं विडा उचलतों. अबुजहल यानें सर्वां समक्ष आपल्या वचनावर कायम असण्याबद्दल आपल्या देवाची शपथ घेतली तसेंच त्यावेळीं उमरनें सुद्धां शपथ वाहिली कीं जोंपर्यंत मी महंमदाला जिवें मारणार नाहीं तोंपर्यंत मी आपल्या हातांतील तरवार खालीं ठेवणार नाहीं. अशी उमरनें शपथ वाहिली, हें ऐकून (कुरैशांना) अति हर्ष वायू झाला आणि त्यांना वाटूं लागलें कीं, आतां हें कार्य तडीस गेल्यावांचून राहणार नाहीं, अशी त्यांची पक्की खात्री होती, कारण उमर सारखा दुसरा धैर्यवान वीर त्यांच्यांत त्यासमयीं मुळींच नव्हता.

पुढें उमर आपले हातांत नागवी तरवार घेऊन श्रेष्ठ पैगंबरास जिवें मारण्यासाठीं निघाला. ह्यावेळीं श्रेष्ठ पैगंबर हे "अरकम" नांवें अनुयायाच्या घरीं आपल्या अनुयायांना धर्मोपदेश करित होते. इकडे उमरला वाटेंत त्याचा एक मित्र भेटला. त्यानें उमरला विचारलें कीं, "अहो उमर तुह्मी आज आपले हातांत नागवी तरवार घेऊन कोणती मोहिम सर करण्यास निघालांत?" उमरनें सभेमध्यें घडलेला सर्व वृत्तांत निवेदन केला. हें ऐकून उमरच्या मित्रानें त्यास सांगितलें, "मोठ्या आश्चर्याची गोष्ट आहे कीं, तुह्मी त्या श्रेष्ठ पैगंबरास जिवें

मारून इस्लामच्या नवीन कोमल झाडाचें मूळ नाहींसे करण्यास जात आहां! पण तुह्माला आपल्या स्वतःच्या घराची खबर नसावी ही मोठी खेदाची गोष्ट आहे! तुह्मी प्रथमतः आपल्या बहिणीच्या घरीं जाऊन पहा ती आणि तिचा नवरा ह्या दोघांनीं त्या श्रेष्ठ पैगंबरावर श्रद्धापूर्वक विश्वास ठेवून त्यांच्या धर्माचा अंगिकार केलेला आहे. आणि सध्या ते दोघेजण कुराणाचे पठण करित बसलें आहेत" हें वाक्य उमरच्या कानीं पडतांच त्याच्या तळव्याची आग मस्तकांत गेली ~~आऊन~~ व त्यामुळें त्याला अति अनिवार राग आला आणि त्या आवेशांत तो तसाच प्रथमतः आपल्या बहिणीच्या घरीं गेला. उमरला हातांत नागवी तरवार घेऊन येतांना पाहिल्या बरोबर त्याच्या बहिणीनें आपल्या हातांतील कागद ज्याच्यावर कुराणांतील कांहीं महावाक्यें लिहिलेली होती व ते वाचीत बसली होती. तो कागद तत्काळ भयामुळें लपविला पण उमरनें त्यांच्या पठणाचा आवाज ऐकिला होता ह्मणून त्याच्या मित्राच्या ह्मणण्याप्रमाणें त्याची पक्की खात्री झाली होती. त्यानें आपल्या बहिणीस व तिच्या नवऱ्यास विचारलें कीं, तुह्मी आतां काय वाचीत होते? त्यांनीं भीत भीत उत्तर दिलें कीं, श्रेष्ठ पैगंबरावर निर्माण झाल्याचें कुराणांतील कांहीं वेंचें वाचीत होतो. हें ऐकून उमर आपल्या बहिणीच्या नवऱ्यास नवीन पंथाचा त्याग करण्यास सांगून, मारूं लागला. ह्या त्यांच्या मध्यस्तींत उमरच्या बहिणीस सुद्धां कांहीं चोप बसला त्यामुळें तिच्या अंगाचे रक्त वाहूं लागलें. ह्मणून उमरच्या बहिणीनें ह्मटलें आतांतर जिव निघून गेला तरी बेहतर पण हा महंमदी धर्म सोडणार नाहीं. हें ऐकून उमर थोडा शांत पडला. आणि आपल्या बहिणीस विचारूं लागला कीं, तुह्मी काय बरें वाचात होते ते मला तर एक वेळ वाचून दाखवा? जेव्हां त्यानीं उमरला त्या कागदावर लिहिलेले कुराणांतील वेंचे वाचून दाखविलें, तेव्हां ते ऐकून उमरच्या मनावर विचित्र परिणाम होऊन त्याच्या तोंडांतून तत्काळ उद्गार निघालें

कीं, "खरोखर, ही वेंचे तर ईश्वर निर्मित आहेत" आणि पुढें ह्मणूं लागला कीं, "आतांचें आतांच माझे दोन्ही हात बांधून मला त्या श्रेष्ठ पैगंबराच्या सेवेशी, त्याच्या चरणीं मला आपले डोकें ठेवण्यासाठीं घेऊन चला" उमरच्या बहिणीच्या नवऱ्यानें उमरला त्याच्या ह्मणण्याप्रमाणें तसाच श्रेष्ठ पैगंबराच्या सेवेशी, "अरकम" नांवाच्या अनुयायांच्या घरीं नेलें. तेथें घराचे द्वार बंद होते कारण त्या अनुयायांना कुरैशांच्या कारस्थानाची व उमरच्या खुनी इराद्याची पूर्वीच वार्ता लागली होती ह्मणून ते दार बंद करून आंत बसलें होतें.

हा एक मोठा बिकट आणि आणीबाणीचा जिवावरचा प्रसंग होता. कारण कुरैशांतील सर्वांहून पराक्रमी व सर्व हत्यारांनीं सज्ज झालेला बहादूर सरदार आपल्या गळयांत नागवी खूनी तरवार घालून आलेला दारा पाशी उभा होता. उमरनें द्वार उघडण्यास हांक मारली तोंच आंतील सर्व लोक भयानें गर्भगळींत झाले. पण श्रेष्ठ पैगंबरांनीं स्वतः जाऊन आपले हातानें द्वार उघडलें. तोंच उमर आंत शिरला तेव्हां पैगंबरानीं त्याला उद्देशून ह्मटलें कसें काय "खताबाच्या मुला" तुझा काय हेतु आहे? उमरनें उत्तर दिलें कीं, "मी आपला दासानुदास, हुजुरच्या चरणीं मी आपले मस्तक अर्पण करण्यास सादर झालों आहे. तरी आपल्या दास्यत्वाची माळा माझे गळयांत घालण्याचे भूषण मला प्राप्त करून घेऊं द्या आणि लौकर आपल्या खऱ्या धर्माची दिक्षा द्या." पुढें कलमा पढून उमरनें इस्लामी धर्म स्वीकारला.

आतां ही पहा इस्लामी धर्माची तरवार जिनें मोठमोठ्या खुनी इराद्याच्या कुरैशांतील बलाढ्य सरदाराच्या गळयांत खऱ्या धर्माची माला घालून त्यास वाकावयास लाविलें. हें होतें इस्लामी धर्माचें खरें उदात्त तत्व! शत्रुतील सर्वांत प्रख्यात व शूर अशा विराला मित्र करून टाकलें.

जे लोक तरवारीनें इस्लामी धर्माचा प्रसार झाला असें ह्मणतात त्यांनीं ही कथा मननपूर्वक वाचली असतां त्यांची खात्री होईल कीं, इस्लामाचा प्रसार तरवारीनें झाला नसून प्रेमानें झाला. असें हजारों दृष्टांत इस्लामी धर्मांत सांपडतात, त्या सर्वांचा उल्लेख स्थल संकोचा-स्तव येथें करतां येत नाहीं. तरी इतक्यावरून खात्री होईल.

इस्लामी धर्म निष्कलंक आणि पवित्र आहे: आणि जे लोक इस्लामी धर्माचा अंगिकार करतात, ते लोक इस्लामी धर्माच्या सत्य आणि पवित्र तत्वांना लुब्ध होऊन त्यांना स्वीकारतात, हें स्पष्टपणें निदर्शनास आलें आहे.

---

## कुराण शरीफाच्या शब्द लालित्यानें बुद्धि विस्मित होते

कौन्ट हेनरी कॉस्टरी यानें " अल इस्लाम " नांवाचें पुस्तक फ्रेंच भाषेंत लिहिलें आहे. त्याचें भाषांतर इजिप्तचा सुप्रसिद्ध ग्रंथकार " महमद फत्त-बुक जागलूल पाशा यानें इ. स १८९८ मध्यें करून ते प्रकाशित केलें. सदरहु कौन्ट लिहितो कीं, कुराणाचें ईश्वरी प्रगटी-करण अति बिकट आणि गूढ बाब आहे. कारण ज्ञानी मनुष्य त्याचा उलगडा करूं शकले नाहींत. अशा प्रकारचें गहन उद्गार त्या निरक्षर व्यक्तीच्या तोंडून कसें निघालें. याकरितां बुद्धी विस्मयींत होऊन जाते. पुर्वेकडील जगानें कबूल आहे कीं, ही तीच वाणी आहे जिच्या शब्दानें आणि अर्थानें ह्याच्या सारखा दुसरा नमुना सादर केला जाऊं शकत नाहीं. ज्याच्या अतिथोर व उच्च व वक्तृत्वाच्या शब्द लालीत्यानें उमर बिन खत्ताब सारख्याचें समाधान झालें, खरोखर हें तसेंच उद्गार आहेत. आणि त्यामुळें तो ईश्वराची स्तुति करणारा निस्सिम भक्त

बनला. ही तीच वाणी आहे कीं, यहियांच्या जन्मासंबंधीं त्यांतील कांहीं महावाक्यें जाफर बिन अबुतालिब यानें नजाशी बादशाहाच्या दरबारी वाचलीं तेव्हां त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या होत्या आणि बिशप ओरडूं लागला होता कीं, ही वाचा ज्या ज्योतीच्या प्रवाहापासून निघाली तिच्याच पासून ईसा (अलेसलाम) चे उद्गार निघाले होते. जगांसाठीं परमेश्वरानें कुराण ग्रंथ आपला प्रेशित श्रेष्ठ पैगंबर यांचेकडून निर्माण केला. तेव्हां पासून तो आज तागायत तसाच मोठ्या भव्य मर्मपणानें गुह्य असाच चालत आला आहे. जादूला तोडणें अभेद्य असून ते मनुष्य मात्राच्या शक्ति बाहेर नाहीं परंतु कुराण शरीफचे परिणाम सर्वांवर झालेच पाहिजेत.

एशिया आणि आफ्रिका खंडामध्यें इस्लामी धर्माच्या प्रसाराचें आणि निरनिराळया पंथांना आपले अंकित करून त्यांना आपलेसें करून घेण्याचें आणखी एक दुसरें कारण आहे.

इस्लामी धर्माचें मुख्य तत्व, ज्यामुळें ते असें कार्य करित होतें, तें ह्मटलें ह्मणजे, जो समाज इस्लामी धर्म स्वीकारी त्या समाजाचे प्राण, मालमत्ता वगैरे सर्व सुरक्षित राहीं, पण जें कांहीं आपल्या पूर्वजांच्या धर्मास चिटकून राहत त्यांच्यावर एक शुल्क कर ज्याला जजिया असें ह्मणत, तो त्यांना द्यावा लागे. आणि मग त्यांच्याशीं जें वर्तन इतर मुसलमानांशीं राहत असे, तेंच वर्तन त्यांच्याशीं राहत असे. इस्लामी धर्माचें उपदेशकत्व शास्त्री त्यांच्याशीं कोणत्याच प्रकारचा द्वेष भाव ठेवीत नसत. हें कुराण करीमच्या शिक्षणाचा परिणाम होता. आणि पहिले आद्य खलिफा यांचेच पदोपदी चालत होतें. इस्लामी धर्माच्या छत्राखालीं ईसाई लोक समाधान पावले व धर्म प्रसारांत त्यांच्या धर्मातील कोणीच त्यांना आडवे येत नसत खरें ईसाई आणि नास्तिक यांच्यांत सुद्धां कोणनाच दुजाभाव समजला जात नसे. पवित्र कुरा-

णाच्या आज्ञेनुसार हें शिक्षण होतें आणि त्याच प्रमाणें त्यांची वर्तणूक होती आणि अ.द्य खलिफा याच प्रमाणें वागत असत.

मिस्टर राबिनसन इतिहासकार लिहितात, कीं, "इस्लामी धर्मीयांच्या विजयी आणि फत्ते करणाऱ्या सेनेनें शाम देश हस्तगत केला अथवा उत्तर आफ्रिकेंत जाऊन आपला झेंडा रोविला किंवा तांबडा समुद्र ओलांडून भूमध्य समुद्रांत आपले पाऊल ठेविलें तरी ते लोक ज्या ज्या ठिकाणीं पोहोंचलें त्या त्या ठिकाणीं त्यांनीं कुराणांचे शिक्षण आपले समागमें नेलें व त्या कारणामुळें त्यांनीं कोठेंच जुलूम आणि जबरी केली नाहीं. व कोणत्याच समाजानें इस्लामी धर्म स्वीकारण्याचें नाकारल्यामुळें त्यांच्यावर तरवार उचलविली नाहीं.

इस्लामी धर्मांतील युद्धां संबंधाच्या कांहीं तत्वांचा विचार करण्यासारखा आहे, त्यांतील अटी व तत्वें ह्मटलीं ह्मणजे जेव्हां जेव्हां मुसलमानांना त्यांच्या शत्रुनीं युद्धामंत्रण दिलें किंवा मुसलमानांना त्याच्या शत्रूंनीं युद्ध करण्यास भाग पाडलें, तेव्हां तेव्हां युद्ध होण्यापूर्वींच आपल्या शत्रूंशीं प्रथमतःच सलोख्याचें वर्तन ठेवून युद्ध न करण्यासाठीं कांहीं शांत व नम्र अशा खालीं दर्शविलेल्या अटी ते घालीत असत. जर त्यांतील पहिली किंवा दुसरी अट मान्य झाली तर तत्काळ समाधान कारक निकाल होऊन जाई. जर पहिल्या दोन शर्ती मान्य न झाल्या तर मग तिसऱ्या अटी प्रमाणें युद्ध करणें भाग पडे. त्या अटी येणें प्रमाणेः-

इस्लामी धर्म स्वीकारण्यासाठीं

(१) कल्याण कारक, हितकर व निष्ठापूर्वक चांगल्या उद्देशानें युद्ध न करण्यासाठीं मुद्दाम मागणी केली जाते कीं, तुह्मी आमच्यांत सामील होऊन एकजीव बनून जा, आणि आह्मांप्रमाणेंच तुह्मी सुद्धां लोकांचें कल्याण करण्याचा प्रयत्न करा.

खंडणी देणें — (२) जर तुमच्यांत वरील अट मान्य करण्याचें धैर्य व सामर्थ्य नसेल तर मग आह्मास तरी तुमचे उतराई होण्याची संधी द्या, मग आह्मी तुमची कशी उत्कृष्ट सेवा करून तुमचे कल्याण कसें करितों, तुमचे सर्व प्रकारें जिवाचें व मालाचे संरक्षण कसें करितों, तुमची उन्नती कशी करितों, शत्रू पासून तुमचा कसा बचाव करितों व तुह्मांस कायमचें सुख कसें प्राप्त करून देतों; ह्या सर्वांचा उपभोग घेत दुरूनच आनंदानें पाहत बसा. जर ही अट मान्य होत नसेल तर शेवटची अशी तिसरी अट घातली असे.

ह्या वरील दोन्ही अटी जेव्हां नामंजूर केल्या जात तेव्हां निरुपायास्तव तिसरी अट घालावी लागे ती अशी.

युद्ध — (३) या वर दिलेल्या दोन्ही अटींचा पुन्हां एकवेळ शांत मनानें विचार करा. जर त्या ध्यानीं येत नसतील व तुह्मी प्राणीमात्राचे शत्रू असाल तर आह्मी जें सर्व जगाचे कल्याण करण्यासाठीं आपल्या जिवांना आपत्तींत टाकून उपास माराचें संकट भोगून, आपला देश, मुलेंबाळें, घरदार सोडून, जगाचे कल्याण करण्याचा विडा उचलून बाहेर पडलों आहोंत अशा उतराई लोकांच्या लोकोपकारी शुभ कार्यांत व्यत्यय आणण्याची जर तुमच्यांत शक्ति असेल तर तिला प्रतिबंध करा.

युद्ध जुंपल्यास त्यांत मुसलमानांना यश प्राप्ती मिळाल्या नंतर अंकित झालेल्या लोकांपासून शर्त नंबर २ प्रमाणें जजिया घेऊन, त्यांना मुसलमाना प्रमाणें मोठ्या सलोख्यानें वागवून त्यांचें संरक्षण केलें जात असें.

वरील अटीचा थोडक्यांत उल्लेख करणें ह्मणजे मि. काणे वकील उमरावती यांनीं पैगंबराच्या चरित्रांत जो सदरहू अटीचा संक्षिप्त खुलासा केला आहे त्यावरून सहज ध्यानीं येईल.

" मुसलमानांच्या ग्रंथांत लढाई करण्याविषयीं सांगितलें नाहीं.

I मुसलमान लोक समस्त परधर्मीयास असें सर्वदा ह्मणत कीं, आमच्याशीं तुह्मी तंटा करूं नका; व आमचे दोस्त व्हां, आणि आह्मी तुमच्याशीं विश्वासानें वागूं.

II हें पसंत पडल्यास आह्मांस खंडणी द्या, व आह्मी तुमचा सर्व प्रकारें प्रतिपाळ करूं. तुह्मांस कोणाकडून हि इजा होऊं देणार नाहीं. तुमचे हक्क जितके असतील तितके तुह्मी पाळा.

III खंडणी देणें तुह्मांस पसंत नसेल तर आमच्या धर्माचा अंगिकार करा. ह्मणजे आमचे जे जे हक्क आहेत ते ते तुह्मांस मिळतील व त्यांचा सुखानें उपभोग घ्या."

---

( जनाब पाद्री सी. ए. थामसन साहेब ईसाई धर्मोपदेशकाचे व्याख्यानांतील उतारा )

उत्तम शिक्षण प्राप्त करून, हजारो ग्रंथांचें अध्ययन केल्यानंतर आणि आपल्या पुर्वी निर्माण झालेल्या शेकडों आणि हजारो विद्वानांच्या अनुभवावरून जो इसम समाजाची सुधारणा करण्यासाठीं चांगल्या उपयुक्त, आणि नवीन रितीभाती स्थापित करूं लागला असतां त्यांत मोठेस नवल ते काय? पण जर कोणी अशिक्षित मनुष्य ज्याला शिक्षणाचा मुळींच गंध नसून त्याला अनुभव सुद्धां नाहीं. असा इसम जर आपल्या समाजाची उन्नतीसाठीं प्रयत्न करूं लागून त्यांना विशेष प्रकारें चमत्कारिक व दैविक गोष्टी दाखवूं लागला व थोड्याच अवधींत त्यांचे सर्व दुर्गुण त्यानें दूर करावयास लाविलें यावरून असें

सिद्ध होते कीं, अशा इसमास निसंशनीय ईश्वरी मदत आणि ईश्वरी उपदेश प्राप्त होत असतो असें कबूल करावे लागते. जर हा वर दर्शविलेला सिद्धांत खरा आहे तर आह्मांला स्पष्टपणें कबूल करावें लागते कीं, इस्लामी धर्माचे पैगंबर हजरत महंमद साहेब यांना खरोखर ईश्वरानें जगाच्या सुधारणेसाठीं निर्माण केलें होतें. आणि त्यांना ईश्वरी प्रगटीकरण झालें होतें, कारण असें दिसून पडते कीं, त्यांचा जन्म अशा देशांत व समाजांत झाला कीं, जेथें चांगलें व अति उच्च शिक्षण मिळणें तर दुरापास्त पण साधारण लिहिण्या वाचण्याची वहिवाट सुद्धां क्वचित होती, शिवाय त्या समाजाची स्थिती निर्दयास पात्र होती. त्यांच्यांत कोणत्याच सुधारणा व सद्गुण मुळींच वसत नसत. तेथील लोक रात्रं दिवस मदिरापानाचें सेवन करून आपसांत भांडणें करण्यांत आपला वेळ घालीत, स्त्रियांचा मुळींच कांहीं मान नसे. नवजन्म बालिकेला जन्मताच तत्काळ मारून टाकित. दास आणि दासींचा नानातऱ्हेनें छळ करित. लहानशा गोष्टीवरून भांडणें उपस्थित होऊन खून आणि कत्तलीपर्यंत मजल जाऊन पोहोचें, अशा प्रकारें बरींच मोठमोठी घराणें त्यामुळें नाश पावत वडिलांचा सूड नातवंडापासून घेतला जाई. या रीतीनें लोक अनायासें नीतिहीन बनलें होते. मोठ्या राष्ट्राऐवजी देश लहान लहान संस्थानांनीं व्यापला होता. व प्रत्येक घराण्यांतील प्रमुख आपल्यास बादशाहा समजूं लागे. ईश्वराचें भय तर कोणासच नव्हते. ह्मणून त्याचे नामस्मरण कोणाच्याच ध्यानींमनीं सुद्धां येत नसे. पाषाणाच्या मुर्तीनाच देव मानून त्याची भक्ति करित होते.

ज्या देशाची अशी स्थिति आहे. त्या देशांत अशीं समयीं स्वाभाविकपणें कोण्या एका इसमाचें विचार सुधरणें व गुणवृद्धि होणें आणि प्रत्येक गोष्टीचें खरें मत कायम करणें ह्यावरून तर असें सिद्ध होते कीं, अशा व्यक्तीला ईश्वराकडून उपदेश मिळत होता. आमच्या उन्नतीं

व सन्मार्गास लावण्यासाठीं ईश्वर एकादा प्रेषित किंवा पैगंबर निर्माण करितो. जर असा आमचा दृढ भाव आणि विश्वास ईश्वरावर आहे, तर ह्या सबबीवर हजरत महंमद साहेबांना आह्मी पैगंबर कां वरें मानूं नये ?

ज्या प्रमाणें त्यांनीं आपल्या समाजाची उन्नती केली आणि या प्रयत्नांत त्यांना आश्चर्यकारक यश मिळालें त्यामुळें तर ते खरें पैगंबर होण्याचें निवळ सत्य आणि खात्री पूर्वक कारण आहे. आणि जरी आह्मी त्यांना पैगंबर मानले तरी ते सृष्टींतील सर्वांत मोठ्या सुधारका (Reformer) पैकी एक आहेत.

जे आपल्यासाठीं धन दौलत व प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठीं सुधारक बनतात, आणि लोकांना व्याख्यान देतात असे बरेच सुधारक जगांत झाले. पण हजरत महंमद साहेबांचें चरित्रावरून आपणास समजून पडते कीं, त्यांनीं आपल्या स्वतःस आपल्या अनुयायां ( सहाबां ) पेक्षां कधींच अधीक प्रतिष्ठित गणलें नाहीं. जर लोक त्यांच्या सन्माणार्थ उभे राहत होते तर त्यांना ते तसें न करण्याची मनाई करित होते. त्यांनीं स्वतःविषयीं हमेशा ह्मटलें कीं, मी तुह्माप्रमाणेंच ईश्वराचा बंदा आहे. कोणत्याच वस्तुवर माझे स्वामित्व नाहीं. स्वामित्व धारण करणारा व सर्वांचा धनी फक्त तोच एक ईश्वर आहे. ते आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळीं बादशाहाच्या पदास पोहोंचलें होते. तरी अशा स्थितींत असतांना सुद्धां त्यांनीं आपल्या आयुष्यांतील गरजा भागविण्यासाठीं जरूरीपेक्षां जास्त कधींच खर्च केलें नाहीं. त्यांचें सर्व आयुष्य गरिबींत आणि उपासमार करण्यांत गुदरलें. जें कांहीं त्यांना मिळे ते सर्व लोकोपकारी कामांत खर्च करून टाकीत. ह्मणून या गोष्टीवरून असें समजतें कीं, त्यांना धन दौलतीची मुळींच वासना नव्हती. त्यांनीं आपल्या समाजाची उन्नती व सुधारणेसाठीं बराच त्रास भोगला, व आपत्ति सहन केली.

असें नेहमीं पहाण्यांत आलें आहे कीं, जेव्हां लोक एकाद्या मोठ्या दर्जावर जाऊन पोहोंचलें ह्मणजे त्याची राहणी व वर्तणूक बदलून, बिघडते पण—

या पैगंबराच्या राहणींत कोणत्याच समयीं कधींच अंतर पडलें नाहीं, आणि अखेरपर्यंत ते तसेंच हितचिंतक लीनतेनें आणि सौजन्यानें लोकांशीं नेहमीं वर्तन ठेवित होते. व त्यांची जास्त ओढ सत्य न्याय आणि सारखेपणाकडे होती. एका बाईनें चोरी केली होती, तिला शिक्षा देतें समयीं त्यांनीं ह्मटलें कीं, "जर माझ्या मुलीनें चोरी केली असती तर तिला सुद्धां मी हीच शिक्षा दिली असती" आणि पुढें असें सुद्धां सांगितलें कीं, "मोठ्या मनुष्याच्या गुन्ह्या संबंधानें कानाडोळा केला जात होता. आणि त्यांना त्याच्या गुन्ह्याची शिक्षा दिली जात नसे ह्मणूनच प्राचीनकाली समाजाचा नाश झाला." त्यांनीं चाकराशीं (दासाशी) नेहमीं चांगलें वर्तन करण्यास आणि त्यांना आपल्या प्रमाणेंच मनुष्य मात्र समजावे अशा प्रकारचा उपदेश आपल्या हयातींत त्यांनीं अखेरपर्यंत केला. ते शिक्षणाची मोठी योग्यता करित होते. त्यांनीं एके प्रसंगीं असें ह्मटलें आहे कीं, "विद्वानाच्या दऊतींतील शाई, धर्मासाठीं आपले प्राण अर्पण करणाऱ्याच्या रक्तापेक्षां, जास्त मौल्यवान आहे." त्यांना कोणी विचारलें कीं, सर्वांत धर्म युद्ध कोणते? त्यांनीं त्याला उत्तर दिलें कीं, "सत्य गोष्ट सांगण्यांत जुलमी सरदाराला न भिणें."

अरबस्थानांत बालहत्याचा प्रतिबंध त्यांच्याच शिक्षणामुळें झाला. त्यांनीं स्त्रियांचे सर्व हक्क कायम करून देऊन त्या दुर्बल व अबला समाजाचीसुद्धां फारच मोठी सेवा केली. त्यांच्या शिक्षणामुळेंच दहा वर्षांत अरबस्थानची स्थिती सुधरली आणि लोकांच्या रहणी इतक्या उत्कृष्ट दशेला जाऊन पोंहचली कीं, त्यामुळें पाहणाऱ्याला मोठें कौतुक वाटत

व सन्मार्गास लावण्यासाठीं ईश्वर एकादा प्रेषित किंवा पैगंबर निर्माण करितो. जर असा आमचा दृढ भाव आणि विश्वास ईश्वरावर आहे, तर ह्या सबबीवर हजरत महंमद साहेबांना आह्मी पैगंबर कां बरें मानूं नये?

ज्या प्रमाणें त्यांनीं आपल्या समाजाची उन्नती केली आणि या प्रयत्नांत त्यांना आश्चर्यकारक यश मिळालें त्यामुळें तर ते खरें पैगंबर होण्याचें निवळ सत्य आणि खात्री पूर्वक कारण आहे. आणि जरी आह्मी त्यांना पैगंबर मानले तरी ते सृष्टींतील सर्वांत मोठ्या सुधारका (Reformer) पैकी एक आहेत.

जें आपल्यासाठीं धन दौलत व प्रतिष्ठा प्राप्त करण्यासाठीं सुधारक बनतात, आणि लोकांना व्याख्यान देतात असें बरेंच सुधारक जगांत झालें. पण हजरत महंमद साहेबांचें चरित्रावरून आपणास समजून पडते कीं, त्यांनीं आपल्या स्वतःस आपल्या अनुयायां ( सहाबां ) पेक्षां कधींच अधीक प्रतिष्ठित गणलें नाहीं. जर लोक त्यांच्या सन्मानार्थ उभे राहत होते तर त्यांना ते तसें न करण्याची मनाई करित होते. त्यांनीं स्वतःविषयीं हमेशा ह्मटलें कीं, मी तुह्माप्रमाणेंच ईश्वराचा बंदा आहे. कोणत्याच वस्तुवर माझे स्वामित्व नाहीं. स्वामित्व धारण करणारा व सर्वांचा धनी फक्त तोच एक ईश्वर आहे. ते आपल्या आयुष्याच्या शेवटच्या काळीं बादशाहाच्या पदास पोहोंचलें होते. तरी अशा स्थितींत असतांना सुद्धां त्यांनीं आपल्या आयुष्यांतील गरजा भागविण्यासाठीं जरूरीपेक्षां जास्त कधींच खर्च केलें नाहीं. त्यांचें सर्व आयुष्य गरिबींत आणि उपासमार करण्यांत गुदरलें. जें कांहीं त्यांना मिळे ते सर्व लोकोपकारी कामांत खर्च करून टाकीत. ह्मणून या गोष्टींवरून असें समजतें कीं, त्यांना धन दौलतीची मुळींच वासना नव्हती. त्यांनीं आपल्या समाजाची उन्नती व सुधारणेसाठीं बराच त्रास भोगला, व आपत्ति सहन केली.

असें नेहमीं पहाण्यांत आलें आहे कीं, जेव्हां लोक एकाद्या मोठ्या दर्जावर जाऊन पोहोंचलें ह्मणजे त्यांची राहणी व वर्तणूक बदलून, बिघडते पण—

या पैगंबराच्या राहणींत कोणत्याच समयीं कधींच अंतर पडलें नाहीं, आणि अखेरपर्यंत ते तसेंच हितचिंतक लीनतेनें आणि सौजन्यानें लोकांशीं नेहमीं वर्तन ठेवित होते. व त्यांची जास्त ओढ सत्य न्याय आणि सारखेपणाकडे होती. एका बाईनें चोरी केली होती, तिला शिक्षा देतें समयीं त्यांनीं ह्मटलें कीं, "ऊर माझ्या मुलीनें चोरी केली असती तर तिला सुद्धां मी हीच शिक्षा दिली असती" आणि पुढें असें सुद्धां सांगितलें कीं, "मोठ्या मनुष्याच्या गुन्ह्या संबंधानें कानाडोळा केला जात होता. आणि त्यांना त्याच्या गुन्ह्याची शिक्षा दिली जात नसे ह्मणूनच प्राचीनकाली समाजाचा नाश झाला." त्यांनीं चाकराशीं (दासाशीं) नेहमीं चांगलें वर्तन करण्यास आणि त्यांना आपल्या प्रमाणेंच मनुष्य मात्र समजावे अशा प्रकारचा उपदेश आपल्या हयातींत त्यांनीं अखेरपर्यंत केला. ते शिक्षणाची मोठी योग्यता करित होते. त्यांनीं एके प्रसंगीं असें ह्मटलें आहे कीं, "विद्वानाच्या दऊतींतील शाई, धर्मासाठीं आपले प्राण अर्पण करणाऱ्याच्या रक्तापेक्षां, जास्त मौल्यवान आहे." त्यांना कोणी विचारलें कीं, सर्वांत धर्म युद्ध कोणते? त्यांनीं त्याला उत्तर दिलें कीं, "सत्य गोष्ट सांगण्यांत जुलमी सरदाराला न भिणें."

अरबस्थानांत बालहत्याचा प्रतिबंध त्यांच्याच शिक्षणामुळें झाला. त्यांनीं स्त्रियांचें सर्व हक्क कायम करून देऊन त्या दुर्बल व अबला समाजाचीसुद्धां फारच मोठी सेवा केली. त्यांच्या शिक्षणामुळेंच दहा वर्षांत अरबस्थानची स्थिती सुधरली आणि लोकांच्या रहणी इतक्या उत्कृष्ट दशेला जाऊन पोंहचली कीं, त्यामुळें पाहणाऱ्याला मोठें कौतुक वाटत

होते. त्यांनीं खरोखर मनुष्य मात्राची मोठी सेवा केली. त्यांनीं प्रचंड शिष्टाचारांची स्थापना केली त्यामुळें जगाच्या फारच मोठ्या भागाला आपले मोहित करून घेतलें. ते सर्व लोक तर ह्या श्रेष्ठ पैगंबराचेच सेवक आणि अनुयायींच होते ज्यांनीं युनानीं (ग्रीक) लोकांच्या ज्ञानाला आणि हुन्नराला पुनर्जिवन करून थांबलें नाहींत, तर त्यांची त्यांनीं उन्नती सुद्धां केली. आणि पश्चिमेकडील लोकांस त्यांचे शिक्षण देऊन ते सर्व ज्ञान व हुन्नर सार्वजनिक करून दिलें.

(पहा दिल्ली येथील मासिक पेशवा रसूल नंबर सन १९२८)

समाप्त

८०१५

# श्रेष्ठ प्रेषित उर्फ निष्कलंक अवतार
## शुद्धीपत्र.

| पुस्तकाचे पान | पुस्तकाचे ओळ | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द | पुस्तकाचे पान | पुस्तकाचे ओळ | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | उ ासना | उपासना | १ | ८ | इंगत | इंगित |
| ,, | २ | आह | आहे | | १४ | ग्रहापासू | ग्रहापासून |
| ,, | ४ | विपर | विसर | ३ | ४ | त्रिश्वासनाय | विश्वासनीय |
| ,, | ५ | जे.डंदार | जोडीदार | ,, | १२ | संभलभागा मध्यें | संभलग्र मा मध्यें |
| ,, | ,, | जगला | जगाला | ४ | १९ | कुरेशांच्या | कुरेशां्या |
| ,, | ६ | समील | सामील | ५ | ९ | श्याधुंदर | श्यामसुंदर |
| ,, | ८ | श्रेष्ट | श्रेष्ठ | ,, | ११ | " अ.शा " | " आयेशा " |
| ,, | ८ | एखादा | एखादी | ,, | ९ | देवची | देवाची |
| ,, | १३ | प.ंबर | पैगंबर | ८ | २ | कर्ल्यांचा | कुल्यांचा |
| २ | ७ | कोणया | कोणत्या | ,, | १७ | निरनिराळ्या | निराळ्या |
| ३ | ११ | अलयूक्त | अलसूक्त | १० | १५ | बै.ध | बौद्ध |
| ,, | १५ | Inearnatio | Incarnation | १२ | १६ | अवतरांत | अवतारांत |
| ,, | १८ | Justtcie | Justice | १३ | ८ | प्रलयावत्था | प्रलयावस्था |
| ६ | १ | कस्या.नतर | केल्यानंतर | १६ | १८ | अवताचे | अवताराचे |
| ,, | ६ | समचल्यावर | समजल्यावर | १८ | ५ | दिली आहे | दिली अ.हेत |

# श्रेष्ठ प्रेपित उर्फ निष्कलंक अवतार

## शुद्धीपत्र.

| पुस्तकाचे पान | पुस्तकाचे ओळ | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द | पुस्तकाचे पान | पुस्तकाचे आळ | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २३ | २० | ज्ञान | ज्ञान | ५७ | ८ | शकले | शकेल |
| २६ | १३ | ज्याला निष्क-लंक | ज्या निष्कलंक | ६२ | १ | माणण्याचा | मानण्याचा |
| २९ | ८ | महंद | महंमद | ६५ | ६ | केली | केलें |
| ३९ | १६ | पैगंराकडे | पैगंबराकडे | ६७ | ३ | ता | तो |
| ४० | २४ | नामोस्मरण | नामस्मरण | ६८ | ७ | यहुदा | यहुदी |
| ४१ | १४ | ईश्ररी | ईश्वरी | [illegible] | ९ | ज्याला खुणा | ज्या खुणा |
| ४६ | ६ | वंढा | वेढा | ,, | १३ | व ही | वही |
| ४७ | १३ | इश्वर | ईश्वर | ७ | २० | मनशुद्धि | मनशुद्धी |
| ,, | १८ | मदिनत | मदिनेत | ७१ | १ | अहले बैत | अहले बैत |
| ४८ | ७ | आशा | आयेशा | ७२ | ११ | हरकक | हरकल |
| ५० | ६ | कांबरें | का बरें | ,, | ११ | संस्था | संख्या |
| ५२ | ८ | खिलफतीचे | खिलाफतींचें | ,, | १५ | खेटे | खोटे |
| ५३ | ७ | दतात | देतात | ,, | २१ | ते | तो |
| ५६ | १७ | थाडें | थोडें | ७३ | ७ | अष्ठ | श्रेष्ठ |
| ,, | [illegible] | नामोस्मरण | नामस्मरण | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |

# श्रेष्ठ प्रेषित उर्फ निष्कलक अवतार

## शुद्धीपत्र.

| पुस्तकाचे पान | ओळ | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द | पुस्तकाचे पान | ओळ | अशुद्ध शब्द | शुद्ध शब्द |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ७५ | १० | हाईल | होईल | १०५ | २२ | हात | होत |
| ७९ | ७ | भाव | भाव | १०६ | ३ | पैगंराचा | पैगंबराचा |
| ८२ | १० | मुळाच | मुळींच | १०७ | ७ | मस्तकांत गेली जाऊन | मस्तकांत गेली |
| ,, | १३ | बेला | बिलाल | ,, | १५ | वार्वीत | वाध्वीत |
| ८४ | ५ | श्रेष्ट | श्रेष्ठ | ,, | १६ | श्रष्ठ | श्रेष्ठ |
| ,, | ११ | हातो | होतो | ११३ | २२ | उन्नतासाठीं | उन्नतीसाठीं |
| ८५ | १८ | परदेशांतील | परदेशांतील | ११४ | १० | नसंत | नव्हते |
| ८८ | १७ | अस्तितवत | अस्तितवात | ,, | २३ | अशी | अशा |
| ८९ | २१ | खलिफ | खलिफा | ,, | २६ | आमच्या | आह्मांला |
| ९२ | ,, | जयर | जबर | ११७ | ४ | सबक | सेवक |
| ९३ | ६ | जन्मासयेणाऱ्याचें दुःख | प्रसवण्याच्या वेदना | | | | |
| १०१ | १७ | पु | पुढें | | | | |
| १०३ | २ | संरणार्थ | संरक्षणार्थ | | | | |
| १०५ | ३ | एकेवीत | ऐकवीत | | | | |
| ,, | १४ | कुल्ली | केल्ली | | | | |

पवित्र कुराणातील कां ... कांसाठीं
सा...

REFBK-0004115

२८.

हो ! मुसलमांनो ! तुह्मी परमेश्वराचा हुकुम माना व पैगंवराचा
माना, आणि तुह्मां पैकीं जे सत्ताधिकारी होत. ( त्यांचाही )
अध्याय ४ महावाक्य ५९

आणि ( हे पैगंवरा ! ) आह्मी तर तुला सकळ जगांच्या लोकांसाठीं
( मूर्त ) दया ( वनवूनच पाठविलें आहे. )
( पवित्र कुराण अध्याय २१ महावाक्य १०७

( लोकांनो ) 'मोहंमद' तुमच्या पुरुषांतून कोणाचाहि वाप नाहीं,
तो तर परमेश्वराचा प्रेषित-पैगंवर आहे; आणि ( पत्राच्या गोहोर
सर्व ) पैगंवराच्या शेवटांत आहे. आणि परमेश्वर सर्व वस्तूं
स्थिती ) शी वाकव होय.
( पवित्र कुराण अध्याय ३३ महावाक्य ४० ) १९५

तो परमेश्वरच तर होय कीं ज्यानें अरवच्या निरक्षरांत त्यांच्या-
महंमदला पैगंवर वनवून पाठविलें; कीं तो यांना परमेश्वराचीं
वाक्यें वाचून वाचून ऐकवितो व यांना ( नास्तिकपणा व मूर्ती
च्या विटाळापासून ) शुचिर्भूत करितो आणि यांस ( दिव्य ) पुस्तक
शहाणपणा ( च्या गोष्टी ) शिकवितो. नाहींतर, ( यांच्या ) पूर्वीं हे
लोक धडधडीत चुकींत पडलेले होतेच, आणि तसेंच परमेश्वरानें या
पैगंवरास इतर लोकांकडेहि पाठविलें आहे कीं जे अद्यापि या अरवच्या
मुसलमानांत सामील झाले नाहींत, पण शेवटीं यांच्यांत येऊन
मिळतील. आणि परमेश्वर सामर्थ्यवान व बुद्धीमान होय.
( अध्याय ६२ महावाक्य २, ३ )

तो परमेश्वरच तर होय कीं ज्यानें आला पैगंबर ( सद्
सद्बोध व सद्धर्म देऊन या साठीं पाठविलें कीं, त्यानें
त्याचे वर्चस्व गाजवावे आणि ( इस्लामी धर्माच्या सत्याबद्
साक्षी वस करितो.

अध्याय ४८ महावाक्य २८

( हे पैगंबरा ! धन संपत्ति व संतती ही इहलोकिक
( क्षण भंगुर ) शोभा होय; आणि चिरस्थायीं अशी सु
पालनकर्त्या समीप पुण्य फलाचें मानानें उत्तम होत
आशेच्या दृष्टीनेंहि उत्तम होत.

टीपः– ( पवित्र कुराण अध्याय १८ महावाक्य ४६ )
चिरस्थायीं सुकृत्यें ह्मणजे ज्यांचे पुण्यफळ नेहमीं अप्रा
होतच्च राहते तीं कामें, उदाहरणार्थः- पुत्र पौत्रादि सदाचर
मशीद-उपासनालय, पुल, विहीरी, धर्मशाळा, इसपिताळें
बांधणें किंवा एखादें लोकोपयोगी पुस्तक लिहून ठेवणें वगैरे.

REFBK-0004115